Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

**Berar Samachar**

वर्ष ४८ ] आकोला-- सोमवार तारीख ७ माहे सप्टेंबर सन १९१४ इ० [ अंक ३५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील. नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल. ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ J. G. Ridland. एजंट
नो. नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन १६ ३/४ तोळे असतें.
मुंबई बँक आकोला २१-९-१० J. G. Ridland. एजंट
नो. नं० २

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचे कडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ३

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. ( Natl ) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. **Apply to the DEAN** *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 4

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ति रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेग्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकी किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १८६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**
नो. नं ५

### अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमिंट, सुंट, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकी ४ आणे, कार्बळ, व मुळव्याध, यांच्या अप्रतीम गोळया किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण, व्रण, चिखली, सुकी, ओली खाज. जखम, नखविषया, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो, पौष्टिक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं १। रु० व डोळयांतील वेगळे सोडण्याचे किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाल हात भट्टीचे किं० तोळयास २ रु०

पत्ता - व्ही० आर० मुळें,
नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ६

### कुंडलीचें निरीक्षण.

जन्मकाल पाठविल्यास कुंडलींत कोणकोणते योग झाले आहेत, व ते काय फळ उत्पन्न करितात, याचें वर्णन शास्त्रीय पद्धतीनें १ रु० २ आ० व्ही० पी० नें पाठवूं. अनुभव घ्यावा

विष्णु गोपाळ नवथे
C/o कुंडली ग्रहालय, ३ सदाशिव स्ट्रीट पोस्ट—मुंबई नं० ४
नो. नं. ७

### जाहिर नोटीस.

सर्वत्र लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते कीं गंगाराम वा। उत्राजी कुणबी माळोकार रा० धोतरडी पोष्ट बोरगांव मंजु ता० आकोला हा माझा बाप आहे व त्याजला माझे शिवाय दुसरे कोणी वारस नाहीं व माझे बापाजवळ जी जीदंगी आहे ती वडीलोपार्जीत आहे ती विकण्यास माझे बापास मुळीच अधीकार नाहीं मी व माझा बाप सर्व येकत्र आहों परंतु मजला दुसरी पाटाची अई आहे तीचे संमतीनें माझ्या बापाचा विचार जिदंगी विकण्याचा दिसतो तरी त्याज जवळून जिदंगी माझे संमतीशिवाय कोणी घेऊं नयें घेतल्यास त्याजबद्दल मी व माझी वडीलोपार्जीत जिदंगी मुळीच जबाबदार होणार नाहीं कळावें ता० २७।८।१४ इ०

सही
धनसींग गंगारामजी माळोकार
द० खु०
नो० नं० ८

### जाहिरात

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं मी अज्ञान तर्फे मदन गोपाळ मेघराज कोठारी व फौजमल रेखचंद झाबक या उभयतांस ता २०।९।१३ इ० रोजीं मुखत्यारपत्रांत उभयतांस आमचे दुकान तर्फे हुंडी लिहुन देण्यास अधिकार दिला होता तो हुंडीवर सही करण्याचा अधिकार रद्द केला आहे. कारण मी मु० पत्र दिले तेव्हांपासून मुळीच हुंड्या आमचे सहीचे व दुकानचे नावची लिहिलि नाहीं. जो कोणी लिहुन घेईल त्याची जबाबदारी आमचे दुकानावर नाहीं आणि पुर्वीपासून असामीचे तडजोड मुकत्यार फौजमल रेखचंद यांनीं आपले सहीची रसीद ही देऊं नये करितां जाहिरातीनें सर्वत्र लोकांस कळविलें आहे ता० १७ माहे आगष्ट सन १९१४ इ.

सही
रंभाबाई जवजे सीवरतनदास अ०
पा० क० सासु राधाबाई
जवजे सीवप्रताप मारवाडी
रा० खामगांव द० खु०
नो० नं० ९

### जाहीर नोटीस.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं मी बेमार असल्यामुळें माझे इच्छेप्रमाणें मी आपल्या स्थावर जंगम इस्टेटीचें ता० २२।८।१९१४ इसवी रोजीं अमृत खुशाल याचें नांवें व्यवस्थापत्रक करून दिलें आहे. मजकडे ज्या ज्या लोकांचें कर्ज असेल त्या त्या लोकांनीं आपले रुपये अमृत खुशाल याज पासून वसूल करावेत. अगर ज्यांच्याकडे माझे रुपये घेणें असतील त्यांनीं ही अमृत खुशाल यास आणून द्यावेत. मी फक्त हयात आहो तोंपर्यंत अन्न वस्त्र घेण्याचा मालक आहे. सर्व इस्टेटीचा हक्क अमृत खुशाल यांस मी आपले जिवंतपणीं स्वसंतोषानें योग्य कारणाकरीतां दिला आहे. आणि सर्वत्र लोकांस विदित करण्याकरितां या जाहीर नाटिशीनें कळविलें आहे. कळावें ता०३१।८।१९१४ ई.

सही
यशवंत खुशाल दस्तुर खुद्द राहणार
मोरगांव भाकरे ता० आकोला
नो. नं. १०

### प्रभु--प्रार्थना

पद-- हे मना, सोडकल्पना.

प्रभु—कृपा। जाहली जरी। जगीं या
तरी। काय मज कमती। वहतील हजारों
गमती ॥ धृ ॥
सुविचार। मनातें वरी। अज्ञता हरी। सिद्ध
यज्ञ पुढती। व्यवसायिं सदा ये बढती, ॥
विधिसुता। लक्ष्मिही करी। मान्य जगभरीं।
सर्व जन नमिती। लव थोर-पणातें न
भिती ॥
उपहास। शून्यता वरी। भलेही सरी।
कराया बघतीं। वंदिती प्रीतिनें चित्तीं ॥
हांसणें। क्रीडणें तसें। नवल करितसे।
अधिक वा कमती। प्रतिशद्ध झेलाया जमती ॥
रोदनें। खिन्नता—गुणें। भासतें उणें। मुखें
किती वदती। कृतिशद्ध विचारां- महती ॥
वर्तती। जशी मत्कृती। सदा अनुकृति।
भक्तिनें करिती। कर्तव्यभार बहु महती ॥
भक्तिचे। अन्य रितीचे। ईश प्राप्तिचे। मार्ग
मम असती। तरि त्याच पथें जन जातीं ॥
म्हणुनिया। प्रभुवरा तुला। कथित हे तुला।
देई मज सुमती। यद्गुणें संत त्वयि रमती।

लेखक -- मार्तंड गोपाळ हीरपूरकर पांडे

## श्री. दादासाहेब खापर्डे यांचें व्याख्यान.

गुरुवार ता. २७ रोजीं सायंकाळीं श्रीराजेश्वर संस्थानच्या धर्मशाळेंतील सार्वजानिक गणपत्युत्सवांत श्री. दादासाहेब खापर्डे यांचें **'नातिदूरे नातिनिकटे इंद्रियनाशान् मनोमवस्थानात्'** या श्लोकार्धावर सुरस व्याख्यान झालें. श्रोतृसमुदाय पुष्कळ जमला होता. वेदांताचा विषय रुक्ष असतो तरी पण तो ज्ञात्याच्या हातीं पडला म्हणजे सोपा व मनोरंजक होऊं शकतो हें श्री. दादासाहेब यांचें व्याख्यानावरून दिसून आलें. त्यांच्या व्याख्यानाचा सारांश येणेंप्रमाणें:--

ब्रम्हप्राप्तीचे मार्ग अनेक आहेत. त्या सर्वांचा समावेश 'प्रवृत्ति' आणि 'निवृत्ति' या दोन ठळक मार्गामध्यें होऊं शकतो. कोणत्याही मार्गाचें अवलंबन केलें तरी मुख्यत्वेंकरून 'दारेषणा,' 'वित्तिषणा,' व 'लोकेषणा' या तीन ईषणांविषयीं वैराग्य लागत असतें. प्रत्येक ईषणेविषयीं वैराग्य उत्पन्न होण्यास निरनिराळीं साधनें आहेत. उदाहरणार्थ ब्रह्मचर्य, योगाभ्यास वगैरे साधनांनीं दारेषणाविषयीं वैराग्य उत्पन्न होतें. बालवयांत व उतारवयांत तर दारेषणाविषयीं साहजिकपणें वैराग्य उत्पन्न होतें. वित्ताविषयीं वैराग्य होणें मात्र कठीण आहे. अगदीं ज्ञातारपणीं देखील वित्त लालसा असतेंच. वित्तानें अथवा द्रव्यानें सर्व कांहीं प्राप्त होतें अशी समजूत आहे. परंतु बास्तविक तसें नाहीं. आरोग्य सुख, आनंद, आयुष्य वगैरे गोष्टी बाजारांत विकत मिळत नाहींत द्रव्य ह्मणजे देखील कांहीं ठराविक वस्तु नाहीं. आपण सोनें, रुपें वगैरे वस्तुंना द्रव्य समजतो पण लंकेंत सोन्याच्या विटा' आहेत तेथें आपल्या जवळच्या तुटपुंज्या सोन्याला कोण विचारतो. तांब्याच्या नाण्याला आपण द्रव्य समजतो. परंतु इंग्लंड वगैरे सारख्या देशांत त्याची काय किंमत. पूर्वीं कवड्यांचा पैशाप्रमाणें उपयोग होत असे परंतु आतां त्या फेरावारीं जाऊं लागल्या तरी तिकडे कोणी लक्ष देत नाहीं. संसार सुखापैकीं वित्तसुख हें एक आहे. तें भासमान आहे. ब्रह्मप्राप्ती करितां संसारसुखाचा कंटाळा आला पाहिजे. इंद्रियजन्य सुखेंहि भासमान आहेत. 'चक्षुर्वैसत्यम' अशी ह्मण आहे. परंतु चक्षु देखील आपणांस फसवितात. डोळ्यांचा धर्म दिसणें हा आहे. तेव्हां डोळ्यांना वाटेल ती वस्तु दिसली पाहिजे. परंतु एका खोलींत बसले असतां दुसऱ्या खोलींत कोणत्या वस्तु आहेत तें दिसत नाहीं. बरें अगदीं डोळ्याजवळची वस्तु स्वतःच्या डोळ्यांतलें काजळही दिसत नाहीं. फार जवळ नाहीं व फार लांब नाहीं तर मध्यंतरीं असलेली वस्तु स्पष्ट दिसते हें तरी खरे आहे काय? नाहीं. अरण्यांत मृगजळ दिसतें तेथें जलाचा एक थेंबही नसतो. तेव्हां डोळे आपणांस फसवितात हें सिद्ध होतें. कर्णेंद्रियविषयीं हि तोच प्रकार आहे. गायन मधुर कर्णप्रिय असतें. परंतु घरांत एखादा इसम आसन्न मरणस्थितींत असला तर त्यावेळीं गायनाच्या आलापांनीं आनंद होईल काय! घ्राणेंद्रियाचीहि तशीच स्थिति आहे कडु वृंदावनाच्या फुलांचा वास मनोहर असतो. परंतु या मनोहरपणावर भुलून फुल तोंडांत टाकलें कीं तोंड कडू जहर होतें. बरें रसनेंद्रिय पहावें तर तेंहि तसेंच. साखर गोड असते. परंतु स्मशानयात्रेच्यावेळीं ती खावयास दिली तर गोड लागेल काय! स्पर्शेंद्रियही त्याच मालीकेंतलें होय. रेशमाचा रुमाल गळ्याभोंवतीं गुंडाळला ह्मणजे मऊ लागतो. पण तोच जर जोरानें आंवळला कीं तीक्ष्ण सुरीप्रमाणें भासूं लागतो. तात्पर्य काय कीं ज्ञानेंद्रियांपासून मिळणारें सुख देखील क्षणिक व भासमान असतें. संसारांतलीं सुखें अशीच असतात. तेव्हां अशा संसारसुखांना कंटाळून त्यांविषयीं वैराग्य उत्पन्न होऊन वेदांताचा अनुभव घेण्याकडे प्रवृत्ति झाली पाहिजे. संसारांतील दुःखांना कंटाळून प्राप्त झालेलें वैराग्य तें खरें वैराग्य नव्हे. असें वैराग्य तामसी होय. अशानें ब्रह्मप्राप्तीचा मार्ग सुलभ होत नाहीं. संसारसुखाविषयीं वैराग्य प्राप्त झालें पाहिजे.

एक श्रोता.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ३ शके १८३६

## हिंदुस्थानचा व्यापार.

अर्वाचीन काळांत व्यापारवृद्धि हें राष्ट्रीय उत्कर्षाचें एक मुख्य अंग होऊन बसलें आहे. ईस्ट इंडिया कंपनीनें व्यापारासाठीं हिंदुस्थानांत पाऊल ठेविल्यापासून हिंदुस्थानच्या इतिहासाचें सगळें स्वरूप पालटून गेलें आहे. व्यापाराच्या हक्कासाठीं राष्ट्राराष्ट्रांमध्यें जंगी युद्धें झालेलीं आहेत. व्यापाराच्या सोयीसाठीं धाडशी लोकांनीं आपल्या जिवाची पर्वा न करतां अतिशय दुर्गम स्थळीं जाऊन व्यापाराचें द्वार खुलें करण्याचा यत्न केला आहे. व्यापारवृद्धि हें राष्ट्रीय महत्वाचें एक मुख्य लक्षण हल्लींच्या काळीं मानलें जातें. अशा या व्यापारासंबंधानें आमच्या हिंदुस्थान देशाची काय स्थिति आहे हें पाहणें अर्थात् अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. पण हा प्रश्न जितका महत्त्वाचा तितकाच भानगडीचा व गहन आहे. व्यापाराचीं अंगें दोन—बहिर्गत व अंतर्गत—अशीं आहेत. बहिर्गत व्यापारांत पुनः बाहेरून माल आयात होणें, व बाहेर माल निर्गत होणें अशीं दोन अंगें आहेत; आणि या दोन अंगांचा समतोल राखावा, किंवा एक दुसऱ्यापेक्षां भारी होऊं द्यावा हा एक मोठा वादग्रस्त प्रश्न आहे. कोणी ह्मणतात कीं देशांतून बाहेर माल जाऊन त्याबद्दल संपत्ती आंत येणें हें राष्ट्रीय उत्कर्षाचें लक्षण आहे. कोणी ह्मणतात कीं बाहेरून माल आयात होऊन संपत्ति खेळती राहणें हें राष्ट्रीय संपन्नतेचें लक्षण आहे. यांतलें कोणतें मत खरें व कोणतें खोटें हें ठरविणें हें शास्त्रज्ञांचें काम आहे. त्या भानगडींत तूर्त न पडतां गेल्या ह्मणजे १९१३-१४ सालीं हिंदुस्थानच्या व्यापारासंबंधानें स्थूल गोष्टींचा निर्देश करण्याचें आज आह्मी योजिलें आहे.

रिपोर्टाच्या सालीं हिंदुस्थानांतून जवळ जवळ अडीच अब्ज रुपये किमतीचा माल बाहेर देशीं गेला. पैकीं सुमारें ४॥ कोटि रु. किंमतीचा माल परदेशांतून एकदां येथें येऊन पुनः परदेशाला गेला. गेल्या पांच वर्षांचें आंकड्यांशीं हे आंकडे मिळवून पाहिले तर असें दिसतें कीं हा बाहेर देशीं गेलेला माल सारखा सालोसाल वाढत्या प्रमाणावर आहे या वाढीचें प्रमाण गेल्या पांच वर्षांत सवाशट झालें आहे. त्या मानानें आयात मालही वाढला आहे. पण ही वाढ अडीच अब्जाच्या घडामोडींत सगळी सात कोटींची ह्मणजे अगदीं क्षुद्र आहे. बाहेर देशीं गेलेल्या मालांत मुख्य बाबी ह्मणजे खाण्याचे पदार्थ, पिण्याचे पदार्थ, तंबाखू कच्चा माल, अंशतः तयार माल, अशा आहेत कलकत्त्याहून रवाना होणारा ज्यूट ह्मणजे गोणपाट ही यांत एक महत्वाची बाब आहे. कच्च्या मालांत कापूस ही बाब फार मोठी आहे इतकी कीं अडीच अब्जांपैकीं ४१ कोटींचा नुसता कापूस परदेशी गेलेला आहे. कापसाचा बराचसा भाग जपानला जातो. त्याच्या खालोखाल जर्मनींत. यंदा जर्मनींत माल जाणें युद्धामुळें बंद झाल्याबरोबर कापसाचा भाव एकदम उतरला व कापसाचे व्यापारी व शेतकरी रडत बसले आहेत याचें कारण हें आहे. आश्चर्य हें आहे कीं कच्च्या कापसाची निर्गत गेल्या पांच वर्षांत शे० २९ या प्रमाणांत वाढली असता येथून जाणाऱ्या तयार मालाची निर्गत फक्त शेंकडा ९ या प्रमाणांतच झालेली आहे. यावरून यांत्रिक शक्तींत हिंदुस्थान इतर राष्ट्रांच्या मानानें मागें आहे असें स्पष्ट होतें. पण आयात मालाचे आकडे पाहिले ह्मणजे हेंच प्रमाण उलटलेलें दिसतें. ह्मणजे बाहेरून तयार माल इकडे जितका येतो तितका कच्चा माल येत नाहीं. आयात मालांत खाण्यापिण्याचे पदार्थांत साखर, दारू, बिस्किटें, वगैरे पदार्थ येतात. साखरेची आयात तर मनस्वी वाढली आहे. त्याच्या खालोखाल दारूची, आणि त्याच्या खालीं नंबर बिस्किटें व लहान मुलांचा खाऊ यांचा. इतर जिनसांत कापसाचीं, रेशमी व लोंकरीचीं वस्त्रें, यंत्रें, स्टेशनरी, व रेल्वेला लागणारें सामान यांचा अंतर्भाव मुख्यत्वेंकरून होतो. या सर्व बाबतींत गेल्या पांच वर्षांत वाढ झालेली आहे. पण निर्गत झालेल्या कच्च्या मालाच्या वाढीशीं या वाढीची तुलना केली तर ही वाढ विशेष महत्त्वाची नाहीं असें दिसून येईल. ह्मणजे कांहीं वर्षांपूर्वीं आयात माल ज्या प्रमाणांत येत असे तें प्रमाण आमच्या देशांतल्या औद्योगिक जागृतीमुळें थोडें तरी कमी झालें आहे असें समाधान मानण्यास जागा आहे या आयात निर्गत मालासंबंधानें एक गोष्ट विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे. ती ही कीं आयात होणारा बराच माल युरोप खंडांतून ह्मणजे इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स व आस्ट्रिया या देशांतून (व साखर तेवढी जाव्हा व मॉरिशस बेटांतून) येणारा आहे, पण निर्गत मालाचा [विशेषतः कापसाचा] बराच मोठा भाग युरोपखंडाबाहेर ह्मणजे जपान व ब्रिटिश वसाहती वगैरेकडे जाणार आहे. धान्य मात्र शेंकडा ८३ या प्रमाणांत युरोपांत जाणारें आहे. सध्याच्या युद्धामुळें आयात व निर्गत मालाच्या दोन्ही आंकड्यांत जबरदस्त फरक पडण्याचा व त्यावरून काढण्यांत येणाऱ्या अनुमानांतही त्याबरोबर उलथापालथ होण्याचा संभव आहे. ह्मणून पुढच्या सालच्या व्यापाराचा रिपोर्ट विशेष चमत्कारिक स्वरूपाचा होईल असा अंदाज आहे.

---

## सुधारणा कीं रानटी क्रूरता.

सध्याचें महान् युद्ध जर्मनीच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेचा परिणाम आहे व या युद्धांत जर्मनीचा पक्ष सर्वस्वी अन्यायाचा व स्वार्थपरतेचा आहे. त्यांत उच्च मनोवृत्तीचा लवलेश नाहीं, आणि याच्या उलट इंग्लंडचा पक्ष केवळ जर्मनीच्या राक्षसीमहत्त्वाकांक्षेनें ग्रासून टाकलेल्या लहानशा पण अलौकिक शौर्य व धैर्य दाखविणाऱ्या बेलजमच्या परित्राणासाठीं घेतलेला अतएव पूर्णपणें न्यायाचा, भूतदयेचा आणि सन्मान्य असा आहे. या गोष्टी आतां पूर्णपणें जाहिर आहेत. पण येवढ्यानेंच झालें नाहीं. जर्मनीनें या युद्धांत आपलें कृष्णस्वरूप जगाच्या पूर्णपणें निदर्शनास आणून देण्याचा विडाच जणुं काय उचललेला दिसतो. आजपर्यंत पुष्कळांची अशी समजूत होती कीं जर्मनी हें विद्येचें, यांत्रिक शक्तीचें आणि उपयोगाचें माहेर घर आहे, आणि या गुणांच्या जोरावर दुसऱ्यास उपद्रव न करतां तो देश स्वतःची उन्नती करून सुधारणेला भूषण होत्वीत आहे. पण सांप्रतच्या युद्धांत जर्मनी जें वर्तन करीत आहे तें पाहिलें ह्मणजे त्या देशाची विद्या, उद्योगसंस्था आणि संपत्ति ही केवळ काळ्यानागाच्या डोक्यावरील तेजस्वी मण्याप्रमाणें केवळ दर्शनालंकार मात्र आहे. 'मणिना भूषितः सर्पः किमसौ न भयंकरः' हें वाक्य जर कोणाला तंतोतंत लागूं पडत असेल तर तें जर्मनीला होय. राक्षसीमहत्त्वाकांक्षेनें ग्रासून टाकलेल्या त्याच्या मनाला धर्माची, नीतीची, भूतदयेची कशाचीच चाड नाहीं. शिपाई मरणोन्मुख झाले असतां त्यांना शेवटचें देवाचें नांव सुद्धां न घेऊं देतां दुष्टपणानें ठार करणें, स्त्रियांना नग्न करणें, जित प्रांतांतल्या लोकांपासून जुलमानें छळून पैसा काढणें, गांवाला आग लावणें, स्त्रिया व मुलें यांच्याविषयीं अंतःकरणाची निष्ठुरता दाखविणें वगैरे गोष्टी ज्या रानटी लोकांच्या युद्धांत सुद्धां क्वचित दिसतात, त्या जर्मनीच्या हातून धूमधडाक्यानें संकोच न करतांना चालत असलेल्या पाहून जर्मनीच्या या वागणुकीनें सुधारणेला अक्षय्य लांछन लाविलें आहे असें ह्मणणें भाग

पडतें. युद्धाचे वेळींसुद्धां परराष्ट्रीय वकिलाच्या जिवाला अपाय न करतां त्यांना सन्मानानें व सुरक्षितपणानें त्याच्या घरची वाट दाखविणें हा सभ्यतेचा प्रकार आहे. खुद्द इंग्लंडनें जर्मन लोक हिंदुस्थानांत व इंग्लंडात हातीं लागले त्यांना अतिशय उदारपणें वागविलें ही गोष्ट संकटांत सापडलेले जर्मन लोकसुद्धा कबूल करतात, पण तेंच जर्मन लोकांची रशियांच्या वकिलाशीं झालेली वागणूक कशी पशुतुल्य होती पहा. त्या वकिलाला चोरापेक्षांही वाईट रीतीनें वागविण्यांत आलें त्याच्या बायकांच्या अंगावर हात टाकला, त्याच्या सुटकेबद्दल निर्दयपणानें पैसा घेण्यांत आला, आणि त्याला कोणी खाण्यापिण्यास देऊं नये असा बंदोबस्त करण्यात आल्यामुळें त्या बिचाऱ्याला उपासमार काढीत कसा तरी आपला रस्ता सुधरावा लागला. परराष्ट्रीय वकिलाशीं अशी वागणूक केल्याबद्दल जर्मनीचें नाव इतिहासांत सदोदित कलंकित राहील आणि या अपकीर्तीचा डाग कधींही धुतला जाणार नाहीं.

## हिंदुस्थानचें सैन्य

ब्रिटिशराष्ट्राच्या निशाणाखालीं लढून आपली राजनिष्ठा व्यक्त करण्याची हिंदुस्थानची उत्कंठा शेवटीं एकदाची इंग्लंडनें मान्य करून युरोपांतल्या लढाईवर काळ्या फौजेला नेण्याचें लॉर्ड किचनेर यांनीं पार्लमेंटांत कबूल केलें ही गोष्ट गेल्या आठवड्यांत विशेष महत्वाची अशी घडली. ही गोष्ट जाहिर करतांना फ्रान्सनें अलजीरियन फौज मागें एकदां आणिली होती या गोष्टीचा उल्लेख करून स्वतःच्या कृतीचें समर्थन करण्याची अवश्यकता लॉर्ड किचनर यांना दिसली यावरून गोऱ्या लोकांच्या खांद्याशीं खांदा लावून लढूं देण्याचा मान काळ्या लोकांना मिळूं देण्याला विरोध करणारे कांहीं पार्लमेंटचे मेंबर असतील अशी शंका त्यांना आल्याचें दिसतें. वसाहतींत काळ्या लोकांना ज्या रीतीनें वागविण्यांत येतें त्यावरून हा वर्णभेद सुधारलेल्या गोऱ्या लोकांच्या डोक्यांत प्रमुखत्वानें आहे ही गोष्ट सर्वांना कळलेलीच आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं लॉर्ड किचनेर यांच्या या कृत्याच्या विरुद्ध एकानेंही ब्र काढला नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांची शुरत्वाबद्दलची व राजनिष्ठेबद्दलची खात्री किंवा सध्याच्या आणिबाणीच्या प्रसंगीं अशा शूर शिपायांच्या मदतीची तीव्र अपेक्षा, अथवा असावेळीं वर्णभेदाच्या भ्रममूलक समजुतीस बळी पडल्यानें हिंदुस्थानांत असंतोष उत्पन्न होईल ही भीती यापैकीं कोणतीही गोष्ट या उदार वर्तनाच्या मुळाशीं असो, पण अखेर सत्याचा व न्यायाचा पगडा इंग्लंडच्या मनावर बसून हिंदुस्थानच्या राजनिष्ठ प्रजेला आपलें तनमनधन राजकार्यासाठीं अर्पण करण्याचा बहुमान एकदांचा मिळाला ही आह्मांस अतिशय संतोषाची गोष्ट वाटते, आणि आह्मी आशा करतों कीं लॉर्ड किचनर यांनीं भाकित केल्याप्रमाणें हिंदुस्थानांतून लढाईवर जाणारे वीर 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं' या गीतोक्तीला सार्थकता आणून हिंदुस्थानची शुरत्वाबद्दलची कीर्ति उज्वल राखतील, व पुढें सैन्यात आमच्या लोकांना भरती होण्याचा मार्ग खुला करून देण्याचें श्रेय घेतील.

## यंदाची कांग्रेस.

सध्याच्या लढाईच्या सारख्या धामधुमीच्याप्रसंगीं कांग्रेस भरवून लोकांनीं सरकारच्या व्यग्र चित्ताला अधिक व्यग्रता आणूं नये असा पोक्तपणाचा उपदेश कित्येक करीत आहेत. पण या लोकांना कांग्रेसचे उद्देश तरी कळले नसले पाहिजेत किंवा 'कांग्रेससारख्या वजनदार पुढाऱ्यांना वेळप्रसंग व तदनुरूप आपलीं कर्तव्यें जाणण्यापुरती अक्कल नाहीं असें तरी वाटत असलें पाहिजे, या शिवाय असला बाष्कळपणाचा उपदेश करण्यास ते प्रवृत्त झाले नसतील असें ह्मणणें भाग आहे. कांग्रेस ही संस्था सरकारी अधिकाऱ्याचें छिद्रान्वेषण करण्यासाठींच निर्माण झाली आहे अशी या लोकांची समजूत दिसते. वस्तुविक प्रकार तसा मुळींच नाहीं. सरकारविषयीं आपली राजनिष्ठा व्यक्त करून राज्यकारभाराचा गाडा हाकण्याचें दुष्कर काम सुलभ होईल असें करणें हा राष्ट्रीय सभेचा उद्देश आहे, व लोकांच्या तक्रारी सरकारच्या नजरेस आणून देण्यांत ही त्या संस्थेचा हाच थोर हेतु आहे. सध्याच्या काळीं लोकांच्या तक्रारी सरकारापुढें मांडून अधिकाऱ्यांची व्यग्रता वाढविण्यासारखा अयोग्य प्रकार कोणताही नसेल हें कांग्रेसचे चालक पूर्णपणें जाणून आहेत. पण त्या बरोबरच सर्वांना एकत्र बोलावून व हिंदुस्थानची राजनिष्ठा व्यक्त करून अशा वेळीं आह्मी सर्व एक दिलानें सरकारास मदत करण्यास तयार आहों असें कळविण्यापासून सरकारच्या मनाला केवढा धीर येईल याची कल्पना कांग्रेस यंदा भरवूं नका असा उपदेश करणारांना नीटशी झालेली दिसत नाहीं. राजनिष्ठा प्रदर्शक सभा गावोगांव होतच आहेत, पण सर्वांची समुच्चयानें एक सभा होऊन सर्व राष्ट्राची मुख ह्मणविणाऱ्या कांग्रेसनें राजनिष्ठा व साह्य करण्याविषयींची राष्ट्राचा तत्परता व्यक्त करावयाची नाहीं तर कोणी करावयाची! इतर बाबतींत हिंदु व मुसलमान यांचा किती ही मतभेद असला तरी या दोन बाबतींत त्यांचें संपूर्ण एकमत आहे. तेव्हां कांग्रेसनें यंदा मॉस्लेम लीग व तिच्यासारख्या आपल्या बहिणी यांच्या हातांत प्रेमानें हात घालून सर्वांनीं एक सुरानें राजनिष्ठेचें गाणें गावें व एक सुरानें ब्रिटिश सरकाराला साह्य करण्याविषयींची आपली तत्परता व्यक्त करावी याहून अधिक इष्ट काय आहे? यादृष्टीनें विचार करतां रा. टिळक यांनीं केलेलें वर्तन अत्यंत प्रशंसनीय आहे यांत शंका नाहीं.

## म्हैसूरच्या महाराजांचा कृतज्ञता.

सध्याच्या युद्धाचें स्वरूप व त्याच्या परिणामाशीं हिंदुस्थानच्या हिताहिताशीं असलेला संबंध लक्षांत घेतला तर यावेळीं हिंदुस्थान जो स्वार्थत्याग करील तो थोडा आहे असें ह्मटलें पाहिजे, व त्याप्रमाणें तो यथाशक्ति करीतही आहे ही संतोषाची गोष्ट आहे. खरें ह्मटलें तर हिंदुस्थानांतली प्रस्तुतची शांतता, निर्भयता, विद्याप्रसार, सुधारणा, व्यापारवृद्धि वगैरे प्रत्येक गोष्टीविषयीं हिंदुस्थान ब्रिटिश सरकारचें ऋणी आहे. देशी संस्थानाचें अस्तित्व ब्रिटिश सरकारच्या उदार राजनीतीमुळेंच आहे, व म्हैसूर सारखीं कित्येक संस्थानें तर ब्रिटिश सरकारच्या औदार्यामुळें व न्यायप्रियता व सद्बुद्धि यांच्यामुळें आह्मास लाभलीं आहेत. ब्रिटिश सरकारच्या या औदार्याबद्दलची कृतज्ञता हिंदुस्थानच्या अंतःकरणांत सतत जागृत आहे यातही शंका नाहीं. पण ती अंतःकरणांतल्या अंतःकरणांत ठेवण्याची ही वेळ नव्हे, तिला कृतीचें स्वरूप देण्याचा योग्य प्रसंग हाच आहे हें जाणून म्हैसूरच्या महाराजांनीं लढाईवर जाणाऱ्या हिंदी सैन्याच्या खर्चासाठीं पंनास लक्ष रुपये हिंदुस्थानसरकारकडे पाठवून दिले ही त्यांची कृतज्ञता खरोखर प्रशंसनीय आहे, आणि याचें अनुकरण इतर संस्थानिकही करतील अशी आमची पूर्ण खात्री आहे.

## शिंगाडा.

आह्मां हिंदुलोकांत उपवासाच्या दिवशीं शिंगाड्याचे नानाप्रकारचे पदार्थ तयार करून खातात. शिंगाडा कच्चा व भाजलेला अशा दोन्ही स्वरूपांत खाण्यास चांगला असतो. हा पावसाळ्यांतच पिकतो. याची पेरणी जानेवारी महिन्यांत होते, पण पावसाळा सुरू झाल्यावर याच्या वेली तलावात टाकण्यांत येतात. ज्या तलावांत कार्तिकमार्गशीर्षपर्यंत पाणी असतें अशाच ठिकाणीं शिंगाडे होतात. मात्र हे तलाव उथळ असावें, खोल नसले पाहिजेत. शिंगाडा पैदा होण्यास तलावांचें पाणी स्वच्छ असावें लागतें. घाणेरड्या चिखल असलेल्या गदळ पाण्यांत शिंगाडा होत नाहीं. शिंगाड्याचें बीं दराबिघ्यास एक मण इतकें लागतें. जे शिंगाडे वेलीवरच पिकून तलावांत पडतात त्यांचें बी पेरण्यास चांगलें असतें. आषाढ महिन्यांत चार पांच फूट खोल पाण्यांत शिंगाड्याचा वेल पुरतात. पाणी फार असलें आणि मनुष्याला आंत उतरण्याची सोय नसली तर मातीची रास करून तींत हा वेल घालून ती रास पाण्यांत सोडतात. वेल चांगले वाढले ह्मणजे त्यांची गुंतागुंत काढून त्यांना खुब पसरूं देतात. श्रावण महिन्यांत शिंगाड्याच्या वेलाला फुलें येतात. हीं पाण्याचे वर व आंतही असतात. या वेलाला कीड लागण्याची भीती फार असते. एकदा कीड लागली ह्मणजे मग तिच्यापासून वेलाचें रक्षण करणें फार कठीण असतें. शिवाय पाण्यांतच वेल गळून पडण्याचीही भीती असते. वेल फार दाट झाला ह्मणजे स्वतःच्या वजनानेंच तो खालीं जातो. यासाठीं त्याला एका जागीं दाट वाढूं देऊं नये. वरचेवर त्याची वाढ छाटीत जावी. कित्येक मासेही शिंगाड्याचे वेल खाऊन टाकतात. अशा अनेक प्रकारच्या भीतींतून उरतील ते मालकाच्या हातीं लागावयाचे ह्मणून शिंगाडे महाग विकतात. शिवाय ते सगळ्याच तलावांतून होत नाहींत हें ही त्याच्या महागाईचें एक कारण आहे.

## कुरु क्षेत्र

युरोपांतील कुरुक्षेत्रीं सध्यां लष्करें आरमारें व विमानें यांचे तुमूल युद्ध चालूं आहे. या मनुष्य यज्ञामध्यें सुधारलेलीं राष्ट्रें आपल्या राष्ट्रदेवतेपुढें बळी देत आहेत आणि विद्युत्संदेश असे मौजेचे प्रकार सांगतात कीं क्षणभर जर्मनीची सरशी तर क्षणभरांत त्याचा पाडाव. असे क्षणिक चमत्कार घडत आहेत. बेलजिअम संपून फ्रान्सच्या राष्ट्रांत तूर्त होमकूंड पेटलेलें असून फ्रान्स व इंग्लंड आणि जर्मनी आपापली पराकाष्ठा करून बेलजियमच्या लोकांस स्वातंत्र्याची खरी किंमत कळवीत आहेत. पूर्वेच्या बाजूनें राशिया आपलें ठाणें पुढें पुढें आस्ट्रियाच्या हद्दींत ढकलीत आहे. युद्धाचा हा महा प्रसंग इतिहासांत देखील अपूर्व होय. कोट्यावधी सैनिक आपले प्राण वेचूनही राष्ट्रदेवीसाठीं लढण्यास उभे आहेत. अशा प्रसंगीं इंडियाचें सैन्य त्या लढाईत सामील होत आहे हें पाहून आह्मांस मोठा अभिमान वाटतो.

जे लढाईत प्रत्यक्ष नाहींत त्यांनाही लढाईत हजर असण्याचें श्रेय घेण्याची ही मोठीच सुसंधि आहे. अशा प्रसंगीं खरी राजभक्ती निदर्शनास येते आणि इंडियांतील अखिल दुनिया या लढाईला फूल नाहीं तर फुलाची पांकळी ह्मणून स्वतांची द्रव्यद्वारा, तनुद्वारा, व बुद्धिद्वारा अल्प सेवा अर्पण करण्यास मनोभावें पुढें आली आहे हें पाहून आमच्या राज्यकर्त्यांस या महाद्वीपाच्या थोर उदार आर्यचारित्र्याची आठवण चिरकाल राहील. ब्रिटिशराष्ट्राचा अंगभूत शिरोभाग ह्मणून या पुढें इतिहासकार इंडियासंबंधानें आनंदाचे उद्गार काढतील तरच ब्रिटिशराष्ट्राची ती खरी महती व इंडियाची दानत होय.

लढाईचा शेवट कांहींही होवो, ब्रिटिश राज्या बरोबर आह्मी पडूं किंवा उभे राहूं. आमचें सर्वस्व त्या राष्ट्राच्या भाग्योदयांतच परमेश्वराच्या रसायनक्रियेनेंच एकरूप व समरस झालेलें आहे.

केसरीकारांनीं पोलांडला रशियानें स्वराज्य दिलें हें सांगतांना इंडियाच्या कितीतरी भावी महत्वाकांक्षा आपल्या प्रातिभा दृष्टीनें ध्वनित केल्या आहेत पण त्या पेक्षांही स्वराज्याच्या उच्चशिखरावर पोचलेल्या परिणत स्थितीचें चित्र ह्मणून आमचे डिपुटी कमिशनर राजश्री देवर साहेब आकोल्याची व्हालंटीअर पलटण नमुन्या दाखल उभी करण्यास मोठ्या आल्हादानें सज्ज आहेत. सारांश स्वराज्यापेक्षांही बहु मोलाचें प्रीतीरसायन या लढाईच्या द्वारें हिंदी प्रजा व इंग्लिश प्रजा यांच्या मध्यें खेळून भेदाभेद सर्व नष्ट होतील आणि श्रीमंत चक्रवर्ती जार्ज हे इंग्लंड व इंडिया या मधलि राजकीय स्वातंत्र्य पूर्ण शिखराला पोचवितील असाच कालाचा ओघ दिसत आहे.

### दिग्विजय

( जर्मनीची महत्त्वाकांक्षा )

जर्मनीचें मनोराज्य कीं सर्व पृथ्वी आपल्या छत्राखालीं पाहिजे. ही दिग्विजयाची महत्त्वाकांक्षा कधींच कोणाची सिद्धीस गेलेली नाहीं. सत्ताची लक्ष्मी दुपारच्या सावलीप्रमाणें चंचल व अस्थिर असून कोणाच्या हातीं लागणारी नाहीं. पृथ्वीचें साम्राज्य पराक्रमाने मिळत असतें तर तें विश्वबंधुत्वानेंच साध्य होणारें आहे ही गोष्ट मोठमोठ्या राष्ट्रांस शिकविण्यासाठींच हें घोर रणकंदन माजलें आहे. जर्मनी तरी आवेशांत आहे. त्याचें सैन्य बेल्जममध्यें आपलें ठाणें बसवून फ्रान्सच्या राजधानीकडे वळलें आहे. पारीसचे लोक शहर सोडून जाऊं लागले आहेत. त्यांची राजधानी पारीस असून बोर्डो शहर झालें आहे. जर्मनी इटलीला आपल्या मदतीला ओढूं पहात आहे. इटली तटस्थपणा धरून आहे. या महायुद्धांत कोठें कोठें जर्मनीची सरशी आहे पण फ्रान्स व इंग्लंड यांच्या पुढें फार काळ टिकाव धरण्याची धमक राहणार नाहीं. जर्मनीची पूर्वेकडील बाजू थोडी प्रबळ खरी पण पश्चिमेकडे रशियन सैन्यानें आस्ट्रियाची दाणादाण उडविली आहे. ४० हजार आस्ट्रियन कैदी केले आहेत. पारिस येथील किल्ले जर्मनीस १८ मैल लांबीवर तोफांच्या मारांनी योपवून धरतील असा रंग दीसतो.

या लढाईत कोण पडतो, कोण जगतो व कोण विजयी होतो हें एक भविष्यकालच जाणूं शकेल. पण राष्ट्रपुरुषासमोर जे आपले प्राण खर्चतील ते धन्य, त्यांचें कुल धन्य, व त्यांचा देश धन्य होय. या मृत्यु यशश्री पेक्षां अधीक मोल्यवान मानतात आणि म्हणून तेथें हर्षविषादाला स्थळ नाहीं. समरीं मरण हाणजे अमृत प्राप्तीच होय.

---

## व-हाडवृत्त

हवामान — अलीकडे शेतकऱ्याचे डोळे अगदीं चातकाप्रमाणें ह्मणतात तसे पावसाकडे लागून राहिले होते. क्वचित पिकें सुकण्यासही आरंभ झाला होता. परंतु गेल्या शनिवारीं रात्रीं सरासरी १२॥ वाजेपासून सकाळीं सात साडे सात वाजे पर्यंत एक सारखा पाऊस पडला. पाऊस जोराचा नसून रिप रिप पडल्यामुळें तो सर्व शेतांत जिरला व पिकांना फार फायदा करील यांत शंका नाहीं. अन्य वृष्टी अगदीं वेळेवर व जशी पाहिजे तशी झाल्यामुळें शेतकऱ्याच्या करपू लागलेल्या आशेलाही या वृष्टीनें नवीन अंकूर फुटूं लागतील ! अधिक पाऊस पडण्याचीं चिन्हें दिसत आहेत. पेरणी असली तरी किरकोळच आहे.

रा. रा. दत्तात्रय विठ्ठल उर्फ दादासाहेब रजाने, बी. ए. एलएल्. बी. आसिस्टंट कमिशनर, आकोट व बाळापूर भाग, यांची बुलढाणा जिल्ह्यांत बदली झाल्याबद्दलचें वर्तमान प्रसिद्ध झालें आहे. हे मोठे हुशार, रुबाबदार व मायाळू आफिसर असल्यामुळें लोकप्रिय झाले होते. हे या जिल्ह्यांत व विशेषतः आकोट बाळापूर भागालाच पुष्कळ वर्षें होते. आपल्या आकोला जिल्ह्यांतील परस्पर सहकारित्वाच्या चळवळीला आज जें मूर्त स्वरूप आलें आहे त्याचें बहुतेक श्रेय दादासाहेबांसच दिलें पाहिजे. त्यांच्या बदलीमुळें येथील सेंट्रल ब्यांकेचें व या चळवळीच्या प्रसाराचें काम थोडें तरी स्तंभित झाल्यावांचून रहाणार नाहीं. सहकारी पेढ्यांचें काम त्यांच्या इतर सरकारी कामाचा भाग असूनही तें काम पहात असतां आपल्या सरकारी मॅजिस्टेटी अधिकाराचा त्या कामावर दुष्परिणाम होईल अशा तऱ्हेनें न वागण्याची ते विशेष खबरदारी घेत असत. या त्यांच्या बबर मनोनिग्रहामुळें पतपेढ्यांच्या व सेंट्रल ब्यांकेच्या चालकांस हे चळवळीचे जीव कीं प्राण असल्याप्रमाणें वाटावें हें अगदीं स्वाभाविक. यांच्या बदलीमुळें बुलढाणा जिल्ह्यांतील चळवळीसही जर इकडच्याप्रमाणेंच लाभ झाला तर तोही आपणास इष्टच आहे !

सर हेनरी ड्रेक ब्रॉकमन, केटी. हे रजेवरून आल्यावर ज्युडिशियल कमिशनर मध्यप्रांत, या आपल्या जागीं रुजू होणार आहेत. त्यावेळा पुनः आलें हें न्यायखात्याचें मोठें भाग्य होय.

रा. रा. एल्. एफ्. हालीफॉक्स, ॲडिशनल ज्युडिशियल कमिशनर हे एक वर्षाच्या सिक रजेवर जाणार आहेत.

रा. रा. आर. सी. एच्. एम्. किंग, आय. सी. एस. यांस रजेवरून बोलावून इंस्पेक्टर जनरल ऑफ पोलीस मध्यप्रांत या जागीं नेमण्यांत आलें.

रा. रा. लक्ष्मी नारायण अगरवाले, डिस्ट्रिक्ट जज्ज, छिंदवाडा यांची बदली आकोल्यास ॲडिशनल डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज्जाच्या जागीं झाली आहे.

त्या मुळें रा. रा. गोपाळ वामन बापट डिस्ट्रीक्ट जज हे पुनः येथील स्मालकाज कोर्टाचे न्यायाधीश आहेत.

रा. रा. दिगंबर कृष्ण कोल्हटकर हे येथील स्मालकोर्टावरून सिनिअर सबजज्ज कोर्ट, आकोला यांच्या जागीं काम पाहूं लागतील.

आणि रा. रा. रामनारायण त्रिवेदी सिनियर सबजज्ज, आकोला यांस खामगांव येथील सबजज्ज कोर्टावर नेमण्यांत आलें.

जाहिरसभा:— आज रोजीं सायंकाळीं मे. एफ्. डेवरसाहेब डिपुटी कमिशनर यांच्या अध्यक्षतेखालीं या जिल्ह्याची जाहिरसभा 'इंपिरिअल इंडिअन रिलीफ फंडासाठीं' वर्गणी गोळा करण्यासाठीं श्रीराम नाटकगृहांत भरणार आहे तेव्हां सर्व लहानथोर मंडळींनीं या सभेला अवश्य हजर राहून आपापल्या इच्छेप्रमाणें व अनुकूलतेप्रमाणें वर्गणी रोख तेव्हांच्या तेव्हांच सादर करावी ह्मणजे पुष्कळसा खटाटोप वाचतो आणि वर्गणी देण्याचें श्रयही त्या मानानें जास्त आहे हें देश, काल व पात्र यांकडे पाहून आपला उदार हस्त पुढें करणाऱ्या पैशानें श्रीमान किंवा मनानें श्रीमान गृहस्थास निराळें सांगावें लागत नाहीं.

चंद्रग्रहण - गेल्या शुक्रवारचें चंद्रग्रहण ढगामुळें अगदींच दृश्य नव्हतें; पण रात्रौ सुमारें ९। च्या सुमाराला चंद्रबिंब ढगांला इतस्ततः सोडून ९० अंशावर अंधूकपणें दिसलें तेव्हां तें पूर्णपणें शुद्ध व अविकृत असें होतें.

रा० रा० देवीराम कोंडजी मराठे नाझर, निसबत डिस्ट्रीक्ट आणि सेशन जज्ज, आकोला यांस कालज्याच्या विकृतीनें गेल्या शनिवारीं अगदीं पहाटेस अकस्मात देवाज्ञा झाली. हे शरीरानें धीप्पाड व मजबुत असून इतक्या स्वल्प मोदतीनें ते रामराम करितील असें कोणासही त्यांच्या शनिवारच्या कचेरींतील कामकाजावरून कल्पना नव्हती. ते जवळ जवळ पेनशनीला आले होते. हे स्वभावानें मोठे आर्जवी, अंगमेहनती व कार्यतत्पर असत त्यामुळें व वाढत्या अनुभवामुळें त्यांच्या तोडीचें विद्वान माणूस देखील इतकीं बहुविध कामें करूं शकणार नाहीं. चालू वर्षांत त्यांच्या मनाला धक्का विशेष बसला व त्याचा परिणाम कालजावर घडला असावा असें डाक्टर ह्मणतात. यांच्या परिश्रमानेंच बेडर जात पंक्तिपावन होऊन मराठे जातीच्या अधिकाराला येऊन पोचली आहे. हे गृहस्थ सर्वांच्या उपयोगी पडत असत आणि त्यांच्यामध्यें उपकाराबरोबरच क्षमेचा सद्गुण मोठा होता. अशा चांगल्या गृहस्थाच्या मृत्यूमुळें त्यांच्या परिचयांत येणाऱ्या सर्व आबाल वृद्धांस नेहमीं त्यांची आठवण होत जाईल. बहुतेक सार्वजनिक कामांत राजश्री देवीराम हे मनोभावानें झटत असत आणि युरोपियन अधिकाऱ्यांचे तर हे विश्वासूक हस्तक असत. त्यांच्या घराण्याचा हा लौकिक त्यांची पुढील पिढी कायम ठेवील असा आह्मांस भरंवसा आहे.

---


श्री

हर्ष! हर्ष!! हर्ष!!!

**स्वार्थ आणि परमार्थ यांची लूट!!**

**प्रालब्धाच्या परीक्षेची संधि!**

त्वरा करावी. समय चुकल्यावर पश्चाताप होईल.

चोपाई.

रामकृपा जिहींपर जब होई ॥
रंक होय धनपति महि सोई ॥
सो हरिकृपा होइ फुरजाना ॥
त्यागहु जिनप्रभू आस मुनाना ॥१॥

एक लक्ष --किंवा --पन्नास हजार - किंवा पंचवीस हजार इत्यादि अधिकांत अधिक एक लक्ष आणि कमींत कमी पंचवीस रुपये पर्यंत जसें ज्याच्या भाग्यांत असेल ते केवळ दोन रुपयामध्यें लाभ मिळतें.

या विषयीं संपूर्ण निश्चय करण्यासाठीं दोन रुपये मनीऑर्डरने पाठवावेत अगर एक कार्ड लिहून पाठवावें. ही मामुली जाहिरात नाहीं. यावर विश्वास ठेविला पाहिजे.

पत्ता:- सेक्रेटरी,
पुण्य विभाग सभा,
धोलपूर रियासत-राजपुताना.

नो. नं. १६


### नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

कि० मुकदमा नंबर ६४ सन १९४१ ई० विद्यमान डी.. जडज्य साहेब यांचें कोर्ट

मुकाम आकोला

नांव सखाराम
बापाचें नांव जानजी
जात माळी राहणार घानेगांव
तहसील खामगांव जिल्हे बुलडाना
च्या अल्पवयी सुपडाजी नीनाजी उमर वर्षे १०
राहणार घानेगांव तहसिलीचे ( २ )
साठीं पालन कर्ता ( १ )
नेमण्या विषयींच्या अर्जा संबंधीं
( ३ )
सर्वत्र लोक यांस

सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें [२]स्वतः व त्याची मालमत्ता साठीं पालन कर्ता नेमण्या

[४] विषयीं अर्ज केल्या वरून सदर्हू अर्जाची मुनावणी व चौकशीची तारीख १ माहे १०

सन १९१४ ई० रोजीं नेमिली आहे, त्या वरून अशीं नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जा बद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जा संबंधीं सर्व मुख्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल असा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज तारीख २ माहे ९ सन १९१४ ई. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली. शिक्का.

G. W. Bapat.
A. D. J.
N. No.17 For
डिस्ट्रिक्ट जज्ज आकोला.

---

### जाहिर खबर

आह्मी रा० रा० नारायणसिंग बधुसिंग रजपुत यांस ता० १३।३।१९१४ रोजीं कूलमुखत्यार दुसऱ्या दोन इसमा बरोबर नेमिलें होतें पण त्यांचें कामकाज व हिशोब ठिशोब आह्मांस पसंत न पडल्या मुळें आह्मी त्यांस मुखत्यारी वरून काढलें आहे तर त्याच्या बरोबर कोणी देवघेव किंवा व्यवहार जर करितील तर त्याच्या संबंधानें ज्याचा तो जबाबदार राहील. कळावें. ता० ६।९।१९१४ इसवी.

सही.
राधाबाई भ्रतार किसनलाल
नो. नं १८ दस्तुर. खुद.

---

### नोटीस

नोटीस देणार गंगाबाई भ्रतार देवराव भगत राहणार पांढरकेवडा ता० केळापूर जि० येवतमाळ यांजकडून

हरी सखाराम बुरंगे राहणार लॉग नजीक मोवड ता० मोर्शी जि० उमरावती यास:--

नोटीस देण्यांत येते कीं मेत रामचंद्र रा० लींग ता० मोर्शी जि० उमरावती याची जिनगी स्थावर जंगम दागदागीने दस्तऐवज देणें घेणें हिशेब कागद वगैरे आपले ताब्यांत अन्यायानें आहेत. मेताच्या वरील सर्व इस्टेटींची मी कायदेशीर वारस व मालकीण आहे. सदर्हु इस्टेट माझे ताब्यांत देण्याकरितां तुम्हांस पुष्कळ वेळ सांगितलें व कळविलें. परंतु त्याप्रमाणें आपण अजुनपर्यंत कांहीं व्यवस्था केली नाहीं. करितां पुनः या नोटीशीनें कळविते कीं वरील सर्व इस्टेट आज तारखेपासून पंधरा दिवसाचे आंत माझे ताब्यांत देऊन माझी पावती घ्यावी. आजपर्यंत इस्टेट माझे ताब्यांत न दिल्यामुळें लोकाकडून देणेघेणे मुदतीबाहेर गेलेमुळें वगैरे झालेले सर्व नुकसानीबद्दल तुम्ही जबाबदार आहांच व पुढें माझे ताब्यात इस्टेट न दिल्यामुळें व कर्ज वसुल करण्यांत दिवस गेल्यामुळें वगैरे जें नुकसान होईल त्याबद्दलही जबाबदार तुम्हीच आहांत. तरी मी बायको जात असल्यामुळें मला विनाकारण त्रास देता तसा न देतां माझे बापाची सर्व इस्टेट माझे ताब्यांत देऊन पावती घ्यावी. कळावें ता. ३१।८।१४ सही

गंगाबाई जवजे देवराव भगत इची बांगडी असे

नो. नं. १९

## नोटीस

रा० रा० नारायणसिंग नथुसिंग रजपूत राहणार अकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझ्या दुकानच्या जमाखर्चाच्या वहींत तुमच्या हातचे जे जमाखर्च आहेत त्या संबंधानें मला गैरविश्वास वाटल्यावरून मी तुम्हांस कुलमुखत्यारीवरून काढून टाकून मुखत्यारपत्रांतील तुमचें नांव रद्द केलें आहे. ही गोष्ट गेल्या आगष्टच्या प्रारंभाला केली. तुमच्या पुष्कळशा व्यवहाराविषयीं मला शंका आल्या. हे पाहून तुम्ही उलटा आम्हालाच धाक दपटा दाखवूं लागला. तुम्हाला दुकानांत येण्याची मनाई केली व तुमचा मुखत्यारपत्रांतील अधिकार काढून घेतला तेव्हांपर्यंतच्या व त्या नंतरच्या सर्व जमाखर्चाबद्दल तुम्ही जबाबदार आहां इतकेंच नाहीं तर प्रसंग विशेषीं अदालतीतून योग्य ती तजवीज करणें आम्हांस भाग पडेल. सर्व नुकसानी संबंधानें तुम्ही व तुमची जिनगी जबाबदार राहील कळावें. ता. ५।९।१९१४

सही

राधाबाई जवजे किसनलाल

दस्तर खुद.

नो० नं० २०


## सेंटचा राजा

वापरून तर पहा!!

# ओटो सुगंधीचा भांडार दिलचमन

(रजिस्टर्ड)

आजपर्यंत बाजारांमध्यें निघालेल्या सर्व सेंट, अत्तर, यापेक्षां हे ओटो दिलचमन जास्त टीकाऊ मधुर आणि अधीक खुशबोदार आहे अशी आम्ही पुरी खात्री देतों. जर तुम्ही ओटो दील-चमन वापरला नसेल तर, एक वेळ वापरून खातरी करून घ्या. व ह्यांत स्पीरीट बिलकूल नाहीं, चमेली आणि बटमोगरांच्या ताज्या फुलांच्या अर्कापासून तयार केलेला आहे. फक्त २, ३ थेंब रुमालावर किंवा वस्त्रावर टांकल्यानें एकदम अनेक सुगंधाचा भांडार प्रस्तुत होऊन तुमच्या आसपासच्या सर्व लोकांच्या मनास आनंद होईल.

किंमत -॥- ड्रामची टयुब ८ आणे | किंमत -॥- औंसाची बाटली २ रुपये.
" १ " " १२ आणे | व्ही. पी. पी. खर्च वेगळा,

ओटो दीलचमनची सुगंधी कार्डें दर डझनास १२ आणे,
सेंटच्या नमुन्यासाठीं दोन आण्याचीं टिकीटें पाठवा.

सेंट, ओटो किंवा सुगंधी कार्डें खरेदी करतेवेळीं ओटो दीलचमन हें नांव बरोबर वाचून पहावें. जर तुमच्या जवळच्या दुकानदाराकडे मिळत नसेल तर, खालील पत्त्यावर लिहून माल मागवावा.

एकटे एजंटस्

## एच. आर. मोदी आणि कं.

तारेचा पत्ता "ऐकेरॉन" मुंबई. } विलायती औषधें व परफ्युमरीचे व्यापारी
नं. २१ प्रिन्सेस स्ट्रीट, किटसमोर मुंबई.



अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ॥ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्त —ओरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. २२



## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनाविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी साळ्याचें तेल,

किंमत रुपये ५ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

परमा सायरप.

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.


ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० २३



सतत ५० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगीक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुळे पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

मालक-- डा. गौतमराव केशव, आणि सन्
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई. नंबर २.

| | |
|---|---|
| तांबूल नवरत्न | न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे. |
| नवरत्न टेबलेट | उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किमत डबीस तीन आणे. |
| नवरत्न तमाखु | पानांत खाण्यांची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा. |
| मद्रासी नस | अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे |
| गजकर्णाचें मलम | गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे. |
| केश काढण्याचें तेल | केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे. |
| चन्द्रकान्त बाम | मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे. |

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आंकोल्याचे सोल एजंट– चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार– आकोला.

नो. नं. ११

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

उलटी, झाडा, संधिवात, फॅपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरियनचें जीवनमिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ८१२

वी. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो. नं० १३

## Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

### FUNDS, 4½ CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

### Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4,68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80,05,818 |
| 1898 | 31,36,422 | 1,41,32 356 |
| 1903 | 41,07,009 | 2,19,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

### RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL


Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**

CHIEF AGENT,

N. No. 12 *C.P. Berar & Khandesh,* NPU.

## घड्याळ फुकट मिळेल



( आमके आम और गुठलियोंके दाम )

गजकर्णाचे [ दाद ] रामबाण मलम किं. ४ आणे दराची १२ शीशी ३ तीन रुपयांची घेणारास टाइमपीस घड्याळ फुकट मिळेल. २४ शिशी एकदम घेणारास खिशांतील [ जेब ] घड्याळ फुकट मिळेल. औषध विकून घड्याळ फुकट वापरा.

आमचे कारखान्यांत, सर्व प्रकारचीं पुस्तकें, औषधें, घड्याळा वाचेस, सुगंधी सामान, तेलें, अत्तरें वगैरे योग्य किंमतीनें मिळतात. आमचा मोठा क्याटलाग फुकट मागवा. तसेंच आपण आपल्या व आसपासचे गांवातील लिहीणदार माणसाचीं ५० पन्नास नांवें पूर्ण पत्त्यासह लिहून कळविल्यास मनोरंजक पुस्तक पाठवू.

१ टेबलावर ठेवण्याचें टाईमपीस घड्याळ १॥ रु.

२ रास्कोप सीस्टिम [ खिशांतील घड्याळ २ रु.

पत्ता जयचंद्र कंपनी ( वर्धा सी. पी.)

नो. नं. १४

सातारचे प्रसिद्ध कोल्हटकर राजवैद्यकृत

## कस्तुरीच्या गोळ्या

यापासून अपस्मार वायू-ज्यांस बाळग्रह फीट्स [ हिस्टेरिया ] फेंपरें मिरगी, वतारणें, आंकडी धुरे ह्मणतात तो आजार, लहान मुलें व मोठीं माणसें यांचा नवा जुना आजार खात्रीनें बरा होतो. तसेच बहुतेक सर्व ज्वर अर्धांग वगैरे वायू बरे होतात. १ रुपयां पासून वर कितीही किंमतीच्या गोळ्यांच्या बाटल्या माहितीचे कागदासह विकत मिळतात. रोखीनें अगर व्ही. पी. नें मागवा. विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें. याशिवाय बहुत प्रकारच्या मात्रा, गोळ्या, भस्में, आंसवे, वातहारक तेलें विकत मिळतात.

सखाराम अप्पाजी कोल्हटकर वैद्य,

ठाकुरद्वार रोड हरकुवरबाई नवी चाळ, मुंबई नं० २

नो० नं० १९

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

## Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला--- सोमवार तारीख १४ माहे सप्टेंबर सन १९१४ इ० [ अंक ३६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील- नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप-याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।२।०१ { J. G. Ridland. एजंट

नो. नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि अमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. शिल्लकाकार्ले जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६३/४ तोळे असतें.

मुंबई बँक आकोला २१९-१० { J. G. Ridland. एजंट

नो. नं० २

### चांदीचीं भांडीं.

विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व बाददार भांडीं आमचे कडे विक्रीस तयार असतात. माल माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ३

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. ( Natl ) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3. Mouthly Dissections.Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Hon'ble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN 301, *Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 4

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चोकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्हीपीनें रु० १८६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

पता—वैद्रे आणि कंपनी पुणेसिटी

नो. नं. ५

### अनुभवानें पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमेंट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दपना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, याच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपेंग, व्रण, चिखली, सुकी, ओली खा-ज. जखम, नखाविरपा, तमाम रोगावर चालणारा १ च ' दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो, पैठोक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १। आणे, दिववाद्य पूड किं १। रु० व डोळ्यांतील वेगळे सोडण्याचे किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाल हात मईंचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता – व्ही० आर० मुळे, नांदुरा. जी० आय० पी०

नो० नं० ६

### कुंडलीचें निरीक्षण.

जन्मकाळ पाठविल्यास कुंडलींत कोण-कोणते योग झाले आहेत, व ते काय फळ उत्पन्न करितात, यांचें वर्णन शास्त्रीय पद्धतीनें १ रु० २ आ० व्ही० पी० नें पाठवूं. अनुभव घ्यावा

विष्णु गोपाळ नवाथे
C/o कुंडलीसंग्रहालय, ३ सदाशिव स्ट्रीट पोस्ट—मुंबई नं० ४

नो. नं. ७

श्री

हर्ष! हर्ष!! हर्ष!!!

### स्वार्थ आणि परमार्थ यांची लूट!!

प्रालब्धाच्या परीक्षेची संधि!

त्वरा करावी. समय चुकल्यावर पश्चाताप होईल.

चोपाई.

रामकृपा जिहींपर जब होई ॥
रंक होय धनपति माहि सोई ॥
सो हरिकृपा होइ कुरजाना ॥
त्यागहु जिनप्रभू आस सुजाना ॥१॥

एक लक्ष --किंवा --पन्नास हजार --किंवा पंचवीस हजार इत्यादि आंकिंत अधिक एक लक्ष आणि कमींत कमी पंचवीस रुपये पर्यंत जसें ज्याच्या भाग्यांत असेल ते केवळ दोन रुपयामध्यें काम मिळतो.

या विषयीं संपूर्ण निश्चय करण्यासाठीं दोन रुपये मनीऑर्डरनें पाठवावेत अगर एक कार्ड लिहून पाठवावें. ही मामूली जाहिरात नाहीं. यावर विश्वास ठेविला पाहिजे.

पत्ताः— सेक्रेटरी,
पण्य विभाग सभा,
धोलपूर रियासत-राजपुताना

नो. नं. ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हे औषध घेतल्यानें मागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८८

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० न० ९


### नोटीस

नोटीस शेशमी धनराज गुरु बलदेवप्रसाद ब्रह्मच्यारी रा० महमदपुर प्रो नांदुरा ताोः मलकापुर यासी खाली सही करणार यानकडुन नोटीस देण्यांत येते कीं आपण पोष्ट मार्फत नोटीस पाठविली ती पावली त्यात आपण असे लोहिले कीं १० रुपये इसाराचे घेऊन बाकीचे रुपये १४० अक्षरी एकसे च्याळीस घेऊन खरेदीखत नोंदुन देणे परंतु ही गोष्ट तुमची लबाडीची आहे कारण सर्वे नंबर १ त्या सेताबद्दल आपण तितकीच जमीन मला गोपाळ मारुती पाटील रा० महमदपुर प्रो नांदुरा याची जमीन सडकच्या पुर्वेकडील व वर्ताळा रुपये १५० अक्षरी दीडसे त्यापैकीं १० रुपये मी इसाराबद्दल घेतले आहे तरी ती जमीन मला खरेदीखत नोंदुन व बाकी १४० रुपये वर्ताळा देऊन नोंदून घेणें ही गोष्ट पंचासमक्ष झाली असून आपण १॥ महीना झाले स्तब्ध बसले व मी असे ऐकतों कीं मला जी माझ्या जमीनीऐवजी जमीन नोंदुन देणार होते ती जमीन त्यानें दुसऱ्याला नोंदून दिली आहे. तरी त्या जमीनीबद्दल चुनीलाल पीतांबर पांडे रा० आमदपुर प्रो नांदुरा याने आपले मळ्यांतील जमीन पंचासमक्ष नोंदुन देण्याचें कबूल केले आहे. तर आपण नोटीस पावल्यापासून ८ आठ दिवसाचे आंत १४० रुपये व तीतकीच जमीन दोही जमीनीपैकीं १ जमीन नोंदून देणे व माझे कबलून तीतकीच जमीन नोंदुन घेणे अगर तसे न केल्यास कोर्ट मार्फत फियार्द करूं व त्या फीर्यादीचा सर्व खर्च आपणास द्यावा लागेल. कळावे ता० ६-९-१४ ईसवी

सही

सुखदेव वा॥ मारुती कुणबी दः खुः

नो. नं. १०

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ९ शके १८३६

## ‘ विजयोऽस्तु ते ’
## ( प्रेषित )

पूर्वी ज्या आमच्या देशांतल्या खाणींत कोहिनुरसारखे दिव्य हिरे निर्माण होऊन आपल्या तेजानें साऱ्या जगाचे डोळे दिपविते झाले, त्याच देशांत आतां अमेरिकन कृत्रिम डायमंड ( हिरे ) येऊन लोकांच्या मनाला क्षणभर भुरळ पाडीत आहेत, आणि हे अमेरिकन हिरे खऱ्या हिऱ्याच्या तोंडांत मारतील अशीं प्रशंसापत्रें मिळवीत आहेत. तोच प्रकार विद्वत्तेसंबंधानेंही झाला आहे कीं काय तें कळत नाहीं, पूर्वी ज्या आमच्या देशांत एकेका शास्त्राचें तपेचींतपें अध्ययन करून त्यांत गाढ विद्वत्ता संपादणारे आचार्य निर्माण होत, त्याच देशांत आतां इकडे युनिव्हर्सिटींत प्रवेश होईना ह्मणून कंटाळून जर्मनी, अमेरिका, वगैरे परदेशीं गेलेले तरुण तीनचार वर्षांत पी. एच. डी. हें आचार्यपद संपादून इकडे येतांच आमच्यांतल्या ‘ पराविद्या ’ आणि तींत प्रावीण्य संपादणारे आचार्य यांना बाष्कळ ठरवूं पाहण्याचा प्रयत्न करून विद्वत्तेबद्दल वाहवा मिळविण्यांत अहमहमिका लावीत आहेत. पंचवीस वर्षांपूर्वी डॉक्टर सर रामकृष्ण भांडारकर यांना जर्मनीतल्या एका युनिव्हर्सिटीनें प्रथम पी. एच. डी. ही पदवी त्यांची थोर विद्वत्ता पाहून दिली. पण आतां पावसाळ्यांतल्या गांडुळाप्रमाणें प्रांतोप्रांतीं पी. एच. डी चमकूं लागले आहेत; आणि वर्षाऋतूंत डराव डराव करणाऱ्या बेडकांप्रमाणें भेसूर सूर काढून आह्मांस सामवेदपाठक ह्मणा असा जणू काय अट्टहास त्यांनीं चालविला आहे. हे विचार सुचण्यास कारण असे एक कृत्रिम भेकरूपी आचार्य आमच्या या वऱ्हाड प्रांताला लाभले आहेत त्यांनीं ‘ उषा ’ मासिकाच्या द्वारें ब्राह्मणांच्या परंपरागत विधिसंबंधानें काढलेले उद्गार होत. गेल्या सालीं याच वर्षाऋतूंच्या सुमारास या भेकानें आज हजारों वर्षें लोकांच्या हृदयमंदिरात आपल्या पवित्र आचरणानें व अलौकिक प्रभावानें पूज्यस्थान पटकावणाऱ्या गौतम बुद्धावर अपशब्दांचा वर्षाव केला होता. यंदा हा भेकध्वनि ब्राह्मणांचा परमार्थ यासारख्या उच्चमत विषयाच्या व न्या. मू. रानडे, डा. भांडारकर, प्रिं. आगरकर या साऱ्या सुधारकांच्या निंदावादाला प्रवृत्त झाला आहे. डा. श्रीधर व्यंकटेस केतकर यांना ही सगळी मंडळी ‘ मर्कटवृत्ति व पोपटपंची करणारी ’ वाटत आहे. ठीकच आहे. जेथें बुद्ध लबाड ठरला तेथें त्याला पूज्य मानणाऱ्या या आधुनिक सुधारक मंडळीला ‘ मर्कटवृत्ति व पोपटपंची ’ याहून दुसरें कोणतें शेला पागोटें मिळावयाचें?

डा० केतकर यांचें ह्मणणें तरी काय आहे ते प्रथम आपण पाहूं. ते ह्मणतात कीं सहत कार्य करण्याची संधी व राज्यचालनाची जबाबदारी हातची गेल्यामुळें सरकारी साधनाच्या कल्पनांनीं आमच्या लोकांची डोकीं बहकलीं आहेत, व. जबाबदारी नसली ह्मणजे प्रत्येक असाच बोकाळत असतो. लोक अलीकडे थिओसोफिस्ट होतात यांतलें बीज तरी हेंच आहे. आमच्या धर्मोपदेशकास सामाजिक व राजकीय कल्पनांची भावना नसल्यामुळें ते दुष्ट व षंढ ठरले पाहिजेत. धर्मशास्त्रासारख्या विषयावर सुद्धा मत देण्याची पात्रता शास्त्री लोकांत राहिली नाहीं. अर्थांत धर्मनियमन करण्याचा त्यांचा अधिकार इंग्रजी शिकून समाजशास्त्राचीं तत्वें जाणणाऱ्या लोकांनीं आपल्या हातीं घेतला पाहिजे. पण तें काम रानडे, भांडारकरसारख्यांनीं केलें नाहीं, तेव्हां तेही मर्कटवृत्ति व पोपटपंची करणारेच होत. येथपर्यंत मजल मारल्यावर पुढें एक पाऊल टाकावयाचें तें डा. केतकर यांची विनीतवृत्ति त्यांना टाकूं देईना. ह्मणून त्यांच्या मनांतला आशय आमच्या साऱ्या तिऱ्हाईतांना व्यक्त करून दाखविणें भाग आहे. तो हा कीं जें काम डा. भांडारकर, रानडे यांना करतां आलें नाहीं तें शास्त्रीवर्गाला शिव्या देण्याचें काम आह्मी करीत आहों व समाजनियमनाची अपूर्व संजीवनी विद्या आह्मी पाताळ लोकाहून आणिली आहे. तेव्हां आह्माला शंकराचार्यांच्या पदावर स्थापित करून आमच्यापुढें सर्वांनीं लोटांगणें घालावीं हें योग्य आहे.

आचार्यपदाच्या प्राप्तीविषयीं बुभुक्षित झालेल्या डा. केतकराची अशी ही चपेटपंजरी वाचून कोणालाही गंमत वाटेल, आणि तनलज्जा व मनलज्जा यांचा त्याग करतांच मनुष्य कसा सर्वत्र विजयी होऊं शकतो याचीही प्रचीती त्याला येईल. डा. केतकर यांच्या विचारसरणीचा गंभीरवृत्तीनें विचार करण्याचें कारणच नाहीं. त्यातलें इतिहासविषयक ज्ञान, तर्कशास्त्र, शब्दयोजनेची पद्धती सगळींच कांहीं इतकी अपूर्व आहे कीं नवीन एखादे नाटक लिहूं पाहणाराला विदूषकाच्या तोंडीं जोरदार भाषण घालण्याची अडचणच पडावयाची नको. परमार्थसाधन हा संहत प्रयत्नानें साध्य करण्यासारखा विषय आहे कीं व्यक्तिविषयक प्रयत्नाचा विषय आहे, आणि तो साधण्यांत जबाबदारीचें संपूर्ण विस्मरण होणें अवश्य आहे कीं तें अत्यंत श्रेष्ठ प्रतीची जबाबदारी ओळखणें आहे. धर्मोपदेशकास राजकीय भावना नसल्यामुळें जर ते षंढ ठरतात, तर एखाद्या पी. एच. डी. ला विसाड्याच्या कामाचें ज्ञान व अनुभव नसल्यामुळें तो षंढ का ठरूं नये, इ. इ. तर्कवार व युक्तिवार उन्माद झालेल्या रोग्यांशीं करणें जितकें व्यर्थ आहे तितकेंच डा. केतकर यांच्याशीं करणें व्यर्थ आहे. कारण उघडच आहे कीं ज्याला बेरीज एके - कळत नाहीं त्याच्याशीं गणितांच्या गहन भागासंबंधानें काय वाद करणार! त्याला ऐहिक अर्थ व परमार्थ याच्यांतला ठळक भेद कळला नाहीं त्यांच्यापुढें पंचदशीचें प्रवचन करणाराचीच मूर्खांत गणना व्हावयाची. ह्मणून शेवटीं आह्मी डा. केतकर व त्यांची पाठ थोपटणारे ‘उषा’कार यांना ‘ विजयोऽस्तुते ’ येवढेंच ह्मणून हा लेख संपवितों.

---

## समुद्रांतर्गत सुरुंग

सध्याच्या युद्धाच्या बातम्या वाचतांना अमक्या राष्ट्राची बोट किंवा क्रूझर समुद्रांत सुरुंगाला लागून बुडाली अशा बातम्या वारंवार वाचण्यांत येतात, पण हे समुद्रांतले सुरुंग कशा प्रकारचे असतात त्याची कांहीं कल्पना असल्यामुळें वाचकाला भांबावल्यासारखें होतें. तेव्हां हे समुद्रांतर्गत सुरुंग कसे असतात याची थोडीशी मनोरंजक माहिती येथें देतों.

जमिनीवर विहिरी खोदतांना किंवा डोंगरांतून आगगाडीची सडक करतांना कठीण खडक फोडण्यासाठीं सुरुंग लावीत असतात हें पुष्कळांनीं पाहिलें असेल. त्याच्यापेक्षां शतपटीनें अधिक नाशकरणारे व शक्तिमान् हे समुद्रांतले सुरुंग असतात. यांना इंग्रजींत सबमरीन माइन्स ह्मणतात. हे सुरुंग दोन प्रकारचे आहेत. एक यांत्रिक व दुसरे विद्युच्छक्तीनें पेट घेणारे. पाहिल्यांत दारूला बत्ती देण्याचें साधन त्या दारूपाशींच ठेविलेलें असतें, आणि एखादे जहाज सुरुंगाच्या दारूची पेटी खालीं जड वजन लावून समुद्रांत तरंगत ठेविली असते, तिला स्पर्श करून जाऊं लागतांच त्या पेटींतल्या दारूला बत्ती लागावी अशी विजेच्या बॅटरीची किंवा स्प्रिंगची योजना करून ठेविलेली असते. अर्थात् स्पर्श करणारें जहाज सुरुंग ठेवणाऱ्या राष्ट्राचें असो अगर शत्रूचें असो घर्षणामुळें दारूला बत्ती लागून तें नाश पावावयाचें, तेथें आपपर भेद नसतो. कांहीं मुदतीनंतर या सुरुंगापासून कोणालाही अपाय होऊं नये अशी तजवीज या सुरुंगांत करतां येते, व हे सुरुंग काढूनही घेतां येतात. शिवाय ते किंमतीनेंही स्वस्त असतात. शिवाय हे वर समुद्राच्या पृष्ठभागीं न दिसतील असे ही ठेवता येतात. अशा पुष्कळशा सोयी यांत असल्यामुळें अशा प्रकारचेच सुरुंग समुद्रांत पुष्कळ लावून ठेवण्याचा प्रघात आहे.

पण दुसऱ्या ह्मणजे विद्युच्छक्तीच्या सुरुंगांची गोष्ट निराळी आहे. हे सुरुंग आपोआप पेटत नाहीत. तर सुरुंगापाशीं शत्रूचें जहाज आलें आहे असें पाहून किनाऱ्यावर या कामासाठीं दुर्बिण लावून बसलेल्या माणसानें बटन दाबावयाचा असतो. तो दाबल्या बरोबर विद्युच्छक्ती तारांतून दारूंत जाते व दारू पेटून भडका होतो. हे सुरुंग स्वाधीन असल्यामुळें हे पसरलेल्या समुद्रांतून मित्रत्वाच्या जहाजाला सुखानें जातां येतां येतें. शत्रूच्या जहाजाला तेवढी भीती असते. कारण ते जातांना दिसतांच इकडे किनाऱ्यावरून बटनाला धक्का बसून विद्युच्छक्तीचा प्रवाह सुरू होतो, व आपण सुरुंगापाशीं आलों आहों हें कळण्यापूर्वीच्या जहाजावरील खलाशाना जलसमाधि मिळते. हे सुरुंग बहुधा समुद्राच्या पोटांत असल्यामुळें त्यांच्या बरोबर जागा नकाशांत दाखविलेल्या असतात व हा नकाशा किनाऱ्यावरल्या माणसाला बारकाईनें पाठ करून ठेवावा लागतो. या सुरुंगांत गैरसोय येवढीच आहे कीं यांचा संबंध तारांनीं किनाऱ्यापर्यंत आणून पोंचवावा लागतो, व किनाऱ्यावरील माणसाला डोळ्यांत तेल घालून रात्रंदिवस शत्रूच्या जहाजाची मार्गप्रतीक्षा करीत बसावें लागतें.

दोन्ही प्रकारच्या सुरुंगांत स्फोट करणारें द्रव्य एकच ह्मणजे गनकॉटन हें असतें, दोन्ही सुरुंगांत हें द्रव्य पेट्यांतून भरलेलें असतें, मात्र प्रत्येक प्रकारांत पेटीचा आकार भिन्नभिन्न असतो, तर त्या सुरुंगाचा आकार बहुधा गोल असतो, आणि वजन एकेका सुरुंगाचें ९०० पौंड असतें, यांत्रिक सुरुंगाच्या पेटीचा व्यास बहुधा ३९ इंच असून त्यांत १०० पौंड गन कॉटन द्रव्य भरलें असतें. हे सुरुंग आंत हवा ठेवून मुद्दाम हलके ( तरंगते ) केलेले असतात व ते वाहून जऊं नयेत ह्मणून बुडाशीं जाड साखळदंडानें एक वजन बांधलें असतें. विद्युच्छक्तीचे सुरुंग त्यांना किनाऱ्याशीं जोडणाऱ्या तारा तोडून टाकल्या ह्मणजे निरुपयोगी होतात.

अशा रीतीनें युद्धप्रसंगीं सुरुंग घालून शत्रूचा अवचित नाश करण्याचा प्रघात अलीकडेच ५० वर्षांत पडला आहे. तथापि टॉर्पेडोसारख्या नाशक साधनांचा उपयोग त्याच्याही पूर्वीपासून करीत आले आहेत. यांत्रिक सुरुंगांचा पहिला प्रयोग सन १८५४ सालीं रशियानें बाल्टिक समुद्रांत केला, पण त्यावेळीं तो प्रयोग फसला होता. विद्युच्छक्तीच्या सुरुंगाचा उपयोग १८६२–६५ सालच्या अमेरिकन युद्धाचे वेळीं प्रथम यशस्वी रीतीनें करण्यांत आला. फ्रांकोजर्मन युद्धांत व त्यानंतर १८७८ रसो तुर्की युद्धांत ही असे सुरुंग लावून ठेवण्यांत आले होते. पण १९०४–०५ सालीं पोर्ट आर्थरला पडलेल्या वेढ्याचे वेळीं हे सुरुंग लावण्याची व नेमक्यावेळीं ते उडविण्याची खरी कुशलता दिसून आली. असे सुरुंग लावून शत्रुचा घात करणें हा धर्मयुद्धाचा भाग नाहीं अशी तक्रार वेळोवेळीं करण्यांत आली आहे, आणि त्यांचा उपयोग करणें हें सुधारलेल्या राष्ट्रांना लाच्छनास्पद आहे ही गोष्ट हेग येथें १९०७ सालीं भरलेल्या राष्ट्रीयपरिषदेनें ही मान्य केली पण जर्मनीनें त्यावेळीं परिषदेच्या या मताला पुष्टि न देतां यंदाच्या युद्धाच्या सुरवातीलाच सगळ्या जर्मन समुद्रभर सुरुंगांचें जाळें पसरून ठेविलें, आणि सर्व सुधारलेल्या राष्ट्रांनीं एकमतानें ज्या निंद्य गोष्टीचा निषेध केला होता ती गोष्ट सर्वांच्या आधीं करण्यां अग्रेसरत्व मिळाविलें. याचा परिणाम त्या राष्ट्राला केव्हां तरी भोगावा लागणारच आहे. तो काळ केव्हां येणार आहे येवढाच काय तो प्रश्न आहे.

## सांप्रतच्या युद्धाचे परिणाम.

कोत्या दृष्टीच्या आणि केवळ वर वर पाहणाऱ्या माणसाला सध्याच्या युद्धाचे परिणाम ह्मणजे लोकांत उडून गेलेली विलक्षण प्रकारची गडबड; महागाई, फंडा प्रीत्यर्थ द्याव्या लागणाऱ्या वर्गणीचे, जर्मनी आणि आस्ट्रियांतून येणाऱ्या मालाची दुर्मिळता झाल्या पासून होणारे लोकांचे हाल, सोन्याचे चढते भाव नोटा वटविण्यास लागणारी जबर हुंडणावळ, अशाश्वतेची छाया हेच दिसतील. पण ही कोती केवळ वर्तमान कालापुरती आणि ती ही व्यक्तिविषयक गैरसोयी पुरती दृष्टि झाली. पण राष्ट्रपुरुषावर या युद्धामुळे घडणारे दूरचे परिणाम यांत आलेले नाहीत, आणि ते जमेस धरले तर या युद्धाचें जे निराशा जनक भयंकर चित्र कित्येक मंडळी आपल्या डोळ्यापुढें काढीत असते त्याचे वैयर्थ्य उघड दिसणार आहे. सांप्रतचें युद्ध चार महिन्यांत निकालास लागो, किंवा लॉर्ड किचनेर यांनीं अनमास केल्या प्रमाणें पांच चार वर्षें चालो, त्याचे परिणाम जे दूर दृष्टीला दिसत आहेत ते आशा जनक खास आहेत. हे परिणाम निरनिराळ्या देशाच्या परिस्थितीच्या मानानें निरनिराळे होतील, पण त्या सर्वांचा समुच्चयानें विचार केला तर एकंदरीनें मनुष्यजातीच्या प्रगतीला ते पोषकच होतील असें आह्मांस वाटतें. मनुष्यरूपानें संचार करणाऱ्या राक्षसीवृत्तीचा नायनाट होईल. विश्वमैत्री वाढेल, भूत दयेचा पगडा अधिक बसेल. राजकीय बाबतींत गुलामगिरी नष्ट होऊन लोकमताची प्रतिष्ठा वाढेल, स्वदेशी व्यापाराला उत्तेजन मिळेल' लोकांना आपल्या वरची जबाबदारी अधिक कळू लागेल, आणि सर्वांत मोठा व चिरस्थायी परिणाम ह्मणजे पाश्चात्यांची जडाकडे जी प्रवृत्ति आहे ती जोरानें मागें हटून आध्यात्मिकतेकडे वळेल असा आमचा अंदाज आहे. यांपैकीं कित्येक गोष्टींना आतांच सुरुवात झालेली दिसूं लागली आहे, व कित्येकांना झालेली लवकरच दिसून येईल. रशियाचे झार ह्मणजे स्वतःचे हातीं अनियमित अधिकार ठेवून अरेरावी गाजविण्याविषयीं प्रसिद्ध, पण या युद्धांत त्यांचें ही मत पोलडंला स्वराज्याचे अधिकार देण्याकडे आणि ज्यू लोकांना सैन्यांत भरती करण्याला अनुकूळ झालेलें आहे. जर्मन व आस्ट्रियन व्यापार बुडवून हिंदुस्थानचा व्यापार वाढविण्याच्या उद्देशानें उपाय चिंतन करण्यासाठीं स्पेशल आफिसराच्या नेमणुका होऊं लागल्या आहेत. काळ्या लोकांना गोऱ्यांच्या खांद्याशीं खांदा लावून लढण्याचा मान देण्यास सरकार तयार झालें आहे. जर्मनीनें केलेल्या अमानुष अत्याचाराविषयीं तीव्र निषेध जोरानें व्यक्त होऊन भूत दयेला युद्धांतही योग्य स्थान आहे ही गोष्ट शाबीत होत आहे. नायकांचें कर्तव्य ह्मणजे चुलीवर भाताची हंडी चढविणें येवढेंच नसून राष्ट्रीय जागृतीत ही त्या साह्य देऊं शकतात हें सप्रमाण सिद्ध होत आहे. अवघ्या दोनतीन महिन्याच्या अवधींत सृष्टीचें स्वरूप इतकें पालटेल असें कोणाच्या स्वप्नीं तरी आलें होतें काय? आणखी कोण कोणत्या अपूर्व गोष्टी त्या विशाल कालोदरांत भरल्या आहेत हें क्षुद्र मानव बुद्धीस काय ठाऊक!

## मद्यपान प्रतिबंधाचे अन्य उपाय.

हिंदुस्थानांत मद्यपानप्रवृत्तीचें वाढतें पाऊल कमी करण्यास मद्यपाननिषेध सभांचे प्रयत्न पुरेसे नाहींत, त्यांच्या जोडीला अन्य उपायांचेंही अवलंबन केलें पाहिजे असें आज पुष्कळ वर्षें विचारी माणसांना वाटत आहे. पण हे उपाय शोधून काढून ते विचारासाठीं अधिकारीवर्गापुढें व लोकापुढें मांडण्याचें श्रेय शेवटीं पंजाबनें घेतलें आहे. मि. मेनार्ड नांवाच्या एका गृहस्थानें पुढील कांहीं उपाय सुचाविले आहेत, आणि त्यांचा विचार करून त्यांच्या व्यावहारिकत्वासंबंधानें अधिकारी वर्गाचे आणि प्रमुख लोकनायकाचे अभिप्राय मागाविण्यांत आले आहेत, असें 'बंगाली' पत्राचा पंजाबचा बातमीदार लिहितो. हे उपाय ह्मणजे सर्वांनाच मान्य होण्यासारखे आहेत असें नाहींत. तथापि विचार करण्याला एक प्रकारची स्फूर्ति त्यापासून मिळेल येवढा तरी फायदा प्रस्तुत गोष्टीपासून होईल. हे उपाय ह्मणजे देशी गायनवादनाकडे लोकांची प्रवृत्ति करणें, नाटकें व अनाक्षेपणीय असे तमासे व करमणुकीचे इतर प्रकार यांना उत्तेजन देणें, घोड्यांच्या शर्यती, पळण्याच्या शर्यती, कुस्त्या वगैरे शारिरिक खेळांचा प्रचार करणें, फिरत्या सर्कसी, सीनेमोटोग्राफ कंपन्या वगैरेचे द्वारें लोकांचें लक्ष गुंतवून ठेवणें, म्याजिक ल्यांटर्नच्या द्वारें आराग्य व सृष्टिचमत्कार यांच्या ज्ञानाचा प्रसार करणें वगैरे. मद्यपानाचा नुसता निषेध करणें ही अक्रियेची प्रवृत्ति त्या राक्षसी व्यसनाचें निर्मूलन करण्यास असमर्थ आहे असें बऱ्याच वर्षांच्या अनुभवानें ठरल्यावर आतां सरकारनें व लोकांनीं क्रियापर होऊन असे कांहीं तरी प्रयत्न करणें अत्यंत जरूर आहे यांत शंका नाहीं. या बाबतींत पंजाब-सरकारनें लक्ष घालून वरील उपायांचा विचार करण्याबद्दल आणि अभिप्राय पाठविण्याबद्दल सर्क्युलर पाठविलें आहे, ही गोष्ट खरोखर फार महत्वाची व प्रशंसनीय आहे.

## युद्धाचा रंग

इकडे जर्मनीचें सैन्य फ्रान्सची राजधानी प्यारिस हिच्यापासून पंचवीस मैलांच्या आंत येऊन उतरलें, तर तिकडे रशियाचें सैन्य जर्मनीची राजधानी बर्लीन शहर जवळ करीत चाललें आहे. फ्रान्सनें आपली राजधानी तूर्त प्यारिसहून काढून दुसरीकडे नेली आहे, व तेथील रहिवासी ही आपली चीजवस्त घेऊन पळाले आहेत. तेव्हां आतां प्यारिस शहर घेण्यांत जर्मनीला केवळ शत्रूची राजधानी हस्तगत केल्याच्या पोकळ मानापलीकडे कांहीं काम नाहीं. हा मानही मोठासा आहे असें नाहीं. कारण प्यारिस शहर पूर्वीं दोनदां शत्रूचे हातीं गेलेलें होतें. एकदां इंग्रजांनीं तें घेतलें होतें व दुसऱ्यांदा १८७१ साली खुद्द जर्मनीनें तें घेतलें होतें. तेव्हां हा पोकळ मान मिळविण्यासाठीं जर्मनी महिना दोन महिने वेढा घालून बसेल व आपले लाख दोन लाख सैनीकांचे प्राण खर्चीं घालील हें संभवनीय दिसत नाहीं. पण रशियानें बर्लीन शहर हस्तगत करणें या गोष्टीला बरेंच ऐतिहासिक व लौकिकदृष्ट्या महत्व येणार आहे. बर्लीन हस्तगत करणें फार मुष्किल आहे. जर्मनीचा एक लिग किल्ला रशियानें घेतला तेवढ्यावरून शेफारण्यांत अर्थ नाहीं. जर्मनी किल्ल्याच्या मजबुतीसाठीं विशेष प्रसिद्ध आहे. थॉर्न, व दुसरे सुप्रसिद्ध किल्ले हस्तगत करण्यासाठीं रशियाला किती बलिदान करावें लागेल त्याचा अंदाज करतां येत नाहीं. नुसत्या जमिनीवरच नव्हे, तर समुद्रकिनाऱ्यावरही जर्मनीचे मजबूत किल्ले आहेत. तेव्हां तिकडूनही परचक्र येण्याची केसरला भीती वाटत नाहीं या भरंवशावरच रशिया भराभर प्रशियाचा पूर्वभाग आक्रमीत चालला आहे तरी जर्मनी तिकडे विशेष लक्ष न देतां पश्चिमेकडे फ्रान्स व इंग्लंड यांच्याशीं तोंड मिळविण्यांत गुंतला आहे. गेल्या पांच सात दिवसांत लढाईची विशेषशी खबर आलेली नाहीं तथापि निकराची लढाई सुरू आहे येवढें मात्र कळतें. आतांपर्यंत इंग्रजांची १९००० मनुष्यहानि झाली असून जर्मनीची हानि ६२००० झाल्याची खबर आली आहे. जर्मनीला वेळ पडल्यास १ कोट सैन्य उभें करण्याचें सामर्थ्य आहे. त्या मानानें बासष्ट हजार प्राणहानि त्याच्या खिजगणतींतही नसेल. इंग्रज शिपाई थोडेच पण फार नेटानें व हुशारीनें लढत आहेत असें कळतें.

## " आनंद "

### [रा. रा. वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.] यांनीं चालविलेलें.

"मुलाचे पाय पाळण्यांतच दिसतात" अशी एक ह्मण आपल्या मराठी भाषेंत प्रचलित आहे. ह्मणजे मूल उपजल्यावर ते तान्हुलें असतांच हें पुढें कसें निपजणार हें त्याच्या एकंदर चालचलणूक, खेळणें बाऊळ, बाळसें इत्यादिकांवरून कळतें. ह्मणजे साधारण अटकळ करितां येते. फार तर काय मूल आईच्या उदरांत असतानांच आईला होणाऱ्या डोहाळ्यांवरून मुल कसें होणार या बद्दल अनुमान करितां येतें. या वरून काढलेलीं अनुमानें नेहमीं खरींच ठरतात अगर ठरलींच पाहिजेत असा मात्र नियम नाहीं. कित्येक वेळीं तीं खरीं ठरतात तर कित्येकदा अगदीं उलटही ठरतात. कित्येक मुलें लहानपणीं बेंगरूळ, बावळीं, अजागळ अशीं असून तीं मोठेपणीं चांगलीं निपजतात. कित्येक तेजस्वी, चलाख अशीं दिसतात व मोठेपणीं फार चांगली निघतील असें पहाणारांस वाटतें पण अनुभव त्याच्या अगदीं उलट येतो. आणि कित्येक जशीं लहानपणीं दिसतात तशींच मोठेपणींही कायम रहातात. "शुद्ध बीजाचे पोटीं फळें रसाळ गोमटीं" या तुकोबारायाच्या उक्तीप्रमाणें मूल चांगलें निपजणें हें पुष्कळ अंशीं त्याच्या जन्मदात्यांवर अवलंबून असतें. जन्मदात्यांत जे गुणावगुण वसत असतील तेच बहुतांशीं मुलांत उतरतात असा साधारण नियम आहे. जी गोष्ट मनुष्य जातीला लागू तीच एखाद्या संस्थेलाही पुष्कळ अंशानें लागू असते. रा. रा. वासुदेव गोविंद आपटे, बी. ए. यांनीं संपादिलेल्या " आनंदास " ही वरील गोष्टी लागूं पडतात. या आनंदाचा जन्म झाल्यापासून तो आपल्या "बहू गोड बोलक्या बोलानी" सर्वांना एकसारखा आनंदवीत आला आहे. ज्यांच्याकरितां ह्मणून मुद्दाम सुरू केला त्या शिशुवृंदाबरोबर खेळत बागडत, मोठ मोठ्या विद्वान लेखकांच्या व कवींच्या शिकवणी खालीं, आणि स्त्री लेखकांच्या जोपासनेनें, सर्व लहानमोठ्या संकटरूपीं दुखण्यांतून चांगल्या सुखरूप रीतीनें पार पडून, होतां गेल्या आगष्टमध्यें आनंदाचें आठवें वर्ष पुरें होऊन नववें लागलें रा. वासुदेवराव आपट्यांसारखे कसलेले व अनुभवशीर लेखक ज्याचे जन्मदाते, रा. सा. आगाशे वगैरें सारखे विद्वान लेखक व कवि ज्याला सकौतुक, अनुशास्ते मिळाले, व अनेक स्त्रीवर्गाकडून ज्याची सप्रेम जोपासना झाली आणि अनंत बालगोपालाबरोबर सदैव ज्याचे आनंदांत दिवस गेले अशा भाग्यशाली "आनंद" बाळाची चांगली सुखरूपपणें व सुदृढपणें वाढ होऊन आठ वर्षें पुरीं झालीं व त्यास गेल्या महिन्यापासून नववें वर्ष लागलें ही मोठी आनंदाची गोष्ट आहे यांत शंका नाहीं. तुटतुटीत अंगलोट, वर्ण गोरा' डोळे पाणीदार, बोलणें गोड, सदा हसतमुख व आनंदी असें एखादें बालक असलें ह्मणजे तें प्रत्येकाला आवडतें व प्रत्येकाच्या मनांत प्रेम उत्पन्न करितें. या प्रेमाला जातिभेद नाहीं. शुद्ध व निर्व्याज असें हें प्रेम असतें. त्यामुळें बालक अमक्या जातीचे आहे अगर अमक्या व्यक्तिचें आहे तेव्हां याचर आपण प्रेम करतां उपयोगी नाहीं असें प्रेम करणाराचें मनांत येत नाहीं किंबहुना त्याचे मनांत असलें तरी त्याचा विसर पडतो. अशा मुलाला पहातां क्षणींच त्यास उचलून घेऊन त्याचें प्रेमपूर्वक चुंबन घ्यावेंसेंच प्रत्येक पहाणाराला वाटतें. आनंदावर वडिलांचा पूर्ण लोभ व बालमंडळीचे अढळ प्रेम राहिलें याचें इंगीत तरी हेंच आहे. या आनंद बाळाचे गुण तसेच असल्यामुळें त्यास साहेब लोकांकडून खाऊसाठीं व आंगी टोपी साठीं, तसेच राजे रजवाड्याकडून दुध दुभत्या साठीं मदत मिळाली व मिस एमिली बाइ सारख्या पाश्चिमात्य बाईच्या मनांत प्रेम उत्पन्न करून तिनें त्याच्या शंभर प्रती घेऊन कौतुक करावें यांत नवल नाहीं. सत्य संकल्पाचा दाता भगवान या उक्ती प्रमाणें आनंदाच्या जनकावर शारिरीक व सांपत्तिक अडचणी येऊन आपल्या आपत्याच्या संगोपनाची त्यांस पडलेल्या फिकीरीतून पार पाडण्यासाठीं श्रीमंत व० चु० सौ० चंद्रावती महाराणी साहेब व श्रीमंत सर सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या सारख्या मोठ्या मोठ्या व्यक्तींच्या मनांत संपादकाच्या सद्दे तुकडे व दृढनिश्चयाकडे

पाहून त्यास योग्य मदत देण्याची त्या सर्वसाक्षी परमेश्वरानें प्रेरणा केली यांत आश्चर्य नाहीं. नवव्या वर्षाच्या पहिल्या अंकापासून ह्मणजे येत्या महिन्याच्या अंकापासून "आनंदांत" सर्व प्रकारें भर घालून तो मोठा करण्याचा रा० आपट्यांचा विचार आहे. वयमानाप्रमाणें त्याची वाढ व्हावी हें सहाजिकच आहे. येत्या नोव्हेंबरचा ह्मणजे १०० वा अंक "खास" अंक काढून त्याचें नवव्या वर्षी यथाकाल उदनयन करण्याचा संपादकांचा मनोदय दिसतो. मुलांना उपनयन करण्याला आठवें वर्ष लाभतें असा सर्व साधारण समज आहे. परंतु गेल्यावर्षी त्यांचेवर आलेल्या संकटाकडे पाहिलें ह्मणजे तें वर्ष त्यांचें आपट्यांस लाभणारें नव्हतें असें दिसतें.

---

## प्रजेची कामधेनु

### (श्रीयंत चक्रवर्ती पंचम जार्जयांचा संदेश)

साम्राज्याचें अंतःकरण ह्मणजे साम्राज्याचा बादशहा होय. या बादशहाला हिंदुधर्माप्रमाणें महाविष्णु समजतात तेव्हां अशा राष्ट्रदेहाच्या अंतःकरणाचा संदेश ऐकण्याला उत्सुकता असावी हें सहाजिक आहे. हा संदेश ह्मणजे आह्मी प्रजेची सनदच समजतों आणि त्याच अर्थानें त्याची महती कळून येईल. व्हॉईसराय साहेब लार्ड हार्डींज यांनीं हा संदेश आपल्या कौंसिलामार्फत सर्व राष्ट्रास विदित केला आहे. त्याचा मराठींत आशय असा कीं

"गेल्या थोड्या आठवड्यांत आमच्या अखिल साम्राज्यामधील लोकांनीं एकदिलानें व एकविचारानें मोहीम सुरू केली आहे. मानव जातीची जी सुधारणा सतत चालू आहे व शांतता नांदत आहे, तिचा विलक्षण रीतीनें भंग होत आहे ह्मणून त्याच्याशीं टक्कर देण्यासाठीं व तो दूर करण्यासाठींच ही मोहीम होय.

"ही संकटमय लढाई आपण होऊन आह्मी सुरू केलेली नाहीं. आमचा अभिप्राय शांततेच्याच बाजूचा सर्वथैव होता. आमच्या प्रधान मण्डळानें लढाई जुंपू नये ह्मणून पराकाष्ठा केली. आणि आमच्या साम्राज्याचा प्रत्यक्ष संबंध नाहीं असा हा कलह मिटविण्याचा प्रयत्न झाला.

जेव्हां बेलजिअम देशावर अत्याचार सुरू झाले, त्याचीं शहरें उध्वस्त होऊं लागलीं, जेव्हां फ्रेंच राष्ट्राचें सर्व जीवितच लुप्त होण्याचा प्रसंग आला तेंव्हा आह्मी आपलीं अभिवचनें सोडून देऊन एका बाजूस सरलों असतों तर आह्मी आपल्या इज्जतीला तिलांजली दिली आणि साम्राज्याचीच काय पण मनुष्यजातीची स्वतंत्रता धुळीस मिळविली असें झालें असतें. आमचा निर्णय साम्राज्याच्या प्रत्येक भागाला संमत आहे ही आनंदाची गोष्ट होय. इंग्लंड व हिंदुस्थान यांची सर्व साधारण धनदौलत ह्मणजे राजकर्ते व प्रजाजन यांनीं मिळून केलेले तहनामे, त्यांच्यामध्यें उत्पन्न केलेला विश्वास आणि दिलेलीं अभिवचनें यांच्या संबंधानें श्रेष्ठ अभिमान हा होय.

"आमच्या साम्राज्यांतील लोकांनीं आपली नेकी व एकी कायम राखण्यासाठीं जी एक दिलानें उचल घेतली त्यांतील बहुविध गोष्टींमध्यें ही गोष्ट आह्मांला अत्यंत हृदयंगम वाटली कीं आमच्या हिंदी व इंग्लिश प्रजाजनांनीं तसेंच मांडलीक राजेरजवाडे व संस्थानिक यांनीं या गादीविषयीं व्यक्त केलेली राजनिष्ठा व राष्ट्रकार्यासाठीं आपली दौलत व आपले प्राण अर्पण करण्याची त्यांची सिद्धता ही होय. या युद्धांत प्रथम अग्रभागीं रहाण्याची त्यांची एकनिष्ठा पाहून आमचें अन्तःकरण अगदीं सद्गदित झालें आणि आह्मांला पक्कें ठाऊक आहे कीं आह्मांमध्यें व आमच्या हिंदीप्रजेमध्यें जी प्रीति व भक्ति नांदत आहे ती या प्रसंगानें पराकाष्ठेच्या शिखराला जाऊन पोंहचलेली आहे. दिल्ली येथें आमच्या राज्याभिषेकाचा मंत्रोक्त समारंभ झाल्यानंतर १९१२ च्या फेब्रुवारीमध्यें आह्मी विलायतेला परत आलों तेव्हां ब्रिटिश राष्ट्राला को कल्याणदृष्टीचा व बंधुत्वाचा संदेश इंडियाकडून पाठविण्यात आला त्याची आह्मांला पुनः पुनः आठवण होते, आणि ग्रेटब्रिटन व इंडिया यांचीं भवितव्यता समवायसंबंधानें संकलीत आहे अशाविषयीं आपणाकडून जें अभिवचन मिळालें होतें त्याचीच अमृतफळें व त्यांचेंच उदार चरित्र ही या संकटाच्या घटकेला आह्मी अनुभवित आहों."

अशा या अंतःकरणाच्या चालू असलेल्या रसायन क्रियेमुळें ग्रेटब्रिटन व इंडियायांना कोण विभागूं शकेल बरें!

---

## वऱ्हाडवृत्त

हवमानः—गेल्याचे मागील शनिवारीं पहांटेला पाऊस सुरू होऊन जवळ जवळ आठवडाभर रोज थोडा तरी पडत आहे. दुपारीं थोडा वेळ ऊन पडे आणि मग मनस्वी उकाडा होऊन पहांटेस थंड वारा वहातो. पाऊस बराच झाल्या कारणानें आतां उघाड पडल्यास पिकांना चांगला जोर येईल. पिकांची स्थिति समाधानकारक आहे. अलीकडे पाऊस पडत असल्या मुळें कृषिकर्में सहाजिकच मंदावली आहेत. रोगराई ऋतु मानाप्रमाणें तुरळक आहे.

रा. रा. एस. बाटरमन आय. सी. एस. आफिशिएटिंग डेप्युटी कमिशनर, वर्धा, यांस रा. रा. इ. ब्याचलर, आय. सी. एस. यांनीं रिलीव्ह केल्यावर इलिचपूर सबडिव्हिजनला असिस्टंट कमिशनर नेमण्यांत आलें.

जंगी जाहिरसभा. गेल्या सोमवारीं येथील श्रीराम थिएटरमध्यें या जिल्ह्यांतील प्रमुख प्रमुख नागरिकांची रा० रा० डेवर साहेबाच्या अध्यक्षतेखालीं जी मोठी सभा भरली होती तेवढी मोठी सभा क्वचितच पहाण्यांत येते. सुमारें ४०००वर लोकांनीं नाटकगृह त्याच्या सभोंवतालचें मैदान व रस्ते हीं दणाणून दिलीं होतीं. सभेचा प्रसंग रा. रा. डेवर यांनीं इंग्रजींतें संक्षेपानें सांगितला आणि खा. ब. विलायतुल्लाखान व रा. रा महाजनी यांनीं त्याचा उर्दूत व मराठींत अनुवाद केला. चालू लढाईत वर्गणी देण्याचा किरकोळ कार्यभाग आपणांकडे सोंपविला आहे हें पाहून लोकांच्या अधीऱ्या मनाचा थोडासा विरसही झाला. सभेच्या सायंकाळच्या धामधुमीचे वेळीं सुद्धा समास्थानीं साडेपांच हजार रुपये रोख जमले! जेथें लोक सर्वस्वदानीं सिद्ध आहेत तेथें लढाईच्या या अप्रत्यक्ष स्वरूपाच्या वर्गण्यांचा काय पाड!!

**साभार स्वीकारः—** रा० रा० गोपाळ रामचंद्र दाते, वकील, जामनेर, पूर्व खान्देश, यांनीं केलेला "अत्यंत सोपें वैद्यक अथवा हजारों व्याधींना बारा औषधें" या नांवाचा ग्रंथ आमचेकडे आला आहे. त्याचा आह्मी साभार स्वीकार करितों. यांत सांगितलेल्या बारा औषधांची होमिओपाथीच्या तत्वावर योजना केलेली आहे. मोठमोठ्या रोगांची बरोबर चिकित्सा झाल्यावर त्यावर बरोबर योजना करितां येणें हें साधारणतः कठीणच असतें. ती कला फारच थोड्या वैद्यांना साधते तरी पण वारंवार उद्भवणाऱ्या पडसें, खोकला, ताप, हगवण वगैरे सारख्या तक्रारीवर कोणासही ठराविक प्रमाणांत ठराविक औषधोपचार करितां येण्यासारखा असतो. या दृष्टीनें पहातां प्रस्तुतचें पुस्तक प्रत्येक कुटुंबांत -- त्यांतले त्यांत दहाजणांच्या कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यासारखें आहे. सर्व औषधांचीं नांवें इंग्रजींतच आहेत. त्यांचें शक्य तितकें मराठींत रूपांतर केल्यास पुस्तक जास्त सुगम होईल. पुस्तकाची छपाई व बांधणी बरी आहे. किंमत एक रुपया आहे.

केरळकोकीळ मासिकास गेल्या जुलै महिन्यापासून ४ थें वर्ष लागलें. ४ थ्या वर्षाच्या १ ल्या अंकांत "१" ईश्वरस्तवन "२" तान्हुल्याला गाणें या दोन कविता असून "३" इराणचे राजे व राजघराणें "४" स्वामी विवेकानंद नाटक हे दोन लेख आहेत. शिवाय "५" एका कारभाऱ्याचें आत्मचरित्र ही एक गोष्ट आहे. या वर्षापासून "जीवन रहस्य" नांवाची कादंबरी प्रत्येक अंकीं १६ पानें या प्रमाणें छापून प्रसिद्ध करणार आहेत. कविता दोन्ही चांगल्याच आहेत. ईशस्तवन ही कविता अनंततनयाची आहे. एखाद्या तनयानें आपल्या जनकाला जसें सलगीनें व वात्सल्यानें आळवावें तसेंच अनंततनयांनीं श्रीमदनंता (ईश्वरास) स फारच प्रेमळपण आळविलें आहे. दुसरी "तान्हुल्याला गाणें" ही कविता रा० बेहेरे यांची आहे. स्वतंत्र स्वराज्याच्या वातावरणांतील कोणत्याही आईनें आपल्या मुलाला ह्मणावें असें हें वीररस भरित गाणें आहे. प्रस्तुत कवीनें श्री शिवरायाच्या वेळच्या एका किल्लेदाराच्या पत्नीनें हें गाणें गाइल्याचें कल्पिलें आहे. तें अगदीं यथायोग्य आहे. दोन उत्तम कविता, दोन भारदस्त लेख, एक गोष्ट व एक कादंबरी यांनीं अंक वाचनीय झाला आहे. मासिकाला नवीन ४ थें आणि जुनें २६ वें वर्ष लागल्याबद्दल त्याचें आह्मी मनःपूर्वक अभिनंदन करून कोकिलास मधुर स्वैरालाप करण्यास ईश्वर चिरायु करो आणि त्यास नेहमीचाच त्याचा इष्ट व आवडता वसंतकाल लाभो! कोकिळाची सरस्वति देवीची आजप्रर्यंतची सेवा सुप्रसिद्धच आहे.

---

## जाहीर विनंती.

लढाईत गुंतलेल्या हिंदुस्थानचे शिपायांचे कुटुंबास मदत देण्या करितां उभारलेल्या इंडियन रिलीफ फंडास हातभार लावण्या विषयी बेलज्यम देशास त्याचे संरक्षणा संबंधी दिलेलें अभिवचन पुरें करण्या करितां व आपले स्नेही फ्रेंच लोक यांस मदत देण्याकरितां ब्रिटिश साम्राज्यास जर्मनी व आस्ट्रिया या देशांशी लढाई करणें भाग पडलें आहे ही गोष्ट सर्वांस मशहूर आहेच. युरोप व ब्रिटीश साम्राज्याच्या इतर भागांतून येणाऱ्या सैनिका बरोबर हिंदुस्थानचें लष्कर हल्लीं लढाईत गुंतलें आहे यामुळें युद्धांत गुंतलेल्या सर्व शिपायांवर थोडी फार अडचण येणें अपरिहार्य आहे. लढाईंत प्राणांस मुकणाऱ्यांच्या बायकापोरांवर अनिवार प्रसंग ओढवणें हें साहजिक आहे. त्यांची पोट पाण्याची सोय करणें व इतरांस थोडी फार मदत देणें अगदी अवश्य आहे. चालू असलेल्या युद्धांचे परिणाम व्यापारधंद्यावर फार दूरवर होतील. आणि समाजांतील निर्बल गृहस्थांस पोट भरण्यास सुद्धां अडचण पडण्याचा संभव आहे. ह्या अडचणी अशतः दूर करण्याचें इरादानें नेक नामदार व्हाइसरावा साहेब यांनीं सैनिकास मदत ह्मणून फंड उभारला आहे. आपले इलाख्यांत नागपूर येथें कमिटी स्थापन झाली असून वऱ्हाडाकरितां एक प्रांतिक कमिटी स्थापन झाली आहे. प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं जिल्हाकमिटी स्थापन होऊन वर्गणी गोळा करण्याचें काम लवकरच सुरू करण्यांत येणार आहे, २५० रुपये किंवा त्याचेवर अधिक रकम देणारे इसमास नागपूरचे मुख्य कमिटीचे सभासद होण्याचा अधिकार प्राप्त होईल. वर्गणीची रकम जिल्हा कमिटीचे सेक्रेटरी अगर तहसिलदार याचेकडे रवाना करावी साम्राज्याचे इभ्रतीस व सोज्वल कीर्तीस कालिमा येऊं देऊ नये. व साम्राज्यावर भविष्य काळीं कोणतेंही विघ्न उपस्थित होऊं नये ह्मणून ही लढाई सुरू झाली आहे हें विसरूं नका व अशा प्रसंगीं आपल्या देशभक्तिस व औदार्यास अनुसरून शक्य तेवढी मदत देण्यास मागे पुढें पाहू नका अशी विनंती

बा० पी. स्टयांडन

अध्यक्ष

वऱ्हाड वॉर एक्सिजन्सीज कमीटी

## नोटीस

नोटीस कलम १३ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें

कि० मुकदमा नंबर ५७ सन १९१४ इ.

विद्यमान डी० जज साहेब यांचे कोर्ट

मुकाम आकोला

नांव भगु

बापाचें नांव गणपती पाटील

जात रहणार बेलुरा

तहसील बाळापूर जिल्हा आकोला

या अल्पवयी दत्तु सखाराम उमर वर्षे १७

राहणार बेलुरा बुम तेहसीलीचे (२)

साठीं पालन कर्ता (१)

नेमण्या विषयींच्या अर्जा संबंधीं

[३]

सर्वत्र लोक यांस

सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचे [२] स्वतः व त्याची मालमत्ता साठीं पालन कर्ते

(४) नेमण्याविषयीं अर्ज केल्यावरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २ माहे १० सन १९१४ इ. रोजी नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जा बद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीने किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी हुजुर असामी त्याच्या बरोबर असेल अशा प्लीडरच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे. आणि त्यास असे ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख २ माहे ९ सन १९१४ इ. रोजी आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का

G. W. Bapat.
A. D. J.
For
डी० जज आकोला

नो० नं० १६

## जाहीर विनंती

सर्व लोकांस जाहीर करण्यांत येते कीं माझा बाप दत्तु वा. पुर्णाजी पा० मु. ऊंबरें पो. इगांव ता. खामगांव हा इसम दोन महीनें झाले गेलेला आहे त्याचा पत्ता लागत नाहीं जर कोनी मनुस्य पत्ता लाविल तर आम्ही त्याला इनाम ५० रुपये पर्यंत देऊं त्याची निशानी रंग सावळा वय ६५ वर्षाची झाली आहे त्याचे तोंड वर केस पांढरें व काळें या प्रकारचा मनुष्य आहे कळावें तारीख ८।९।१४

दस्तुर सदासीव व० नथु पा.

सही

तुकाराम वा॥ दत्तु पा. निशानी आंगठा

नो० नं० १७

---

# सेंटचा राजा

वापरून तर पहा ! !

# ओटो दिलचमन

## सुगंधीचा भांडार

(राजिस्टर्ड)

आजपर्यंत बाजारांमध्यें निघालेल्या सर्व सेंट, अत्तर, यापेक्षां हे ओटो दिलचमन जास्त टीकाऊ मधुर आणि अधीक खुशबेदार आहे अशी आह्मी पुरी खात्री देतों. जर तुह्मी ओटो दील-चमन वापरला नसेल तर, एक वेळ वापरून खातरी करून घ्या. व ह्यांत स्पीरीट बिलकूल नाहीं, चमेली आणि बटमोगरांच्या ताज्या फुलांच्या अर्कापासून तयार केलेला आहे. फक्त २, ३ थेंब रुमालावर किंवा वस्त्रावर टाकल्यानें एकदम अनेक सुगंधीचा भांडार प्रस्तुत होऊन तुमच्या आसपासच्या सर्व लोकांच्या मनास आनंद होईल.

| | |
|---|---|
| किमत ॥- ड्रामची ट्यूब ८ आणे<br>,, अर्धा ,, ,, १२ आणे | किमत -॥- औंसाची बाटली २ रुपये.<br>व्ही. पी. पो. खर्च वेगळा, |

ओटो दीलचमनची सुगंधी कार्डे दर डझनास १२ आणे,

सेंटच्या नमुन्यासाठीं दोन आण्याची टिकीटें पाठवा.

सेंट, ओटो किंवा सुगंधी कार्डे खरेदी करतेवेळीं ओटो दीलचमन हें नांव बरोबर वाचून पहावें, जर तुमच्या जवळच्या दुकानदाराकडे मिळत नसेल तर, खालील पत्त्यावर लिहून माल मागवावा.

एकटे एजंटस्

## एच. आर. मोदी आणि कं.

तारेचा पत्ता सेकेरीन " मुंबई.

बिलायती औषधें व परफ्युमरींचे व्यापारी
नं. १८ प्रिन्सेस स्ट्रीट, किटमसोर मुंबई.

---

अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ॥ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्त—ओरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. १९

---

## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांध्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

### परमा सायरप.

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट, खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० २०

---

सतत ५० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा

# डॉ. वामन गोपाळ यांचा आयोडाईज्ड सार्सापरिला

शरीराचा पंचप्राण ह्मणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुळे पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु. १।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे-अशाबद्दल खात्री करून घेणें.

मालक—डा. गौतमराव केशव, आणि सन्स
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई. नंबर २.

| | |
|---|---|
| तांबूल नवरत्न | न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे. |
| नवरत्न टेबलेट | उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे. |
| नवरत्न तमाखु | पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा. |
| मद्रासी नस | अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे |
| गजकर्णीचें मलम. | गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे. |
| केश काढण्याचें तेल | केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे. |
| चन्द्रकान्त बाम | मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे. |

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट- चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार- आकोला.

नो. नं. ११

Oriental Government Securi:y Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4½ CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Tot l Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38, 694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05, 818 |
| 1898 | 31,36,422 | 1,41,32356 |
| 1903 | 41,07,009 | 2,19,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

"At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL

Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**

CHIEF AGENT,

N. No. 12 *C.P. Berar & Khandesh,NPU.*

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

उलटी, झाडा, संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरियनचें जीवनामिक्श्चर




हजारों लोकांचे प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ०।१२

वा. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो. नं. १३

## घड्याळ फुकट मिळेल



( आमके आम और गुठलियोंके दाम )

गजकर्णाचे [ दाद ] रामबाण मलम किं. ४ आणे दराची १२ शीशी व तीन रुपयांची घेणारास टाइमपीस घड्याळ फुकट मिळेल. २४ शिशी एकदम घेणारास खिशांतील [ जेब ] घड्याळ फुकट मिळेल. औषध विकून घड्याळ फुकट वापरा.

आमचे कारखान्यांत, सर्व प्रकारचीं पुस्तकें, औषधें, घड्याळें वाचेस, सुगंधी सामान, तेलें, अत्तरें वगैरे योग्य किंमतीनें मिळतात. आमचा मोठा क्याटलाग फुकट मागवा. तसेंच आपण आपल्या व आसपासचे गांवातील लिहीणदार माणसाचीं ५० पन्नास नांवें पूर्ण पत्त्यासह लिहून कळविल्यास मनोरंजक पुस्तक पाठवू.

१ टेबलावर ठेवण्याचें टाईमपीस घड्याळ १॥ रु.

१ रास्कोप सॉस्टिम [ खिशांतील घड्याळ २ रु.

पत्ता जयचंद्र कंपनी ( वर्धा सी. पी.)

नो. नं. १४

साताऱ्चे प्रसिद्ध कोल्हटकर राजवैद्यकृत

## कस्तुरीच्या गोळ्या

दापासून अपस्मार वायू ज्यांस बालग्रह फीट्स [ हिस्टेरिया ] फेंपरें मिरगी, वतारणें, आंकडी वगैरे म्हणतात तो आजार, लहान मुलें व मोठीं माणसें यांचा नवा जुना आजार खात्रीनें बरा होतो. तसेंच बहुतेक सर्व ज्वर अर्धांग वगैरे वायु बरे होतात. १ रुपया पासून वर कितीही किंमतीच्या गोळ्यांच्या बाटल्या माहितीचे कागदासह विकत मिळतात. रोखीनें अगर व्ही. पी. नें मागवा. विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें. याशिवाय बहुत प्रकारच्या मात्रा, गोळ्या, भस्में, आसवे, वातहारक तेलें विकत मिळतात.

सखाराम अप्पाजी कोल्हटकर वैद्य,

ठाकुरद्वार रोड हरकुवरबाई नवी चाळ, मुंबई नं० २

नो० नं० १५


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] 'आकोला-- सोमवार तारीख २१ माहे सप्तेंबर सन १९१४ इ० [ अंक ३७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील. नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. मागून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. G. Ridland.
आकोला ९।९।०९ } एजंट
नो. नं ४

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६¾ तोळे असतें.

मुंबई बँक } J. G. Ridland.
आकोला २१-९-१० } एजंट
न० नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ३९

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. ( Natl ) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3. Monthly Dissections. Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Hon'ble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 16

## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० क्रेमलाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्ही मिळून किंमत रु. १ व्हो.पी.नें रु० १८६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—वैद्रे आणि कंपनी पुणेंसिटी
नो. नं. ६

## अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमिंट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, यांच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण, व्रण, चिखली, मुकी, ओली खाज, जखम, नखविषया, तमाम रोगावर चालणारा १ च ' दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक वड्या किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे , विंचवावर पूड किं १। रु० व डोळ्यांतील बेगळे सोडण्याचे किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ हात भट्टीचें किं० तोळ्यास २ रु०

पत्ता – व्ही० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९

श्री

हर्ष! हर्ष!! हर्ष!!!

## स्वार्थ आणि परमार्थ यांची लूट!!

### प्रालब्धाच्या परीक्षेची संधि!

त्वरा करावी. समय चुकल्यावर पश्चात्ताप होईल.

चोपाई.

रामकृपा जिहींपर जब होई ॥
रंक होय धनपति महि सोई ॥
सो हरिकृपा होइ फुरजाना ॥
त्यागहु जिनप्रभू आस सुजाना ॥१॥

एक लक्ष --किंवा --पन्नास हजार --किंवा पंचवीस हजार इत्यादि अधिकांत अधिक एक लक्ष आणि कमींत कमी पंचवीस रुपये पर्यंत जसें ज्याच्या भाग्यांत असेल ते केवळ दोन रुपयामध्यें लाभ मिळतो या विषयीं संपूर्ण निश्चय करण्यासाठीं दोन रुपये मनीऑर्डरने पाठवावेत अगर एक कार्ड लिहून पाठवावें. ही मामुली जाहिरात नाहीं. यावर विश्वास ठेविला पाहिजे.

पत्ताः— सेक्रेटरी,
पुण्य विभाग सभा,
धोलपूर रियासत-राजपुताना
नो. नं. ३९६

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं, १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १८८

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिळाफ करून बनविलें आहे. किं. ८४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

**एक विवाहेच्छु कृष्णपक्षी ह्मणजे विदुर**
**[ मिश्रजातीय ]**

### एक वर व एक वधू पाहिजे.

माझी मुलगी १०।११ वर्षांची गृहकार्य कुशल, सुस्वरूप, गौरवर्णा, साधारण मराठी वाचणारी लग्नाची आहे. व एक मुलगा २२।२३ वर्षांचा. इंग्रजी साधारण जाणणारा हल्लीं रेल्वेत फोरमनचे काम करितो हा लग्नाचा आहे. लग्न या वर्षीत व्हावीत. तर वरानें व वधूनें अथवा त्याच्या पालकांनीं सर्व खुलासेवार पत्रव्यवहार मजकडे करावा विशेष लागणारी माहिती देण्यांत येईल व ईश्वर संकेतानुरूप होईल.

पत्ताः—गोविंद रामचंद्र जोशी स्टेशनमास्तर बंगाल नागपूर रेल्वे रंगाली
नो. नं. ४०३

## नोटीस

रा. रा. मारुती वल्लद आन्याजी पाटील राहणार मौजे आळनगांव तालुके व जि० उमरावती यांसः—

खाली सही करणार इकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझ्या सर्व इस्टेटीचा अपहार माझ्या योरल्या सवतीनें करून माझ्या नवऱ्याचे व्यक्त आज्ञेविरुद्ध दत्तक घेऊन मला सर्व तोपरी नागविलें व म मला व मी घेतलेले मुलास खर्चास एक कवडी देखील नव्हती व खाण्यास एक दाणा देखील नव्हती अशावेळीं माझे तर्फे कोर्टांत काम चालवून माझे हक्क मला मिळवून देणारा कोणी तरी पाहिजे होता व या कामाकरितां होणाऱ्या खर्चास तारण ह्मणून अंदाज खर्च चार हजार रुपयांत माझी शेतें तुह्मांस गहाण लाऊन दिली होतीं परंतु माझा मुकद्दमा वि० सबडिव्हिजन सा० व० मूर्तीजापूर यांचे कोर्टांत मु० नं० ७ चा चालू असतां १२ तुह्मी त्यांत दुर्लक्ष केल्यामुळें आणि खर्च न लावल्यामुळें बिघडला तसेच बिघर्ड आ० डी० ज० सा० ब० कोर्ट आकोला यांचे कोर्टांतील मुकद्दम्याची तारीख १२-९-१४ रोजीं होती त्या तारखेस मलाच बातीनें मुकदमा चालवावा लागला तुह्मी करार मोडला. व तुमच्या भरवशावर मी राहीन तर माझे नुकसान होईल या साठीं या नोटीशीनें तुह्मांस कळविते कीं करार तुह्मीच मोडल्यामुळें माझे गहाणखत मी रद्द करते व आतां तुमचा व माझा कसलाच संबंध राहिला नाहीं व गहाण शेतीवर तुमचा कोणतेही प्रकारे हक्क नाहीं कळावे तारीख १९-९-१९१४ इसवी सही

सक मर्द देवगीर गोसावी रा० सीवण खुर्द जि० खु० हातची बांगडी

नो .नं. ४०४ द० बाळभारथी.

## नोटीस

तीर्थरूप रा. रा. जानकीराम बापुजी वैश्य सोनार राहणार पाथर्डी ता. आकोट यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी 'सुदर्शन' वर्तमान पत्रांतून १६।१०।१९१२ ची नोटीस माझ्या संबंधानें दिली आहे. त्यांतील मजकूर सत्याला सोडून आहे. तुमचा राग शांत झाल्यावर मला परत बोलावून जवळ कराल व पुनः पर्वी प्रमाणें एकत्रांत राहू वागू या आशेवर मी इतकीं दोन वर्षें वाट पाहिली आणि वेगळा राहून तुमच्याच आशीर्वादानें निराळी दुकानदारी चालवीत आहे. आतां मला असें वाटतें कीं वडिलार्जित स्थावर जंगम जिन्नगीचा हिस्सा तोडून घ्यावा आणि माझा मी संसार निराळा करावा. तुह्मी मला धान्य पुरवीत आहांच पण मला स्वतंत्र रितीनेंच वागूं द्याल तर माझें कल्याण होईल. मला आतां ही अर्धवट स्थिती नको आहे. या उपर माझ्या विंनतीला होकार देणें आपल्या खूषीवर आहे; आणि शेवटीं आपल्या हुकूमा प्रमाणेंच वागण्याचा माझा दृढनिश्चय आहे. माझ्या दुसऱ्या भावाच्या गोष्टी आपणास खऱ्या वाटतात. वडील भावाचा हेतु मला जिनगी न देण्याचा आहे ही गोष्ट मी आपल्या कानावर घालून ठेवितो; घरांतील मंडळीच जंगम जिन्नगीची अफरातफर करीत आहे असा मला संशय येतो तर तुह्मी समक्ष खात्री करून घेऊन काय ती आज्ञा करावी कळावें ही विज्ञापना १२-९-१९१४ इसवी.

सही
फेमराज ज्यानकीराम सोनार

नो. नं. ३९८

## नोटीस

खालीं सही करणार इजकडून जयाजी वा। महेपती कुटे मराठे रा० मुंगळ ता० वाशिम यांसः—

नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी मजला चांगले रितीनें वागवीत नसल्यामुळें मी आज ७ वर्षां पासून माझा भाऊ मारुती वा। हनवंता रा० रिठद ता० वाशिम याचें घरीं आहे. करितां या नोटीसीनें तुह्मांस कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्या पावल्या पासून एक महिन्याचे आंत आजपर्यंत माझें खावटीचा व कपड्यालत्याचा खर्च दरसाल ६० रुपये प्रमाणें एकंदर रु० ४२० देऊन मजला घेऊन जावे. सदर्हू मुदतींत वरप्रमाणें निकाल न केल्यास माझेवर तुमचा नवरेपणाचा मुळींच हक्क राहणार नाहीं व हिच तुमची फारकती आहे असें समजलें जाईल. व सदर्हू खर्चा बद्दल रितीप्रमाणें कोर्ट मार्फत व्यवस्था केली जाईल कळावें. ता० १४।९।१४

सही
जयवंती मर्द जयाजी इच्या
हातची नि० बांगडी
द० उद्धव प्रल्हाद शाडीले

नो० नं ४००

## जाहिर नोटीस

मी खालीं सही करणार सर्वत्र लोकांस जाहिर नोटीस देतो कीं, मौजे सिवण खुर्द तालुके मूर्तीजापूर जि० आकोला येथील रामचंद गुरु देवचंद गोसावी हा तारीख ७-८-१४ रोजी मरण पावला आहे त्यानें मृत्यु पत्र केले आहे त्याचे मृत्यु पत्राप्रमाणें आह्मी व्यवस्था करणार आहो जर कोणी यखादा तोतया मीच रामचंदचा दत्तक आहे वगैरे लोकांस भासवून रामचंदचे आसामी किंवा त्याचे इस्टेटीशी संबंध ठेवणारे लोकांनीं अशा तोतयाशी जर व्यवहार केला तर तो व्यवहार कायदेशीर समजला जाणार नाहीं व त्या व्यवहाराचे आह्मी कोणतेही प्रकारे जबाबदार राहणार नाहीं. तोतयाशीं जो कोणी व्यवहार करील त्याजवर आह्मी दिवाणींत व फौजदारींत काम चालवून नुकसानी भरून घेऊं कळावें तारीख १९-९-१९१४ इ.

सही
मनाबाई व पार्वताबाई मर्द
रामचंद यांज तर्फे मुखत्यार
बाळभारथी लक्ष्मण भारथी
रा० सिवण खुर्द ता०
मुर्तीजापूर

नो. नं. ४०५

## जाहिर नोटीस.

मी खालीं सही करणार जाहिर नोटीस देतो कीं मौजे सिवणखुर्द ता० मुर्तीजापूर जि० आकोला. येथील रामचंद गुरु देवचंद गोसावी हा ता० ७।८।१४ रोजी मरण पावला त्यानें गपोळ वा। राणुजी कुणबी रा० सिवणखुर्द ता० मुर्तीजापूर जि० आकोला यास मुखत्यारपत्र दिलें होतें. हल्लीं मु० प० देणारा. मैयत झाल्यामुळें त्याचे मु० प० रद्द झाले आहे. रामचंदचे आसामी अगर त्याच्याशीं व्यवहार करणारे लोकांनीं सदरहू माजी मुखत्यार याच्याशीं आतां कोणत्याही प्रकारें व्यवहार करूं नये जर कोणी त्याच्याशीं व्यवहार करील तर तो कायदेशीर समजला जाणार नाहीं. सदरहू माजी मुखत्यार यासच मु० प० दिले असते परंतु त्याच्या हित संबंधाचा व रामचंदचे विधवा स्त्रिया आणि त्या जो दत्तक रामचंदच्या मृत्यु पत्रान्वये दत्तक घेणार आहेत त्या भावी दत्तकाचे हित संबंधाचा परस्पर विरोध असल्याचा जबरदस्त संशय आल्यावरून त्यांस पुन्हा मु० प० दिले नाहीं. करितां आतां या नोटीसीनें खालीं सही करणार जो मनुष्य आहे त्यास मुखत्यार नेमले आहे त्याच्याशीं व्यवहार करावा. माजी मुखत्याराशीं जो कोणी व्यवहार करील त्याचे जबाबदार आह्मी राहणार नाहीं कळावें. ता० १९।९।१९१४ इ०

सही
मनाबाई व पार्वताबाई तर्फे
मु० बाळभारथी लक्ष्मणभारथी
रा० सिवणखुर्द

नो० नं० ४०६

वऱ्हाडसमाचार

मित्ती आश्विन शुद्ध २ शके १८३६

## वरिष्ठ कायदे कौन्सिल

गेल्या आठवड्यांतली ठळक गोष्ट ह्मणजे सिमल्यास झालेली वरिष्ठ कायदे कौन्सिलाची बैठक ही होय. ती बैठक इतिहासांत नमूद करण्यासारखी अत्यंत महत्त्वाची होती. कारण, हिंदुस्थानच्या ब्रिटिश रियाशतीच्या इतिहासांत अपूर्व अशी एक गोष्ट या बैठकीचेवेळीं घडली. हिंदुस्थानचे बादशहा पांचवे जॉर्ज यांनीं हिंदुस्थानला पाठविलेला प्रेमपूर्ण संदेश या बैठकीचे वेळीं वाचण्यांत आला. आजपर्यंत असे संदेश हिंदुस्थानचे व्हाइसराय यांच्या द्वारें प्रजाजनाला कळविण्यांत येत असत, पण खुद्द कौन्सिलच्या बैठकींत ते वाचले जाण्याचे हें पहिलेंच उदाहरण आहे. पार्लमेंटाला उद्देशून जसें राजाचें भाषण दरसाल होतें व त्याला एक प्रकारचें महत्त्व योग्य रीतीनें देण्यांत येतें तसा प्रकार कौन्सिलच्या बैठकीसंबंधानें होणें ह्मणजे कौन्सिलला महत्त्व प्राप्त होणेंच होय. बादशहाचा संदेश ही मागच्या संदेशाप्रमाणें अत्यंत कळकळीचा व प्रेमपूर्ण होता. तो वाचून 'प्रेम द्यावें, प्रेम घ्यावें प्रेमाचि हें सारें' या प्रेमळ व अनभवसिद्ध उक्तीचें स्मरण होतें. सध्याच्या युद्धाचे प्रसंगीं हिंदुस्थानच्या राजेरजवाड्यानीं व लोकांनीं दाखविलेली राजनिष्ठा व ब्रिटिश राष्ट्रास साह्य करण्याविषयींची तत्परता पाहून बादशहा, व्हाइसराय साहेब, व पार्लमेंट सभा यांनीं काढलेले उद्गार हिंदुस्थानच्या निंदकांचीं तोंडें कायमचीं बंद करतील असा कोणाचा समज असेल, तर तो मात्र चुकीचा आहे. कारण खल जिव्हा ही अदम्य आहे. वर सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानच्या स्तुतीचा कोरस कानीं पडतांच अलाहाबादचें कुत्रें भुंकूं लागलें आहे. हिंदुस्थानचे लोक मोठे सोंगाडे आहेत. त्यांनीं राजनिष्ठेचें नुसतें सोंग आणिलें आहे, पण त्यांच्या अंतर्यामीं ते इंग्रजाविरुद्ध जळत आहेत, तेव्हां त्यांच्या नुसत्या बाह्य शब्दावडंबराला भुलून फसूं नका आणि हिंदुस्थानाला पुढें मागें राजकीय हक्क देण्याची घोडचूक करूं नका अशा अर्थाचा एक अग्रलेख पायोनियर पत्रांत प्रसिद्ध झाला आहे. या पत्रकाराला येवढें समजण्याइतकीही अक्कल नाहीं कीं हिंदुस्थानचे लोकांनीं नुसती शाब्दिक राजनिष्ठा दाखविली नसून आपलें चित्त, वित्त व प्राण ही ब्रिटिश राष्ट्राला अर्पण केले आहेत. हिंदुस्थानचें दारिद्र्य साऱ्या पृथ्वीभर सुप्रसिद्ध असतां प्रांतोप्रांतीं वॉर रिलीफ फंड ह्मणून गोळा होत आहेत. राजे व संस्थानिक यांनीं आपलें सैन्य, खजिने, व स्वतःचे प्राण सुद्धा धोक्यांत घालून लढाईवर जाण्याविषयींची आपली उत्कंठा दाखविली आहे. आंग्लो इंडियन पत्रकारानीं ज्यांचें नांव निष्कारण बद्द करून ठेविलें आहे अशा ब्राह्मणजातींतले आणि त्यांतही पुनः चित्पावन जातीचे कित्येक ब्राह्मण आपण होऊन यावेळीं आह्मांला लढाईवर न्या असा आग्रह करून हातावर शिर घेऊन लढण्यास गेल्याचीही उदाहरणें आह्मांस माहित आहेत. हें नुसतें शब्दावडंबरच काय? यांत प्रत्यक्ष कृति दिसत नाहीं असें ह्मणणारा मूर्ख किंवा नीच यांतला कांहीं तरी एक किंवा दोन्ही असला पाहिजे यांत शंका नाहीं. लॉर्ड कर्झन यांच्या वेळीं लोकांत असंतुष्टता होती व ती तीव्र होती हें आह्मी ही कबूल करतों. पण बादशहांचें आगमन व हिंदुस्थानासंबंधीं वेळोवेळीं त्यांनीं केलेलीं प्रेमळ भाषणें, आणि लार्ड हार्डिंज यांच्या कारकीर्दीचें अत्यंत सहानुभूतिपर असें धोरण यांनीं त्या असंतुष्टतेवर पूर्णपणें विरजण घालून हिंदुस्थानच्या लोकांचीं मनें एखाद्या मांत्रिकाप्रमाणें पूर्णपणें वश करून घेतलीं आहेत, हें ज्याला दिसत नाहीं तो खास अंध असला पाहिजे.

याच बैठकीचे वेळीं ना० लार्ड हार्डिंज यांनीं एका महत्वाच्या गोष्टीचा खुलासा केला. कानडा व इतर ब्रिटिश वसाहती हिंदुस्थानच्या लोकांचा प्रवेश आपल्या प्रदेशांत होऊं देत नाहींत याबद्दल हिंदुस्थानच्या लोकाना चीड वाटते, आणि ब्रिटिश राज्यांत वाटेल तिकडे जाण्याचा आपला हक्क मारला जातो अशी जी सार्वत्रिक तक्रार आहे तिच्या संबंधानें नामदार साहेबांनीं समाधानकारक खुलासा केला आहे. त्यांनीं सांगितलें कीं वसाहतवाल्यांना अशी मनाई करण्याचा हक्कच स्वराज्याच्या हक्का बरोबर मिळाला असल्यामुळें हिंदुस्थान सरकाराला कांहीं एक बोलतां येत नाहीं. तथापि तडजोड करून गोडी गुलाबीनें घेतल्यास ही मनाई थोडीशी ढिली करतां येईल, व त्या कामीं साह्य करण्यास नामदारसाहेब तयार आहेत. लॉर्ड हार्डिंज यांनीं दक्षिण आफ्रिकेच्या प्रकरणांत हिंदुस्थानची उचललेली बाजू व त्यांच्या प्रयत्नाचा झालेला समाधानकारक परिणाम लक्षांत घेतला ह्मणजे नामदार साहेब कानडा वगैरे वसाहतींच्याकडूनही हिंदुस्थानाला न्यायाचे हक्क देववितील अशी पूर्ण खात्री वाटते. नामदार साहेबांनीं कामागाटा मारू प्रकरणांत हिंदी लोकांच्या हातून कायद्याच्या अज्ञानामुळें झालेली चूक स्पष्टपणें दाखविली व निदान या जहाजावरील लोकावर जुलूम वगैरे अत्याचाराचे प्रकार वसाहतवाल्याकडून न होऊं देण्याबद्दलची व्यवस्था सरकारी रीतीनें केली हे त्यांचे खरोखर उपकार ह्मटले पाहिजेत. नामदार साहेब ह्मणतात कीं हिंदुस्थानच्या लोकांनीं तडजोड करूनच आतां आपला कार्यभाग साधला पाहिजे. हिंदुस्थान तसें करण्यास नेहमीं तयार आहे. पण त्याबरोबर हेंही सांगणें उचित आहे कीं ही तडजोड उभयपक्षीं असली पाहिजे.

हिंदुस्थानच्या लोकांना वसाहतींत जाण्याला सुद्धां अटकाव असावा, व वसाहतवाल्यांनीं हिंदुस्थानांत येऊन हिंदी लोकांहून श्रेष्ठ प्रतीचे हक्क आमच्या डोळ्यादेखत पटकावे हें मात्र तडजोडीचें लक्षण खास नाहीं. मागें नामदार गोखले यांनीं दाक्षिणआफ्रिकेतल्या लोकांशीं जशास तसें या न्यायानें हिंदुस्थानसरकारनें वर्तन ठेवून वसाहतवाल्यांना इकडे येऊं न देण्याविषयींचा ठराव कौन्सिलापुढें आणिला होता, तसा एखादा ठराव कौन्सिलांत आणिल्याशिवाय या प्रकरणांत न्यायाची व समतोल तडजोड होणें अशक्य दिसतें. कांहीं असो, या बाबतींत लॉर्ड हार्डिंज साहेब व हिंदुस्थानसरकार यांच्याकडे तरी कांहीं दोष नाहीं, जर कांहीं असला तर तो ब्रिटिश राज्यपद्धतीचा आहे व तो काढून टाकण्याचा मार्ग ह्मणजे वर सांगितल्याप्रमाणें एखादा ठराव पास करून घेणें हा आहे येवढें या खुलाशावरून स्पष्ट होत आहे.

## युद्धाचें अंतःस्थ कारण,

सांप्रतच्या युद्धासंबंधानें ज्या नव्या नव्या गोष्टी बाहेर येत आहेत त्यामुळें या युद्धाला एक प्रकारचें गूढत्व ज्यास्त ज्यास्त येत आहे. याचें ताजें उदाहरण ह्मणजे मि. ट्रिव्हेलियन यांचा राजीनामा हें होय. मि. ट्रिव्हेलियन हे युद्ध बाहेर होईपर्यंत विलायतेंत पार्लमेंटरी सेक्रेटरीसारख्या हुद्याच्या व जबाबदारीच्या कामावर होते. सर एडवर्ड ग्रे यानीं या युद्धाच्या वेळीं ठेविलेलें धोरण व त्याचें समर्थन त्यांना पसंत नाहीं. ते ह्मणतात कीं ब्रिटिश राष्ट्राला या युद्धांत पडण्याचें व द्रव्यहानि आणि प्राणहानि करून घेण्याचें वस्तुतः कांहीं कारण नव्हतें. बेलज्यम सारख्या छोट्या राष्ट्राला न्याय मिळवून देण्याकरितां हें युद्ध नसून रशियाला खुष करण्यासाठीं ब्रिटिश राष्ट्राची ही खटपट आहे. पण रशियन लोक जर्मनीपेक्षा कोणत्या बाबतींत अधिक चांगले आहेत? रशियन राज्यपद्धति, सुधारणा, वाङ्मय, कला, कोणतीच गोष्ट कौतुकावह नाहीं. त्यापेक्षा जर्मनी सर्वप्रकारें श्रेष्ठ आहे. असें असतां जर्मनसारख्या सुधारलेल्या राष्ट्राशीं ब्रिटिश राष्ट्रानें द्रोह करण्यास तयार व्हावें आणि तेंही रशियासारख्या अर्धवट सुधारलेल्या राष्ट्राला खुष करण्यासाठीं हें विचित्र आहे. फ्रान्सवर जर्मनी स्वारी करणार नव्हतें. पण रशियाच्या मनातून जर्मनीवर चालून जावयाचें होतें' व रशिया आणि फ्रान्स यांच्यामध्यें मैत्री होती ह्मणून फ्रान्सनें शस्त्र उचललें तें योग्य आहे, पण इंग्लंडनें काय ह्मणून मध्यें पडावें? मि. ट्रिव्हेलियन यांनीं आपल्या राजीनाम्यात दिलेलें हें कारण आतांपर्यंत जर्मनीच्या कृपणाच्या व धरसोडीच्या बाहेर आलेल्या गोष्टींचा विचार करता समाधानकारक दिसत नाहीं येवढेंच आह्मांला या संबंधांत सांगावयाचें आहे.

## युद्ध आणि सेव्हिंग्ज ब्यांका

सांप्रतच्या युद्धाचा किती निरनिराळ्या प्रकारानें लोकांच्या व्यवहारावर अनिष्ट परिणाम घडत आहे याचें एक उदाहरण सेव्हिंग्ज ब्यांका हें होय. थोड्या दिवसांपूर्वीं वर्तमानपत्रांतून अशी बातमी प्रसिद्ध झाली होती कीं जर्मन सरकारनें तेथील सेव्हिंग्ज ब्यांकेतल्या ठेवी आपल्या हातीं घेतल्या आहेत. याचा अर्थ आमचे लोक असे समजले कीं या रकमा जर्मन सरकारनें जप्त करून नेल्या; आणि युद्धासारख्या प्रसंगीं न्यायअन्याय पाहण्याची वेळ नसते, तेव्हा कदाचित् ब्रिटिश सरकारही तसेंच करील अशी भीती मनांत ठेवून आमचे लोक पोस्टाच्या व इतर सेव्हिंग्ज ब्यांकांतून भराभर ठेवी काढून घेऊं लागले. वस्तुतः मुळाशीं लोकांचा गैरसमज होता. जर्मन सरकारनें ठेवी हस्तगत केल्या ही गोष्ट खरी आहे, पण त्याचा अर्थ त्या लोकांना परत मिळावयाच्या नाहींत असा मात्र नाहीं. तर लढाई संपेपर्यंत लोकांना आपल्या ठेवी काढून घेऊं देऊं नये. तसें करूं दिल्यास ब्यांकांचें एकदम दिवाळें वाजेल' सरकारी खजिन्यावर रकमाची मागणी येईल, व सध्याच्या युद्धाच्या संकटांत त्या एका मोठ्या संकटाची भर पडेल. ती टाळण्यासाठीं जर्मन सरकारला तसें करावें लागलें व कोणीही सरकार अशा प्रसंगीं असें करील. पण त्यात लोकांची फार तर थोडी गैरसोय होईल इतकेंच, द्रव्यहानि बिलकुल नाहीं. हिंदुस्थानांतल्या लोकांना भिऊन जाण्याचें मुळींच कारण नाहीं. ब्यांकांतल्या ठेवींवर हात घालण्याचा सरकारचा बिलकुल विचार नाहीं. पण लोक मात्र विनाकारण घाबरून जाऊन आपल्या ठेवी एकदम परत मागू लागून ब्यांकांवर नसतें संकट आणितील तर मात्र ते आपल्या हातानें स्वतःची हानि करून घेतील. लोकांचें अज्ञान हें राष्ट्रावरल्या पुष्कळशा संकटांचे मुळाशीं असतें याचा अनुभव हिंदुस्थानांत पदोपदीं येत आहे.

## हिंदु राजनीति.

पुष्कळ पाश्चात्य व हिंदी लेखकांची ही अशी समजूत झालेली दिसते कीं हिंदुस्थानात 'ना' विष्णुः पृथिवीपति, या वचनावर लोकाचा पूर्ण विश्वास असल्यामुळें राजाच्या अधिकाराला आळा घालण्याची कांहींच तजवीज हिंदु राजनीति ठरविणाऱ्या शास्त्रकारांनीं करून ठेवलेली नाहीं. पणहा निवळ भ्रम आहे. तशी तजवीज राजनीतीवरील शास्त्रग्रंथांतून केलेली होती. वेदांत कायदा ऊर्फ धर्मशास्त्र याला राजाचाही राजा ह्मटलें आहे व त्याची योग्यता देवाच्या योग्यतेहूनही थोर ठरविली आहे. राजाला या कायद्यांचें उल्लंघन करतां येत नसे, आणि राजाच्या हातून कायद्याचें योग्य प्रतिपालन होतें कीं नाहीं तें पाहण्यासाठीं प्राड्‌विवाक ह्मणजे हायकोर्ट जज्जा सारखे न्यायाधिकारी असत हे अधिकारी राजाचे अमात्य नव्हते. तर स्वतंत्र असत. या पदावर बहुधा निर्लोभी, व निर्भीड अशा विद्वान ब्राह्मणाची योजना करण्यात येत आहे. ब्राह्मण ह्मणजे सगळेच परोपजीवी होते अशी जी त्यांच्या विषयींची सामान्य समजूत आहे ती निखालस चुकीची आहे. या प्राड्‌विवाकांच्या हातून मतलीच चूक होऊं नये ह्मणून त्यांचेवर लोकमताचा अधिकार ठेवण्यांत आला होता. या न्यायाधिशाच्या ज्युरींत ब्राह्मणेतर ही असत याचें उदाहरण मृच्छकटिक नाटकांत ही आहे.

राजाच्या अधिकाराला नियंत्रित करणारी दुसरी योजना ह्मणजे यति किंवा संन्यासी याचे हातीं ठेविलेला अधिकार ही होय. संन्यासी ह्मणजे जगाच्या गोष्टीपासून सर्वथा अलिप्त असत असें नाहीं. ते कर्मफल संन्यासी होते, कर्म संन्यासी नव्हते. ते राजकारणात पडून राजाला वेळोवेळीं सल्ला मसलत देत असत. मगधराज अजातशत्रु याच्या मनात वृजि नांवाच्या प्रजासत्ताक राज्यावर स्वारी करावयाची होती. तेव्हा त्यानें बुद्धाची सल्ला त्या गोष्टींत विचारली व बुद्धानेंही ती राजाची भीडभाड न धरतां दिली. हे यति मोठे स्पष्टवक्ते व निर्भीड असत. त्याना राजाच्या कृपेची व रोषाची किंमत सारखीच वाटे व लोकहितासाठीं अपलें खरें मत प्रकट करून बेलेस राजाच्या रोष संपादण्यास ही ते भीत नसत. राजाच्या अधिकाराला आळा घालण्याचें हें दुसरें साधन मोठें बलवान होतें.

तिसरी मंत्रिपरिषद ही संस्था अशाच प्रकारची होती. तिला वेदात रत्नी अशी संज्ञा आहे. ही संस्था राजसंस्थेहूनही प्राचीन होती. या परिषदेंतल्या मंत्र्याची सल्ला ह्मणजे प्रिव्ही कौंसिलचें जजमेंटच. त्यावर अपील नाहीं. त्याच्या विरुद्ध स्वतः राजाला कांहींही करतां येत नसे. यांच्या सल्लच्यावांचून राजाला काडी इतका अधिकार नव्हता. या मंत्रिमंडळाचा प्रभाव फार विलक्षण होता बौद्धकाळापर्यंत या मंत्रिमंडळाचा मान व अधिकार राजाहून थोर असे. अशोक राजानें जेव्हा सगळा सरकारी खजिना बौद्धभिक्षूंना लुटून देण्यासाठीं काढला, तेव्हां मंत्रि राधागुप्त यानें खजिन्यांतून रुपये देऊं नयेत असा साफ हुकुम फर्मावला, हे मंत्रि राजाच्या अन्यायाच्या हुकुमाला धाब्यांवर बसवीत ही गोष्ट अशोकाच्या शिलालेखावरून ही स्पष्ट दिसते. अशोक भिक्षु झाला, तेव्हा राज्याचा कारभार या मंत्रिमंडळानेंच चालविला होता. रुद्रदामन् याच्या शिलालेखांत ह्मटलें आहे कीं सुदर्शन नांवाच्या तलावाच्या दुरुस्तीसाठीं राजाला रुपये हवे होते. पण ती गोष्ट मंत्रिमंडळाला आवडली नाहीं. ह्मणून त्यानें त्या खर्चाला मंजुरी दिली नाहीं. तेव्हां राजानें स्वतःच्या खानगी नेमणुकींतून ती दुरुस्ती केली. सिद्धपुरुष्या शिलालेखावरूनही या मताला पुष्टि मिळते. राजाला मंत्रिमंडळाची संमति मिळाल्याशिवाय कोणत्याही हुकुमावर आपल्या नांवाची मुद्रा करतां येतनसे. त्यामुळें राजा मंत्रिमंडळाला वचकून असे. हिंदुमंत्रिमंडळ राजाची थुंकी झेलणारें व त्याची मर्जी संपादण्यासाठीं होसहो करणारें नव्हतें. मंत्री इमानद[illegible] दृष्टि देणारे, बुद्धिमान [illegible]बाण्याचे असत असें मेग्या[illegible]सवृत्तांतांतही ह्मटलें आहे. [illegible]चें चरित्र जसें निष्कलंक [illegible]ळींच्या काळीं फार थो[illegible] दिसून येईल. मध्यंतरीं कित्येक राजे जुलमी किंवा दुर्बळ निघाले, राजपुरोहितांनीं बेइमानी केल्याचींही उदाहरणें सांपडतात, सेनापतींनीं निमकहरामपणा केल्याचीं उदाहरणेंही देतां येतील, पण मंत्रिमंडळ कर्तव्यभ्रष्ट झाल्याचें एकमुद्धां उदाहरण आढळत नाहीं. त्यांची कडकडीत न्यायनिष्ठा, निर्भीडपणाचें वर्तन, आणि उज्ज्वल सत्याभिमान कधीं लुप्त झाला नाहीं ह्मणूनच जुलमी राजाच्या कारकीर्दी हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत मुद्दाम प्रयासानें शोधाव्या लागतात, तरी सांपडत नाहींत. परंतु दुःखाची गोष्ट आहे कीं त्याकाळचा इतिहास व राजनीतीचें अफाट धोरण यांची बरोबर कल्पना देणारे ग्रंथ नष्ट झाल्यामुळ राजाचे अधिकार त्याकाळीं अनियंत्रित असत अशा प्रकारचीं विधानें त्या काळासंबंधानें पाश्चात्य व आमचे विद्वान् लोकसुद्धां बेधडक करीत असतात आणि ऐतिहासिक सत्याला अज्ञानानें ह्मणा अगर नवीन गोष्टीच्या अभिमानाचे भरीस पडून ह्मणा, पण जलांजलि देतांना दृष्टीस पडतात. हें देशाचें दुर्भाग्य ह्मणावयाचें. दुसरें काय!

## युरोपात हिंदी सैन्य.

ब्रिटिश राज्याच्या मदतीसाठीं पाठविण्यांत आलेलें हिंदी सैन्य आतां युरोपांतल्या रणभूमीवर जाऊन पोंचलें असेल, आणि तेथें तें आपल्या तलवारीचें पाणी जर्मन लोकांना कसें काय दाखवितें इकडे आतां साऱ्या जगाचे डोळे लागून राहिले आहेत. युरोपात हिंदी सैन्यानें पराक्रम करून दाखविण्याचा हा तिसरा योग आहे. पहिला योग फार प्राचीन काळातला आहे. पर्शियाचा राजा डरायस हा जेव्हां आपली सेना तिकडे नेऊन ग्रीस देश पादाक्रांत करीत होता, तेव्हां त्यानें सिंध व पंजाबमधले लढवय्ये आपल्याबरोबर नेले होते. त्यानंतर दुसरा योग ह्मणजे मुसलमानांनीं स्पेनवर केलेल्या स्वाऱ्याचे वेळीं त्यांचेबरोबर हिंदी सैन्य होतें त्यावेळचा व हा सध्यांचा योग तिसरा. पहिल्या दोन्ही वेळांत हिंदी सैन्यानें आपला पराक्रमाविषयींचा लौकिक पूर्णपणें राखला होता, तसा याही वेळेला ते राखतील असा पूर्ण भरंवसा आहे. दक्षिणहैदराबादेहून पूर्वजर्मन आफ्रिकेंत पाठविलेल्या पंजाबी पलटणीनें नुकत्या झालेल्या लहानशा चकमकींत तीनशें जर्मन लोकांना चांगला हात दाखविल्याची खबर आली आहे. युरोपात आमच्या हिंदी सैन्याच्या हातून घडणाऱ्या शौर्याच्या कृत्याचा हा शुभशकुन आहे असें आह्मी समजतों, आणि हिंदी सैन्याच्या शौर्याची अधिक कांहीं खबर येईल अशी उत्कंठेनें मार्गप्रतीक्षा करतों.

## जर्मनीची कबुली

जर्मनीनें बेलज्यमशीं वचनभंग केल्यामुळें सध्याचा युद्धाचा प्रसंग आला ही गोष्ट आतां इतकी सर्वमान्य झालेली आहे कीं तिच्या सत्यतेविषयीं शंका घेणें हा वेडेपणा आहे. पण अजूनही कोणाचीं मनें संदिग्ध असतील तर जर्मन चान्सेलरांनीं दिलेल्या कबुलीवरून त्यांचा संदेह

पार निघून गेला पाहिजे. इंग्लंडनें कागदाच्या एका तुकड्यासाठीं (बेलज्यमविषयीं झालेल्या करारपत्राकरितां) जर्मनीसारख्या राष्ट्राशीं युद्ध करण्यास उभे राहावें याबद्दल खुद्द केसरनें आश्चर्य व्यक्त केल्याचें प्रसिद्ध झालेंच आहे. आतां डा. व्हॉन बेथमन हॉलवेग या जर्मन मुत्सद्याचें भाषण प्रसिद्ध झालें आहे. त्यांतही त्यांनीं ह्मटलें आहे कीं जर्मनी करीत आहे तें वाईट आहे, अन्यायाचें आहे, राजनीतीच्या विरुद्ध आहे, सगळी गोष्ट खरी, पण जर्मनी सध्यां संकटांत आहे, आणि संकटापुढें सगळा न्याय, नीति व शास्त्र हीं कटपटकीं पाहिजेत. जर्मनीचें सैन्य बेलज्यममध्यें अगोदरच जाऊन थडकलें आहे, या गोष्टीचें समर्थन इतर राष्ट्रांशीं झालेल्या कराराच्या आधारावर करतां येणें अशक्य आहे. पण निरुपायाच्या स्थितींत सगळे करार मदार बाजूला ठेवावे लागतात. आमच्या हातून अन्याय घडत आहे. पण आमची लष्करी महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली ह्मणजे आह्मी त्या अन्यायाच्या पायीं होणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्याचा यत्न करूं. इतका कबुलीजबाब जर्मन मुत्सद्याच्या तोंडून मिळाल्यावर 'धर्मयुद्ध नव्हे हें' असें ह्मणण्यास आतां प्रत्यवाय कोठें राहिला?

## लढाईच्या बातम्या.

गेल्या आठवड्यांतल्या लढाईच्या बातम्या अतिशय उमेदीच्या आहेत. प्यारिसपासून वीस मैलांवर ग्रांड मोरिन नदीच्या तीरावर इंग्रज फौजेची व जर्मन फौजेची चार दिवस सारखी लढाई चालू होती. तींत जर्मन लोकांचा पराभव होऊन ते पळत सुटले. पळतांना त्यांचा अतिशय गोंधळ उडाल्यामुळें पुष्कळ लोक, तोफा व दारुगोळा वगैरे इंग्रजांच्या हातीं लागला. तिकडे फ्रेंच सैन्याशीं झालेल्या लढाईतही जर्मनीची तीच स्थिति झाली. जर्मनीचे प्रड आतां उघडपणें फिरलेले दिसतात. त्याला प्रत्येक ठिकाणीं मागें हटावें लागत आहे, आस्ट्रेलियन लोकांनीं एक जर्मनीची वसाहत हल्ला करून घेतली. पूर्वभागांत रशियानें तर आस्ट्रियाची पुरीच दुर्दशा मांडली आहे. ग्यालीशियाप्रांतांत आज १७ दिवस चाललेल्या लढाईंत आस्ट्रियाचें १० लक्ष सैन्य गुंतलें होतें व २५०० तोफा होत्या. त्यांतले २०० आफिसर, ३०००० शिपाई व तोफा आणि दारुगोळा रशियानें घेतल्या. आतापर्यंत सुमारें दोन लक्ष आस्ट्रियन लोक रशियाच्या हातीं लागले आहेत किंवा मारले गेले आहेत. रशियाची फौज आस्ट्रियाच्या राजधानीवर चाल करून जात आहे. पूर्व आफ्रिकेंत जर्मन लोकांशीं झालेल्या लढाईंत २९ व्या पंजाब पलटणीनें जर्मनीला चांगलाच हात दाखविल्याची खबर सरकारी रीतीनें प्रसिद्ध झाली आहे. अशा रीतीनें सर्व प्रकारें जर्मनी व आस्ट्रिया यांच्या नाशाच्या बातम्या येत आहेत. त्याच्या बरोबर अशाही बातम्या बाहेर आल्या आहेत कीं तुर्कस्थाननें आपणांस मदत करावी ह्मणून जर्मनीनें फार खटपट केली. पण तुह्मी दुष्टपणाचीं कृत्यें करून सुधारणेला कलंक लाविला आहे, सबब आह्मी मदत करूं इच्छित नाहीं असा रोखठोक जबाब तुर्कांनीं दिला आहे. आतां लवकरच जर्मनीला तहाचें बोलणें करावें लागेल असें दिसतें. पण जर्मनीनें अशा बोलण्याचा उपक्रम केल्यास त्याला अनुकूलता दाखवावयाची नाहीं, तर साऱ्या मनुष्य जातीचा शत्रु व सुधारणेला कलंक लावणाऱ्या जर्मनीचा पुरा उच्छेद होईपर्यंत लढावयाचें असा इंग्रज, फ्रेंच व रशिया यांचा विचार ठरला आहे. तिकडे जपानची लढाई सुरू आहेच. पण त्या लढाईची कांहींच बातमी इकडे येऊं देत नाहींत. तथापि जपान सारखें राष्ट्र जर्मनीला हार जाईल हें असंभवनीय आहे.

## हल्लींची राजनिष्ठा
### (राष्ट्रीय दानतीचा भावी पाया)

हिंदु लोकांना प्रसंग आल्यावर कार्यवश होण्याची फार प्राचीन काळापासूनची संवय आहे. कोणतःही आणीबाणीचा प्रसंग येऊन पडेपर्यंत त्यांच्या मनोवृत्तींना अद्भूत स्वरूप नसतें. थोडे दिवसापूर्वीं जहाल उवलजहाल, नेमस्त आणि मवाळ असे चार वर्ग ज्या वेळीं वर्तमानपत्रांतून दुमदुमत होते व ज्या वेळीं बऱ्याचशा पत्रांची आहुतीही वाग्रणांत पडली त्या वेळीं याच पत्रात प्रथमतः आपल्यात आणि राज्यकर्त्यांत कोणत्या प्रकारची सहानुभूती असावी, ती कां, कशासाठीं आणि कोणत्या प्रकारची असावी हें एका विस्तृत लेखमालिकेंत दर्शविलेलें आहे. सांप्रतकाळीं सर्वच पक्षांस हें कळून चुकलें आहे कीं अशा मतवैचित्र्यानें, परस्परविसंगत आचारांनीं, भिन्न भिन्न भाषांनीं आणि भिन्न रूढीप्रचारांनीं विदीर्ण झालेल्या या देशांत ज्यास इंग्रजींत National Character असें ह्मणतात ती अद्याप उत्पन्न होणें आहे. सर्व दानतीचें बीज सत्य, सरळपणा आणि अकैतव हेंच असलें पाहिजे. अद्यापपर्यंत देखील आपण नुसत्या चेहऱ्यावरून हा कायस्थ आहे देशस्थ अगर कोंकणस्थ आहे, परदेशी आहे, किंवा दाक्षिण हिंदुस्थानांतील अगर पंजाबांतील किंवा रोहिलखंडांतील मुसलमान आहे हें प्रायः बिनचूकपणानें ओळखतो. त्याचप्रमाणें या बाह्य आकाराशीं विशिष्ट जातीच्या आणि विशिष्ट देशाच्या लोकामध्यें जे सर्वसाधारण गुण आढळतात तेच ज्या वेळीं संपूर्ण राष्ट्रांत हाडीं मासीं खिळून जातील व स्थूलमानानें तेच गुण राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तींत आढळूं लागतील त्या वेळींच राष्ट्रीय दानत जमली असें ह्मणतां येईल. अशा प्रकारची राष्ट्रीय दानत जमली ह्मणजे पुढें लोकांस एकाच उद्दिष्ट कार्याकरिता उत्साहानें आणि नेटानें झटण्याचें अवसान येतें. राष्ट्रप्रीतीचें बीज राष्ट्रीय दानत होय.

सांप्रत लोकांस इतकें कळून चुकलें आहे कीं अशा प्रकारची राष्ट्रीय दानत प्रादुर्भूत होण्यास हल्लींचेंच राज्य हितकर किंवा सोयीचें आहे. कोणत्याही गोष्टीची किंमत ती धोक्यांत असल्याशिवाय कळत नाहीं. आपण कल्पना करूं कीं तीनच दिवस आपणास न कळूं देतां इंग्रज सरकार देशांतून पुनः परत न येण्याच्या बुद्धीनें गेलें. असें झाल्यास आपल्यात एक तरी असा पुरुष सांपडेल काय कीं जो स्वार्थ निरपेक्षबुद्धीनें अगर निःपक्षपातानें एका शहरातल्या आळींतील लोकांचें हक्कर किंवा फायदेशीर, किंवा शांततोत्पादक रितीनें नियंत्रण करील? जोंपर्यंत आपल्यांत लोकमान्य पुढारी झालेले नाहींत व जोंपर्यंत आपल्या राष्ट्रीयतेचें क्षेत्र पक्कें नियमित नाहीं तोंपर्यंत आपली सर्व घडपड कांहीं तरी नियमित ध्येय ठरविण्याकडे असली पाहिजे व जोंपर्यंत तें ठरलेंच नाहीं. तोंपर्यंत आपणास दुसरा आदर्श आणि प्रकाश यांची जरूरी आहे. हा आदर्श आणि प्रकाश ह्मणजेच हल्लींचे आपले राज्यकर्ते होत. या राज्यकर्त्यांपासून आपणांस अपाय आहेत किंवा फायदे आहेत याची तुलना करीत बसण्याचा हा काळ नाहीं हें प्रत्येकास समजतच आहे. परंतु आमचें ह्मणणें हें कीं जसें राज्यकर्त्यांस या देशावांचून वैभवच नाहीं तसेंच आपणांसही या राज्यकर्त्यांवाचून गत्यंतरच नाहीं. जर वस्तुस्थिती अशी आहे तर प्रत्येकानें मनःपूर्वक सहानुभूतीनें प्रबळ पक्षाचा विश्वास आपणाकडे ओढून घेणें जरूर आहे. राजकीय हक्क मागणें ह्मणजे राष्ट्रीय उन्नती करून घेणें आहे परंतु ते मागताना जोंपर्यंत पात्रताच नाहीं तोंपर्यंत निरनिराळ्या संबोधनांनीं निरनिराळ्या व्यक्तींस नांवें ठेवितां येतील. आपणास राज्यकर्त्यांच्या सहानुभूतीची किती अपेक्षा आहे हें जर यावेळीं कळून चुकेल तर आपली राजनिष्ठा मनःपूर्वक आहे किंवा नाहीं याबद्दल संशयच घेण्यास जागा राहणार नाहीं.

## प्रांतिक वर्गणी
### (इंपिरिअल इंडिअन रिलीफ फंडाकडे)

वऱ्हाड व मध्यप्रांत मिळून दोन्ही संयुक्त प्रांतांची वर्गणी गेल्या बुधवार ता. १६ सप्टेंबरपर्यंत रुपये ५४८६९. ३ आणे ६ पै जमली आहे. त्यापैकीं जिल्ह्यानिहाय ज्या कमिट्या नेमिल्या आहेत त्यांचा मार्फतीनें वसूल आलेल्या रकमांची अटकळ खालील आंकड्यावरून येण्यासारखी आहे:-

| जिल्हाकामिटी. | रुपये आणे पै |
|---|---|
| आकोला | ६४३७--३--३ |
| नागपूर | १५५७१--०--० |
| छिंदवाडा | ८००--०--० |
| सागर | ४९८--१--६ |
| मंडला | ७४७--०--० |
| जबलपूर | १३८९--०--० |
| भंडारा | २९४५-१४--० |
| चांदा | २३६--०--० |
| बालाघाट | १०००--०--० |

या आंकड्यांवरून जिल्ह्यांचा लहान थोरपणा ताडता येण्या सारखा नाहीं हें ध्यानांत धरलें पाहिजे. वर्गण्या गोळा करण्यांत कोणी मागें आहेत व कोणी पुढें आहेत, पण सर्वांत समाधानाची गोष्ट ही कीं वर्गणी देण्यामध्यें अहमहमिका सर्वत्र नांदत आहे. कोणी व्यक्तिशः श्रेष्ठ आहेत तर कोणी जिल्ह्याच्या आंकड्यानीं श्रेष्ठ आहेत, आणि ज्यांना ज्यांना असें वाटतें कीं आपलें उदाहरण पाहून दुसरे लोक आपला उदारहस्त पुढें करितील ते आपल्या मोठमोठ्या रकमांनीं स्वतांस विभूषित करून इतरांस चांगला धडा घालून देत आहेत. परोपकाराच्या कार्याला सीमा नसतात आणि जो तो पुण्यराशी खरिदी करण्याकरितां या सार्वजनीक कार्यपेठेंत एक फेरा मारल्या शिवाय रहात नाहीं हो मोठ्या आनंदाची गोष्ट होय.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान :-** पर्जन्यानें अतिरेक केला आणि अगदीं कंटाळा आणिला. या सप्तकांत कांहीं अहोरात्री सूर्यदर्शन व नक्षत्रदर्शन यांच्याशिवाय गेल्या. पण कालपरवांपासून पुनः हवावैचित्र्य लोकांस आनंदवीत आहे. पीकें जोरदार व तेजस्वी करण्यासाठीं सूर्यप्रकाश आपलें जीवनामृत ओतप्रोत वर्षीतच आहे. आणि रोगराईही दूर करीत आहे.

मेजर टी. सी. ग्लोहन डेपुटी कमिशनर सिवणी यांस स्टांप, रजिस्ट्रेशन इत्यादि खात्यांचे इनस्पेक्टर जनरल नेमण्यांत आलें.

रा. रा. जे. आर. जेम्स यांस उमरावती येथें डिपुटी पोलीस सुपरिनटेंडंट नेमण्यांत आलें.

रा. रा. जी. डब्ल्यू. गेअर डिपुटि इनस्पेक्टर - जनरल पोलीस यांस आकोल्यास पोलीस सुपरिनटेंडंट नेमण्यांत आलें.

रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे एक्स्ट्रा असि. कमिशनर, उमरावती यांस १ महिन्याची हक्काची रजा येत्या २७ वे तारखे पासून देण्यांत आली आहे.

रा. रा. भगवती चरण दुबे एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर, आकोला यांस वऱ्हाड व वर्धे जिल्ह्यांचे सानिटरी डिव्हीजनचे मुख्य नेमिलें.

कर्नल हॉर्सब्रग डिपुटी कमिशनर हुशंगाबाद हे रजेवरून परत येत असतांना 'बालारात' जहाजावर त्यांस खिस्ताक्ष झाली. हा फार अकल्पित मृत्यु होय! हे वऱ्हाडचे जुने अधिकारी असून मोठे मानी, दिलदार व चतुरस्र असत.

## नोटीस

वि॥ सब ज. साहेब खामगांव

मैयत भिकाजी महादेव जाधव रा० नागझरी याचे जीनगीचे वारसाचे सर्टिफिकीट संबंधीं अर्ज. स. स. नं. ३ स. १९१४

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं भिकाजी महादेव जाधव हा मयत झाला असून त्याचे वारस बापू भिकाजी व. २ रा० नागझरी याने भिकाजी महादेव याचे जीनगीचे वारसाचे सर्टिफिकीट मिळा बद्दल या कोर्टांत अर्ज केला आहे तरी व भिकाजी यानला सर्टिफिकीट देणें बद्दल उ कोणाची हरकत असेल त्यानीं या कोर्टां तारीख २४ - १० - १४ इसवी रोजीं हजर होऊन आपली हरकत दर्शवावी तसें न केल्या बापू भिकाजी यास सर्टिफिकीट दिलें जाई

आज तारीख १७ माहे ९ सन १९१४ इ रोजी आमचे सहिनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

K. K. Garde.
Sub Judge
Khamgaon

No. No. 407

## नोटीस

रा० रा० देविदास पांडुरंग रा० मानोरा ता० मंगरूळपीर जि० आकोला यास खाली सही करणार. यास कडून कळविण्यांत येतें कीं आह्मी तुह्मास ता० २३-८-१२ इसवी रोजीं कूल मुकत्यार पत्र देऊन बुक नं० ४ भाग २ पान ९१-९२ अ० नं० १६ सन १२ इसवी रोजीं नोंदून दिले ते मुकत्यार पत्र तुमचे कडून आमचे खात्री प्रों काम होत नसल्यामुळें ता० ६-९-१४ इसवी पासून रद्द करून याबद्दल पंचासमक्ष तुह्मास समन दिली आहे. आमचे सहीचे व दुसरे जे कांहीं कागद पत्र तुमचे जवळ आहेत ते व पैशासंबंधी हिशोब समजावून देऊन, व आमची जेगारी भरलेले मकान ज्यांत तुह्मी आमचे तर्फे राहत आहा ते आमचे मकान व खुले आवाराची जागा असें आमचे ताब्यांत देऊन आमची पावती घेणे. हा प्रकार नोटीस पावले दिवसा पासून चार दिवसांत करावा. आमचे तर्फे कोणतेच प्रकारचे काम करण्यास तुह्मांस अधिकार नाहीं. केल्यास त्याची जोखीम तुमचेवर आहे. मुदती प्रमाणें तुमचे कडून वर प्रों न जाहल्यास कायदेशीर रितीनें तजवीज करणे भाग पडेल. व मकान आमचे ताब्यांत आवारा सुद्धा येई पावेतो दर महा दाहा १० रुपये प्रों तुमचे पासून भाडे वसूल नोटीसीचा व प्रमाणानुसार पुढें खर्च कायद्यास तुमचे पासून घेण्यांत येईल. कळावें ता० १३।९।१४ द० व्यंकटराव सोनाजी नाईक कारंजा.

सही

प्रेमसुक किसनलाल मारवाडी
दुकान मानोरा व ईटोली
मु० कारंजा द० खु०

नो. नं. ४०२

## नोटीस

नरसु वा वेडाजी रा० बोरगांवखुर्द ता० आकोला

नोटीस देणार माहदाजी वा नींबाजी रा० बोरगांवखुर्द ता० आकोला नोटीस देण्यात येतें कीं मी तुह्मास व इरभान वा माहादाजी यास कोर्टाचे कामाकारितां जनरल मु० ५० पांच रुपयाचे कागदावर दिले आहे. हल्लीं मजला दोन मुखत्याराची जरूर नाहीं करितां तुमचें मु० प० रद्द केले आहे. आतां तुह्मी कोणतेच प्रकारचे आमचें कोर्टातील काम करूं नये.

ता० १३।९।१४ इ० सही

माहदाजी वा नींबाजी मोरे
तर्फे मु० इरभान माहादाजी
मोरे द० खु० मु० आकोला

नो. नं. ३९९


# सेंटचा राजा

वापरून तर पहा !!

# ओटो सुगंधीचा भांडार दिलचमन

( रजिस्टर्ड )

आजपर्यंत बाजारांमध्यें निघालेल्या सर्व सेंट, अत्तर, यापेक्षां हे ओटो दिलचमन जास्त टीकाऊ मधुर आणि अधीक खुशबोदार आहे अशी आह्मी पुरी खात्री देतों. जर तुह्मी ओटो दील-चमन वापरला नसेल तर, एक वेळ वापरून खातरी करून घ्या. व ह्यांत स्पीरिट बिलकूल नाहीं, चमेली आणि बटमोगरांच्या ताज्या फुलांच्या अर्कापासून तयार केलेला आहे. फक्त २, ३ थेंब रुमालावर किंवा वस्त्रावर टाकल्यानें एकदम अनेक सुगंधाचा भांडार प्रगट होऊन तुमच्या आसपासच्या सर्व लोकांच्या मनास आनंद होईल.

किंमत ॥ ड्रामची टयूब ८ आणे | किंमत -॥- औंसाची बाटली २ रुपये.
" १ " " १२ आणे | व्ही. पी. पो. खर्च वेगळा,

ओटो दीलचमनची सुगंधी कार्डें दर डझनास १२ आणे,
सेंटच्या नमुन्यासाठीं दोन आण्याचीं टिकिटें पाठवा.

सेंट, ओटो किंवा सुगंधी कार्डें खरेदी करतेवेळीं ओटो दीलचमन हें नांव बरोबर वाचून पहावें. जर तुमच्या जवळच्या दुकानदाराकडे मिळत नसेल तर, खालील पत्त्यावर लिहून माल मागवावे.

एकटे एजंटस् **एच्. आर. मोदी आणि कं.**

विलायती औषधें व परफ्युमरीचे व्यापारी
प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर मुंबई

तारेचा पत्ता "सेकेरीन" मुंबई. नो नं. ३२९



अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ·॥· औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—आरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. ११



## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांड्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

### परमा सायरप.

कमरयाही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फार अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई

नो० नं० १९



सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा

# डॉ. वामन गोपाळ यांचा आयोडाईज्ड सारसापरिला

शरीराचा पंचप्राण ह्मणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगी होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुळे पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तापासून उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१। टपालखर्च -।- पांच आणे. बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नकल केली आहे. तरी घेतांना तो आमचा आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

नो. नं. १६ डा. गोंविंदराव केशव, आणि सन्स

मालक-- ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई. नंबर २.

| | |
|---|---|
| तांबूल नवरत्न | न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे. |
| नवरत्न टेबलेट | उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे. |
| नवरत्न तमाखु | पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा. |
| मद्रासी नस | अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे |
| गजकर्णाचें मलम | गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे. |
| केश काढण्याचें तेल | केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे. |
| चन्द्रकान्त बाम | मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे. |

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट— चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार— आकोला.

नो. नं. १२



## Oriental Government security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

### FUNDs 4½ CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

### Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4,68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6,81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| [redacted] | [redacted] | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36.38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| 1898 | 31,36,422 | 1,41,32356 |
| 1903 | 41,07,009 | 2,19,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

### RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future. "

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh, Nagpur.*

N. No. 13



शेकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

उलटी, हगवण, संधिवात, फेंफरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरियनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ०१२


वी. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो० नं० ३३७



## घड्याळ फुकट मिळेल



( आमके आम और गुठलियोंके दाम )

गजकर्णाचे [ दाद ] रामबाण मलम किं. ४ आणे दराची १२ शीशी ३ तीन रुपयांची घेणारास टाईमपीस घड्याळ फुकट मिळेल. २४ शिशी एकदम घेणारास खिशांतील [ जेब ] घड्याळ फुकट मिळेल. औषध विकून घड्याळ फुकट वापरा.

आमचे कारखान्यांत, सर्व प्रकारचीं पुस्तकें, औषधें, घड्याळ, वाचेस, सुगंधी सामान, तेलें, अत्तरें वगैरे योग्य किंमतीनें मिळतात. आमचा मोठा क्याटलाग फुकट मागवा. तसेंच आपण आपल्या व आसपासचे गांवातील लिहीणदार माणसांचीं ५० पन्नास नांवें पूर्ण पत्त्यासह लिहून कळविल्यास मनोरंजक पुस्तक पाठवू.

१ टेबलावर ठेवण्याचें टाईमपीस घड्याळ १॥ रु.
२ रास्कोप सीस्टिम [ खिशांतील घड्याळ २ रु.

पत्ता जयचंद्र कंपनी ( वर्धा सी. पी.)

नो. नं. ३३८



साताऱ्चे प्रसिद्ध कोल्हटकर राजवैद्यकृत

## कस्तुरीच्या गोळ्या

यापासून अपस्मार वायु-ज्यांस वायप्रद फीट्स [ हिस्टेरिया ] फेंफें मिरगी, वतारणें, आंकडी वुरे ह्मणतात तो आजार, लहान मुलें व मोठीं माणसें यांचा नवा जुना आजार खात्रीनें बरा होतो. तसेच बहुतेक सर्व व अर्धांग वगैरे वायू बरे होतात. १ रुपयां पासून वर कितीही किंमतीच्या गोळ्याच्या बाटल्या माहितीचे कागदासह विकत मिळतात. रोखीनें अगर व्ही. पी. नें मागवा. विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें. याशिवाय बहुत प्रकारच्या मात्रा, गोळ्या, भस्में, आंसवे, वातहारक तेलें विकत मिळतात.

सखाराम अप्पाजी कोल्हटकर वैद्य,
ठाकुरद्वार रोड हरकुवरबाई नवी चाळ, मुंबई नं० २

नो० नं० ३३९


हें पत्र आकोला येथें केलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाड... छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला-- सोमवार तारीख २८ माहे सप्तेंबर सन १९१४ इ० [ अंक ३८


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

हा बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक ---ार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक J. G. Ridland.
आकोला ९।९।०९ ( एजंट
नो. नं ४

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २९ ३/४ तोळे असतें.

मुंबई बँक J. G. Ridland.
आकोला २१-९-१० ( एजंट
नो. नं. ५

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचे-कडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रेल्वीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. २९

## NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. ( Natl ) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3. Monthly Dissections. Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Hon'ble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 16

## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती हो एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चैाकोनी १०० कव्हरें प्रत्येकी किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्ही मिळून किंमत रु. १ व्हो.पी नें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

पत्ता—वेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी

नो नं. ६

## अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कार्वाळ, व मुळव्याध, यांच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण, व्रण, चिखली, मुकी, ओली खाज. जखम, नखविषया, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पेट्रीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवाबर पूड किं १। रु० व डोळ्यांतील वेगळ सोडण्याचे किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वेग प्रवाळ हात भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता - व्ही० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९

श्री

हर्ष! हर्ष!! हर्ष!!!

## स्वार्थ आणि परमार्थ यांची लूट!!

### प्रालब्धाच्या परीक्षेची संधि!

त्वरा करावी. समय चुकल्यावर पश्चात्ताप होईल.

चोपाई.

रामकृपा जिहींपर जब होई ॥
रंक होय धनपति महि सोई ॥
सो हरिकृपा होइ फुरजाना ॥
त्यागहु जिनप्रभू आस सुजाना ॥१॥

एक लक्ष --किंवा --पन्नास हजार --किंवा पंचवीस हजार इत्यादि अधिकांत अधिक एक लक्ष आणि कमींत कमी पंचवीस रुपये पर्यंत जसें ज्याच्या भाग्यांत असेल ते केवळ दोन रुपयामध्यें लाभ मिळतो या विषयीं संपूर्ण निश्चय करण्यासाठीं दोन रुपये मनीऑर्डरने पाठवावेत अगर एक कार्ड लिहून पाठवावें. ही मामुली जाहिरात नाहीं. यावर विश्वास ठेविला पाहिजे.

पत्ता:- सेक्रेटरी,
पुण्य विभाग सभा,
धोलपूर रियासत-राजपुताना
नो. नं. ३९६

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थांनातील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १०८०

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

## गुण न आल्यास पैसे परत.

आमच्या प्रामाणिकपणाबद्दल खात्री करून घ्या. मूळ किं० रु० ४ कमी केलेली किंमत पोस्टेज सह रु० २॥≡ यूथिन हें सतत सर्वत्र १० वर्षें अनुभवलेलें असून त्यापासून नपुंसकत्व व अन्य कारणानें आलेला कमकुवतपणा यावर खात्रीनें गुण येतो अशाबद्दल खात्री झालेली आहे.

पत्ताः—यूथन मॅनुफॅक्चरी चित्तूर.
नो० नं० ४०८

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें

किरकोळ दिवाणी मुकदमा नंबर ९९ सन १९१४ इ.

विद्यमान डि० जज साहेब यांचें कोर्ट मुक्काम आकोला

नांव गणपत
बापाचें नांव बापूजी
जात रजपूत राहणार पोफळी
तहसील मलकापूर जिल्हे बुलढाणा
च्या अल्पवयी भगवान पंढरी उमर वर्ष ६
राहणार पोफळी--मलकापूर तहसीलीचे (२)
अज्ञान भगवान पंढरी साठीं पालन कर्ता (१)
गणपत बापूजी यांस

नेमण्या -विषयींच्या अर्जा संबंधीं [ ३ ]

सर्वत्र लोक यांस

सदहू अर्जदारानें सदहू अल्पवयीचें [२] स्वतः चे व त्याचे जिंदगी साठीं पालन कर्ता गणपत बापूजी यांस

(४) नेमण्याविषयीं अर्ज केल्यावरून सदहू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख ३ माहे आक्टोबर सन १९१४ इ. रोजी नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदहू अर्जदाराच्या अर्जा बद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असे किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊ शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याचे बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख १६ माहे सप्तेंबर सन १९१४ इ. रोजी आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का

K. K. Thakur.

नो० नं० ४१२ डि० जज आहे

## नोटीस

पार्वती मर्द रामचंद गोसावी रा. ण खुर्द ता. मुर्तिजापूर इजला खालीं करणार इजकडून नोटीस देण्यांत कीं तुह्मी माझ्या सवत असून वयानें गे विवाहक्रमानें धाकट्या आहां णामध्यें तंटा होऊ नये ह्मणून आपल्या नें मृत्युपत्रही करून ठेविलें आहे. मृत्युपत्र कोणीं व कशासाठीं बळ- न ठेवीलें आहे हेंही तुह्मांस माहीत . मृत्युपत्र हल्लीं ज्या इसमाजवळ आहे जवळ राहाणें सर्वतोपरी धोक्याचें ि. व तें बदलून त्याच्या ऐवजीं नवीन वट मृत्युपत्र तयार होण्याचा बराच व आहे. आपली इस्टेट बरीच मोठी . व्यर्थ भांडण्यांत अगर तिन्हाइतांच्या र्थीत तिचा व्यय न होऊ देणें उभयतांसही स्कर आहे. तुह्मी दत्तक घेण्याच्या रींत आहां. आपल्या दीराच्या ह्मणजे गीरच्या गृह कलहाचें उदाहरण डोळ्यां ठेवून वेळींच हुशार व्हावें. तुह्मीं क घेण्यास अधिकारी नाहीं. तसेंच सर्व ट समाईक आहे आपण उभयतांनीं ठून बाळभारतीस मु. नेमलेलेच आहे ो स्वतंत्र मुखत्यार नेमणार नाहींच पण र इस्टेटीचा बटवाडा झाला नाहीं र तुह्मांस अगर तुमचे मुखत्यारांस तुमच्या ्याच्या नांवानें कसलाही देण्या घेण्याचा र कोणाचें कर्ज वसूल करण्याचा र पावती देण्या घेण्याचा इत्यादि अधि- र नाहीं व तसा बजावाल तर कायदे र इलाज योजावे लागतील. तसेंच दत्तक यासंबंधानें तुह्मास कळवितें कीं तुह्मी क घ्याल तर तो मी रद्द करवीन. मी स्वैर वर्तनानें एखादा दत्तक घेऊन श्या हित संबंधांत विरोध आणाल तर तुह्मांस तसें करू देणार नाहीं. माझ्या ांत तुह्मांस कसलीहीं भानगड अगर चण पडण्याची काडी मात्र इच्छा नाहीं ं खरें मृत्युपत्र हस्तगत करून घेण्याचें डून बनावट पत्र करवू नये. खऱ्या युपत्राप्रमाणें आपणांस वागणें भागच हे परंतु त्या प्रमाणें कायावाचामनें णण्यास मी तयार आहे पण बनावट युपत्र झाल्यास मी सर्व कायदेशीर इलाज ीन हें लक्षांत ठेवावें. मृत्युपत्र पाहून खरें आहे अशी माझी खात्री होण्या ं दत्तक घेऊं नये व्यर्थ तंटे होतील व टीचा स्वार्थी लोक अपहार करतील ं न होऊं देणें अद्याप तुमचे हातीं आहे. ी शहाण्या धूर्त आणि विचारवंत हां हे गुण कायम ठेवा. विकारवश रू नका. तुह्मांस नोटीस द्यावी लागत हे याबद्दल मलो किती दुःख होत आहे माझें मलाच ठाऊक पण आलेले सिंग ावर घेणें भाग आहे. कळावें. . २१।९।१९१४ ईसवी.

सही.

मनाबाई मर्द रामचंद हिचे हातची
निशानी बांगडी द. बाळ भारती

नो० नं० ४११

## जाहिर नोटीस.

सर्व लोकांस जाहीर नोटीसीनें कळवि ण्यांत येते कीं माझा मुलगा नामें नारायण वा। परशराम ह्माळी वय वर्षे २२ बावीस रा० बाळापूरचा आहे. हा चार पांच वर्षां- पासून वाईट लोकांच्या नादीं लागून बेचालीचा निघाला आहे. त्यानें घरच्या सर्व चीजवस्तु विक्रीत काढल्या आहेत. तरी या ईसमास कोणी कर्ज वगैरे देऊ नये व त्याचे अंगावरचे दागदागीनें हेंही कोणी घेऊ नये व घरचे शेतीचा व घराचा या संबंधीं कोणी त्याशीं व्यवहार करूं नये केल्यास त्याचा तो जबाबदार राहील माझी ईस्टेट अगर मी जबाबदार राहणार नाहीं कळावें ता० २३।९।१९१४

सही

परशराम वा। मनाजी ह्माळी
द० खु० रा० बाळपूर
हल्लीं मु० आकोला

नो. नं. ४१०

## नोटीस

रा० रा० लक्ष्मण शिवराम कुळकर्णी रा० देऊळगांवराजा ता० चिखली जि० बुलडाणा

यांस.

मी खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजजवळून ता० २३-१०-१३ रोजी मौजे खानापूर येथील माझ्या असाम्या ज्यांत तुमची जमानत आहे त्या फिर्यादी करून वसूल करण्याकरितां मजपासून अगाऊ खर्च घेऊन घेतला पण तुह्मी अद्याप एकही फिर्याद केली असल्याचें मला कळविलें नाहीं. असाम्या दिवसेंदिवस नंग्या होत चालल्या आहेत व दस्तऐवजाच्या मुदतीही संपत आल्या आहेत असें असून तुमच्या हयगईनें आमचें नुकसान होत आहे व अशा स्थितींत व्याजाचा बोजा विनाकारण तुह्मावरच वाढत चालला आहे. तरी फि- र्यादी कां दाखल करीत नाहीं हें कळ- वावें. जर तुमच्यानें होत नसल्यास सर्व कागदपत्र हिशेबाच्या वह्यासुद्धां व खर्चास घेतलेले रुपये व तुमचे हयगईनें झालेले नुकसानीचा मोबदला रुपये हे सर्व नोटीस पावल्यापासून ४ चार दिवसाचे आंत आमचेकडे दाखल करावेत तसें न केल्यास सर्व दस्तऐवजाचे व्याज मुद्दल रकमेचे जबाबदार फक्त तुह्मास समजून तशा प्रकारचा कायदेशीर उपाय योजावा लागेल. याबद्दल या नोटीसीमुद्धां झालेला व होणारा सार्किम खर्च तुमचेकडून वसूल केला जाईल कळावें ता० २२।९।१४

सही.

गणेश घनःशाम सराफ रा० देऊ- ळगांवराजा हल्लीं मु० आकोला
द० खु०

नो. न. ४०९

# वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन शुद्ध ९ शके १८३६

## स्वातंत्र्य.

बाह्य उपाधि जर आपणाला दडपणार नाहींत, कायदेकानू किंवा रूढी जर आमचे हातपाय बांधून टाकणार नाहींत, जर आमचे विचार आह्मास मोकळेपणानें सांगतां येतील आणि जर आमच्या बुद्धी- प्रमाणें व विवेकशक्ती प्रमाणें आह्मास वर्तन करण्याची मुभा राहील तर आह्मी खरे स्वतंत्र होऊं असा आपणपैकीं पुष्कळजणांचा ग्रह आहे. राष्ट्रसंबंधानें ह्मणाल तर जेथें लोकनियुक्त संस्था प्रचलित आहेत जेथें लोकांच्या संमतीशिवाय कोणताच कर बसविण्यांत येत नाहीं आणि जेथें सर्व सत्ता लोकांच्याच हातीं आहे. तें राष्ट्र स्वतंत्र आहे असें बोलण्याची पद्धती आहे. एखाद्या माणसाला तो स्वतंत्र आहे असें ह्मणतात कांकीं त्याला त्याचें विचार- स्वातंत्र्य व वाक्स्वातंत्र्य परिपूर्ण आहे, त्याचें वर्तनही तितकेंच स्वतंत्र आहे पण त्यानें दुसऱ्याच्या वर्तनस्वातंत्र्याच्या आड न जाण्याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे. जो मनुष्य आपल्या स्वैर व बेलगामी मनोवृत्तींच्या स्वाधीन होऊन अवशपणें वागतो, किंवा जो आपल्या चंचळ व अस्थिर विचारांच्या कावूंत गेलेला आहे, जो आपल्या दुराग्रहांच्या अंकित झाला आहे किंवा जो अज्ञानांत गढून झाला आहे तोच मनुष्य खरा गुलाम होय. मग तो बाह्य उपाधींच्या कसाही आधीन नसला तरी हरकत नाहीं हेंच बहुतेकांच्या ध्यानात येत नाहीं. जो दारूला बळी पडला, जो खादाडाचा खादाड झाला, किंवा जो स्वैर वर्तन, क्रोध, गर्व, मत्सर, आळस व द्वेष यांच्या आहारीं गेला तोच पक्का गुलाम होय. मागेंपुढें न पाहतां जे दुसऱ्याला कामाला जुपतात त्यांचा हा पुरा बंदिवान होय. ज्या मानानें त्याच्या मनावर बाह्य गोष्टींचें दडपण नाहीं त्या मानानें तो निराश होतो आणि दुर्गुण व मनोवृत्ती यांच्या मगरमिठींत सांपडतो. वास्तविक पाहतां स्वातंत्र्याचा एकच मार्ग आहे व त्याच्याच योगानें बाह्य उपाधि त्याच्या आड येऊन त्याला त्याच्याच अंतःकरणांतील इतर जुलमी गुलामांच्या हातांत पडूं देणार नाहींत.

तर मग खरें स्वातंत्र्य कोणतें? अंतःसाक्षिदेवें जें सकल साम्राज्य तें स्वातंत्र्य होय. हा अंतर्यामी आत्मा अमर असून तो मनुष्य वेषानें नटलेला आहे. हा ईश्वर देहधारी मनुष्य होतो, व स्वर्गांतूनच सात्र- ज्यांत उतरतो तेव्हां तेथें द्वंद्व युद्धें चालू आहेत असें दिसून पडतें.

येथें द्वंद्व युद्धें चालू होतांच बाहेरचे उप- द्रवसूत्र मालक होऊन बसतात, बाह्य सृष्टीचें सौंदर्य अंतःकरणांत विषयवासना उद्भूत करितें, त्याचे देहकोष फटतात व मळून जातात, त्या स्वयंभू शक्ती उध्वस्त व अस्ताव्यस्त होतात, व या शरीराच्या खेळ्यापुढें त्याचें स्वातंत्र्य बळी पडतें.

## लढाईविषयीं कंड्या.

लढाईविषयींच्या खबरा पाहिजे तशा भरपूर येत नाहींत अशी तक्रार हिंदी व इंग्रज दोन्ही पत्रकारांची कांहीं दिवसांपूर्वीं होती. पण अलीकडे प्रेसब्यूरोनें त्या तक्रारीला फारशी जागा ठेविलेली नाहीं ही समाधानाची गोष्ट आहे. तरी अजाण लोक लढाई संबंधानें भलभलत्या व कित्येक वेळां अत्यंत हास्यास्पद कंड्या उठवीत असतात, व हजारों लोक भोळ्याभावानें त्या कंड्या गीतावाक्य प्रमाणें खऱ्या समजून प्रा- माणिकपणानें त्यांचा प्रसार करीत असतात हा बहुधा प्रत्येक गावाचा अनुभव आहे. एखाद्यानें ढगामागें लपल्यामुळें किंचित अंधुक दिसणारी शुक्राची चांदणी पाहून हें जर्मन लोकाचें विमानच आहे ह्मणावें, आणि तें पाहण्यासाठीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटाव्या या मूर्खपणाला काय ह्मणावें तें कळत नाहीं. लोक बातम्यांचे भुकेले असतात ही गोष्ट खरी आहे. पण अशा लोकांनीं जपानचे मुख्य प्रधान काउंट ओक्युमा यांचे पुढील उद्गार लक्षांत ठेवावे. एकदां सदर प्रधानांनीं वर्तमानपत्राच्या संपादकांस उद्देशून एक भाषण केलें. तेव्हां, ते ह्मणाले, 'तुह्मी बातमीकरितां भुकेले आहां, तसा मीही आहें. आत स्वैपाक तयार होत आहे, आणि योग्यवेळीं पक्वान्न तुमच्या ताटांत पडावयाचें तें पडेलच चुकणार नाहीं. पण जरा दमानें घ्य; असें उतावळे होऊं नका! सध्याच्या काळीं अशा उपदेशाची अत्यंत जरूरी आहे. कांहीं कांहीं कंड्या तर इतक्या खोडसाळ असतात कीं त्या मुळातच लवकर नाहींशा करणें अगत्याचें आहे. उदाहरणार्थ, पंजाबांत थोडे दिवसांपूर्वीं अशी कंडी पिकली होती कीं युद्धासाठीं इकडून नेलेल्या शिपायांना साहेबी टोपी ( हेलमेट ) घालण्याचें सरकार भाग पाडीत आहे व त्यासाठीं आतां शीख शिपायांना आपले केस कापावे लागणार आहेत. शीख लोकांत केस कापणें हें अघोर पाप समजलें जात असल्यामुळें अशा कंडीचा परिणाम किती वाईट झाला असता! पण सुदैवाची गोष्ट ही कंडी अगदीं निराधार आहे असें पंजाबांतल्या ट्रायब्यून सारख्या पत्रानीं तावडतोब जाहिर केलें, आणि ह्मणून बरें झालें. अशा कंड्याना उत्तेजन न देतां उलट गावकऱ्यांना खरी हकीकत समजावून त्यांच्या अज्ञ समजुती घालविणें व ब्रिटिश राज्याचा खंबीरपणा त्यांच्या मनावर पूर्णपणें बिंबविणें हें सुशिक्षित नागरिकाचें सध्याचें अवश्य कर्तव्य आहे.

## मंत्रोपदेश
### (खोटी भावना.)

आजपर्यंत रामदास, तुकाराम, एकनाथादि संत मंडळींचीं आप्तवाक्यें देऊन स्त्रियांभोंवती शिष्यत्वाचा फास टाकणारे किती अधम वर्तन करितात धर्माची कास धरल्याचें मिष करून धर्मासच कसा बुडवतात हें सांगितलेंच आहे. आतां याच विषयाचा व्यवहारिक दृष्टीनें व शास्त्र दृष्टीनें विचार करूं. पूर्वी "कौटुंम्बिक स्थितींतून व्यक्ति स्वातंत्र्यापर्यंत" या मथळ्याखालीं जे लेख दिले होते ते वाचकांच्या स्मरणांत असतीलच. त्यांचा वारंवार निर्देश करावा लागेल. युक्तिवाद- प्रत्येक प्राणीमात्रास आपली संतती सर्व वस्तूपेक्षा प्रायः स्वतःपेक्षा देखील अत्यंत प्रिय असते. ती अत्यंत प्रिय असते हा अनुभव सर्वांस आहे. पण ती का प्रिय असते असें विचारल्यास फारच थोडे लोक या प्रश्नाचें उत्तर देऊ शकतील. भूमितीचे सिद्धांत प्रथमतः गूढ वाटतात. पण ते नीट समजल्यावर त्यांचें कांहींच वाटत नाहीं. तद्वतच या संतती प्रेमाच्या मीमांसेचें आहे. सर्व मनुष्यमात्रास आपण कधींनाकधीं मरणार हें पक्कें माहीत असतें तरी घर बांधतांना— कोणतीही खरेदी करतांना अगर कसलाही करार करतांना तो वर्तमान आणि आप्रलय भविष्यकाळांत आपण केलेली व्यवस्था टिकावी या हेतूनें धडपड करीत असतो. स्वतः तर मरावें मग इतकी चिरंतन खटाटोप कां व कोणासाठीं? तसेंच आपल्यातील कितीही सुखी मनुष्य घ्या. त्यास विचारलें बाबा तुला कसलीही काळजी नुसती—शिवून तरी जाते का? तर तो तावडतोब हेंच ह्मणतो कीं "माझे दिवस सुखांत गेले. पण माझे मागें माझीं मुलें माझ्या अंशभागानें तरी सुखी रहातील का हीच काळजी मला रात्रंदिवस टोंचत असते." अत्यंत चिंतातुर देखील याचें उलट "निदान माझा दुःखाचा अनुभव माझ्या मुलांस तरी न मिळो" अशी आशा करीत असतो. या अपत्य स्नेहामुळेंच आपणास पूर्वजांच्या शौर्याचे, विद्येचे, दूरदर्शित्वाचे, गुणांचे, धनभांडाराचे इत्यादि इत्यादींचे फायदे मिळत असतात. तेच आपण आपले मागें आपल्या संततीस वाढवून अगर आपल्या अवगुणांनीं थोडे कमी करून देतों. वास्तविक आपण नुसते कोशरक्षक आहों. मात्र त्या कोशास वाढविण्याचा अगर कांहीं अंशानें उचलून टाकण्याचाच काय तो आपला अधिकार आहे. ईश्वरी देणगीनें आपणास आपल्या विचारांस, आणि आपल्या आधिभौतिक संपत्तीस विचार भाषा व लेखन करांनीं कायम स्वरूप देण्याचें सामर्थ्य मिळालें आहे या सामर्थ्यामुळें हरएक पिढी पूर्वजांच्या ज्ञानाचा लाभ घेते व पुढें येणाऱ्या भविष्यमाण पिढ्यांस आपलें विद्याद्रव्य जसेंच्या तसेंच देते. यामुळें जरी व्यक्तिनाश होतो तरी समाजनाश होत नाहीं. समाज प्रीतीचें बीज संततिप्रेमांत अगर अपत्य प्रीतींत आहे. ज्यास पूर्वजांबद्दल आदर नसेल तो कधींच उदात्त अपत्यप्रेमानें संततीची उपासना करणार नाहीं. ज्यास अपत्यप्रेमच नाहीं. त्यास समाजप्रीति, देशप्रीति किंवा संपूर्ण मानवजातीबद्दल प्रीति असणें शक्यच नाहीं. एकाद्या गतभर्तृकेजवळ फसलेला तीवर मार्वे प्रमाणेंच प्रेम करूं शकेल. पण तें लोढणें कामाचच. तें प्रेमही विषयवासनामूळ. त्यांत दुसऱ्या जबाबदाऱ्यांचें अपत्योन्नतीसाठीं जे यत्न करावयाचे व त्यांस प्रेरक जे उदात्त पतिपत्नीच्या प्रेमाचें मूर्त स्वरूप व त्या प्रेमाचा प्रत्यक्ष पुरावा मुलें हीं होत. हें तत्त्व खरें आहे. पण हें ऋक् काळारंभींच आमच्या लोकांस माहीत होतें.

**अन्तःकरण तत्त्वस्य दम्पत्योः स्नेहसंश्रयात्**
**अपत्य ग्रन्थि रेकोऽमपत्य मिति बध्यते!**

अर्थः-- पति आणि पत्नीच्या [परस्पर] प्रेमामुळें अन्तःकरणाच्या रसाची आनंदाची गाठ "मूल" "मूल या संज्ञेनें बांधली जाते" तसेंच पुत्रो वै आत्म नामासीत् हा सिध्दांत ठिकठिकाणीं सांपडतो.

पति पत्नी कितीही दुरून एकत्र युक्त झालेलीं असोत. अपत्य प्राप्ती वांचून त्यांचा योग पूर्ण झाला असें होत नाहीं. जोंवर संतति झाली नाहीं तोंवर स्त्रीचें प्रेम पतीच्या घरावर नसतें. तिचा ओढा माहेराकडेच असतो. हें अनुभवसिद्ध आहे. बरें स्त्रीस कन्या असेल तर ती पुढें लवकरच कन्येच्याच सासरीं रहाते हाही अनुभव पुष्कळ पहाण्यांत येतो. याचे उलट कितीही श्रीमंताच्या घरीं पडलेल्या कितीही मुली असल्या तरी एक कां पुत्र असेना तो असला कीं मुलींच्या साम्पत्तिक स्थितीकडे दुर्लक्ष करून अनंत हाल अपेष्टा सोसून विधवा स्त्रिया त्या मुलाचें संगोपन करीत असतात व होईल तितकें करून त्यास पतीघरीं अगर स्वतंत्रपणें वाढवीत असतात.

अपत्यप्रेम कां असतें — हें सर्वांच्या अनुभवांत आहे. यावर विचार मात्र फार थोड्यांनीं केलेला असतो. अपत्य ह्मणजे आपणच स्वतः--स्त्री गरभार असते तोंवर ती पतीचीच आई होऊन पतीस उदरांत वहात असते. प्रसूती नंतर ती पुनः पतीची भार्या बनते.

नामदेव ह्मणतातः—

। स्त्रीगरवार पति उदरीं ।
। पतिव्रतापण साने तिये नारी ॥ १ ॥
। अबला खेळवी मोहें ।
। कडिये घेवो देतअसे पाहे ॥ २ ॥
। समस्तीं मिळोनी पाळणा घातला ।
। विष्णुदास नामयानें अनुभव गाइला ॥३॥

अपत्य ह्मणजे आपलेच आपण. जितका स्वस्वभाव किंवा आपलेपणा अपत्यांत आहे तितका स्वस्वभाव किंवा आपलेपणा आमेतर दुसऱ्या कोणत्याही व्यक्तींत नसतो. अपत्य ह्मणजे स्वतः आपणच. पण दुसऱ्या रूपात मात्र आपले आपणच असतो.

Philas aphy of child bearing "गर्भधारण तत्व" आपल्या पूर्वजांस जितकें अवगत होतें तितकें हल्लींच्या प्रगतीगामी सुधारलेल्या देशांत कुठें कोठें कळूं लागलें आहे.

शिवलीलामृत "अध्याय १ ओव्या ९० ९१ आणि ९२ ":—

जे स्त्रीरोगिष्ट अत्यन्त ।
। गर्भिणी किंवा ऋतुस्नात ।
। अभुक्त अथवा व्रतस्थ ।
। वृद्ध अशक्त न भोगावी ॥
। स्त्रीपुरुषें हर्षयुक्त ।
। असावीं तरुण रूपवंत ।
। अष्टभोगें करूनि युक्त ।
। चिंताग्रस्त नसावीं ॥
। पर्वकाळ व्रतदिन निरसून ।
। उत्तमकाळीं षड्रस अन्न भक्षून ।
। मग ललना भोगावी प्रीतिकरून ।
। राजलक्षण सत्य हें ॥

भागवतांत विवाहपद्धति सुरू झाल्यावर देखील हिरण्याक्षाची उत्पत्ति कशी व कां झाली हें स्पष्ट सांगितलेंच आहे. उभयतां स्त्रीपुरुष कांहीं काळपर्यंत तरी विगलित वेद्यान्तरानन्दाचा " ह्मणजे दुसरें कांहींही स्मरत नाहीं अशा प्रकारच्या आनंदाचा " अनुभव घेत नसतील तर गर्भधारणा अशक्य आहे असें हिंदू ग्रीक आणि रोमन तत्ववेत्यांचें पूर्णमत आहे व तें खरेंही दिसतें. आपल्या धर्मांत विवाहविधीस तर धर्म स्वरूप दिलेंच आहे. पण त्याच बरोबर गर्भाधानासही संस्काराचें रूप दिलें आहे. वरील सर्व विवेचनावरून स्पष्ट दिसून येईल कीं संतती माझीच आहे अशी पुरुषाची खात्री नसेल तर त्याचें ठिकाणीं अपत्य प्रेम वसणार नाहीं. पशुवर्गांत केवळ मादीवर अपत्य संगोपन येऊन पडतें. तिला कधीं कधीं प्रत्यक्ष नरानें संतति खाऊन टाकू नये ह्मणून त्यास नकळेल अशा जागीं संततीस ठेवावें लागतें! पुरुषजात अत्यंत मत्सरी असते. आपल्या स्त्रीचें आपलेवर पूर्ण प्रेम नाहीं असें त्याच्या लक्षांत आल्यास त्याच्या सर्व प्रसुप्तपशुवृत्ती जागृत होतात. तो देहान्त शासनाची परवा न करतां आपल्या खऱ्या अगर निवळ संकल्पनिर्मित प्रतिस्पर्ध्याचा वध करण्यास प्रवृत्त होतो. कायद्यानें देखील अशा मत्सरग्रस्त पिशाचास निर्दोषीच मानलेलें आहे.

सारांश संतति विगलित वेद्यान्तरानंदा शिवाय होणें शक्य नाहीं. तो आनंद कितीही अचिर असो. पण त्याचा प्रभाव अपत्यनिर्मिती हा आहे. उभयतांच्या थोड्या काळच्या एक जीवत्वानें, एकात्म होण्यानें, एक बनून जाण्यानें अपत्य निर्माण होतें. हें एकजीव होणें जरी फार क्षणीक असतें तरी त्याची खूण ह्मणजे अपत्य व तें मात्र वीचितरंगन्यायानें अक्षय्य टिकणारें— आत्मा तरी अमर आहे ह्याचें प्रत्यक्ष उदाहरण हेंच आहे. आपणांत आपल्या पूर्वजांचें रक्त आहे. व आपले मागें आपली संतती त्याच रक्तांत जगणार आणि नांदणार आहे. ह्मणूनच आपण अमर आहों असें समजतात व मानतात.

ही स्वकीयत्वाची भावना (मनाचा पूर्ण भरंवसा आणि निश्चय) जर कां नष्ट झाली तर पुरुष त्याच संततीस मत्सराग्नीमुळें मारून टाकण्याचा यत्न करतो. अशीं सहस्त्रशः उदाहरणें पहाण्यांत येतात. उलटपक्षीं जितकें जितकें पतिपत्नींत प्रेम अधिक असेल तितके तितके प्रमाणानें संतति निरोगी, उत्साही, बुद्धिवान आणि दीर्घायु निपजते. त्या एकजीवत्वांत जितका जितका उणेपणा अधिक आढळतो त्या त्या प्रमाणानें संततींतही फरक आढळतो व तींत कोणतें ना कोणतेंतरी व्यंग आढळून पतिपत्नींच्या अन्योन्य प्रेमाभावाचे संततीवर मानसिक परिणाम घडतात. हा सिद्धान्त आहे. हा प्रथमतः आपल्याच पूर्वजांनीं ठरविला. पति पत्नीपैकीं कोणी अगर दोन्हीही व्याधिग्रस्त असतील तर त्या व्याधींचे परिणाम संततीवर घडतात हें सर्वांस कबूल आहे. पण मातापितरांचे आधिचे दोषांनीं संततीवर जे दुष्परिणाम घडतात ते लोकांच्या लक्षांतून प्रायः गेलेलेच आहेत. ते जाणं ह्मणजे आपल्या समाजाचें मोठें दुर्दैव ओढवलेलें आहे. पूर्वींच्या आचारांतील मर्म न समजतां आपण त्यांस चिकटून रहा ह्मणजे चिलखत घातलेल्या शिवाजी महा राजांचा पुतळा युद्धांत उभा करून जयाशा करण्यासारखें होईल. दुर्वर्तनी आईबापां बापआईस शल्यवत टोंचत असतात उत्पतात आल्या मिळ्या इतकें प्रेम असतें. या मानसीक अवस्थेंत असणाऱ्या आई बापांची संतति कशी असणार हें सहज समजण्यासारखें आहे. अपत्य ह्मणजे माता पित्यांच्या अन्योन्य प्रेमाचा प्रत्यक्ष पुतळा हा पुतळा जितका भक्कम असेल तितका समाज जोरदार उत्साही उद्योगी नेटदार इत्यादि गुणांनीं युक्त होत जाईल. पतिपत्नीचें अन्योन्य प्रेम कसें वाढावें व पत्नीपेक्षा संततीच्या उपासनेस पतीस कसें लावावें याचा विचार आमच्या पूर्वजांत फार पडला होता असें आपल्या विवाह पद्धतीचा इतिहास पाहूं गेलें असतां सहज कळण्यासारखें आहे. या पद्धतींचें निरीक्षण फार थोडक्यांत करणें जरूर आहे. फार प्राचीन काळापासून तों समाज (आणि धर्म) प्रगति विरोधी—प्रतिरुद्ध—खुटलेला. भिन्न भिन्न शास्त्र ग्रंथांतील परस्पर विरोधी सिद्धान्तांनीं प्रचुर वेडगळ समजुतींनीं आणि मतांतरांनीं ग्रस्त झालेला ह्मणून अपकर्षोन्मुख होईपर्यंतची विवाह पद्धति थोडक्यांत तपासून पाहूं. हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं मानव जाति उत्क्रान्ति स्थितींत असून प्रत्येक उत्तरागामी पिढी सर्व पूर्वपिढ्यांचें शहाणपण वर सांगि तल्या प्रमाणें एकवटलेलें पिण्डीभूत झालें असतें. हा सिद्धांत समजला ह्मणजे विवा पद्धति क्रमाक्रमानें आर्य लोकांनीं क आणि कोणत्या हेतूनें पूर्णत्वास आण हें सहज कळून येईल.

प्रथमतः आर्य लोक आले त्यावेळीं त्यांच्या विवाह निर्बंध फारच शिथील होते. खरें आहे इतर देशांतील स्त्रियांप्रम पशुप्रमाणें मर्जीनुरूप पति शोधीत त्यां स्त्रिया इतस्ततः भटकत नसत. ह देखील हिंदु ह्मणविणाऱ्या कैक आहेत व त्यांच्यांत स्त्रियांस का तितकें स्वैराचरण करू देतात. ते तर खरेंच. पण आर्यवंशांत नाहींत. त्यां तील देखील ही चाल कमी होत चा आहे. मनुष्य एक जन्म जीवापाड करतो. भवसागरांत ज्या अडचणी आप आल्या त्या आपल्या मागून जन्मास त्यांस येऊ नयेत ह्मणून झटत अ आपल्या संततीवर प्रेम ठेवल्यानें तो वरगें पुढील सर्व जनसमुदायांवर ठेवीत असतो. हें वर सांगितलेंच

ही गोष्ट नवीन आलेल्या आर्यांच्या लक्षांत असजशी येत चालली तसतशी विवाहपद्धति अधिक अधिक सुधरत आणि नियमित होत चालली. प्रथमतः द्विअगर एकाच वेळीं अनेकभार्यत्व पद्धतीस त्यांनीं आळा घातला. ह्या पद्धतीनेंही संततीप्रेम वाढावें तितकें वाढेना ह्मणून सांप्रतच्या पद्धतीची कशी वाढ केली तें खालीं पुढें येईलच.

अपूर्ण

## सूर्यग्रहण व युद्ध.

मि. ॲलन लिओ मॉडर्न ॲस्ट्रालजीचे संपादक यांनीं खालील आशयाच्या मजकूर न्यू इंडिया पत्रांत प्रसिद्ध केला आहे.

गेल्या २१ आगष्टचे सूर्यग्रहण ज्योतिष शास्त्र दृष्टया बरेच विघातक असल्यानें महत्वाचे आहे. राजे लोकांना उतरती कळा लागेल व बऱ्याच क्रांती घडून येतील. सर्व युरोपखंडभर धुमाकूळ माजेल. सर्व गादीवर असलेल्या राजे लोकांना फारच विघातक असून त्यांतले त्यांत जर्मन व आस्ट्रियन बादशहा यांचा लोप होईल. ब्रिटिश राजसत्ता कांठ्यावर धरली जाईल परंतु अखेर तिला यश येईल. मंगळ युध्दाचा अध्वर्यु सूर्यासमवेत दिजंबर अखेर जात असल्यानें युद्ध यंदाचे सालीं थांबेल असें वाटत नाहीं.

## सर्पदंशावर इलाज

केळीच्या मुळ्या बऱ्याचशा घेऊन त्या चुन्यांत भाजाव्या व नंतर त्यांचा पिळून रस काढावा व ज्याला सर्प दंश झाला असेल त्याला होईल तितके लवकर एक मोठा चमचाभर द्यावा. जर माणूस फुगला असेल तर त्याचे तोंड उघडून त्याचे घशांत रस ओतावा. ह्यापासून बहुतकरून गूण येईल. जर रोग्याला एका तासानंतर गूण न वाटला तर त्याला आणखी एक चमचाभर सदरहू रस पाजावा या पासून खात्रीनें गूण आलाच पाहिजे. मुळ्या वाळलेल्या असल्यास त्या भिजवून नंतर रस काढावा. जखमेवर रम दारूंत भिजविलेलें चांगल्या तंबाखूचें पान ठेवावें.

मद्रासचे स्टँडर्ड पत्रांत खालील मजकुरांचे पत्र प्रसिद्ध झाले आहे.

ख्रिस्तवासी एच. ओ. आर्नोल्ड यांचे इंग्लंडचे इतिहासांत पंधराव्या वर्षाला विशेष महत्व दिलें आहे.

इ. स. १२१९ मॅग्ना चार्टावर सही होऊन इंग्लंडचे प्रजेला नवीन हक्क मिळाले.

इ. स. १४१९ आर्जिकोर्टची लढाई जिंकली.

इ. स. १७१९ जॅकोबाईट लोकांचें बंड थांबले.

इ. स. १८१९ वॉटरलूचे लढाईत नेपोलियनचा पुरा पराजय होऊन त्याचे युद्ध थांबलें. त्याप्रमाणेंच १९१९ हें साल इंग्लंड व इतर जगाला कल्याणकारक होवो.

## महिषासूर वध

'प्राणिरक्षक' संस्था, धुळें, यांच्या विनंतीवरून श्रीमत् शंकराचार्य, मठ संकेश्वर यांनीं आज्ञापत्र प्रसिद्ध केलें आहे कीं

जीवहत्या करणेची गोष्ट धर्मशास्त्राविरुद्ध आहे. हल्लीं दान करणें असेल तर असे वेळीं शास्त्राधारें नारळ किंवा कुष्मांडयोग करून किंवा ज्या त्या गांवचे शक्ती प्रमाणें नवचंडी किंवा शतचंडी अनुष्ठान करावें. याप्रमाणें करून जीवहत्येचें काम बंद करावें. असें केल्यास तुह्मांस परमार्थाचा लाभ होणार आहे. या आज्ञापत्राची प्रसिद्धि वर निर्दिष्ट केलेले हद्दीचे गावीं प्राणिरक्षक संस्थेकडून व्हावी. प्रसिद्धि झाल्यानंतर ज्या गांवीं या आज्ञापत्राप्रमाणें अंमल होणार नाहीं असें दिसून येईल त्या गांवीं ज्याकडून अंमल झाला नाहीं असें शाबित होईल त्या इसमास श्रीसंस्थान देवतेचा आज्ञाभंग केल्याबद्दल मठसांप्रदायाप्रमाणें तजवीज करण्यांत येईल.

आपल्या जुन्या रूढीस संस्कृत रूप देण्याची ही मठाची कल्पना फार सुंदर आहे. दसऱ्याचे हेले मारण्याचा प्रघात बंद पडेल तर बरें! आकोल्यासही धुळ्यासारखी 'प्राणिरक्षक' संस्था काढून तिच्या द्वारें पुष्कळशा गोष्टी घडवून आणण्याचा संकल्प येथील श्वेतांबर जैन मंडळीचे स्वामी मुनी महाराज दौलत विजयजी यानीं केलेला आहे.

## लढाई

लढाईच्या बातम्या अगदीं मंदावल्या आहेत. ऐन येथील लढाई आणखी किती दिवस चालेल हें कळत नाहीं. दोन्ही पक्ष लढाईला उभे खरे. पण जर्मनी जितका स्तब्ध आहे तितकी फ्रान्स वगैरे राष्ट्रें निकराची मार्गप्रतीक्षा स्तब्धतेनें करीत आहेत. लढाई आह्मांस तर श्राव्य काव्य आहे. तेव्हां खुप जंगी लढाया ऐकल्याशिवाय कर्ण तृप्तच होत नाहींत. माळी जसा आपलीं झाडें खच्ची करतो तद्वत परमेश्वराच्या राज्यात सध्या ही संहार क्रिया चालू आहे. इच्या बुडाशीं भावी शांतता ईश्वरी गुणांचा उदय व मानव उन्नतीच्या सर्व गोष्टी बीजरूपानें सध्यां आहेत त्यास ह्या लढाईनें लवकरच अंकुर फुटतील तर बरें. आजच्या विजया दशमीच्या मुहूर्तानें आह्मी सोन्याची इकडे लूट करूं. आणि तशीच जयाची लूट यूरोपच्या कुरुक्षेत्रांत होवो. दोन्ही पक्ष आपली बाजू खरी समजून ईश्वराचें आव्हान करितात. अशावेळीं जिकडे खरें सत्य असेल तिकडे जय येईलच पण जर्मनीचे ते शार्मण्यपंडित तत्ववेत्ते व आत्मज्ञानी यांनीं जर्मनीला ज्या वैभवाच्या कळसाला नेऊन पोहोंचविलें त्या शिखरावरूनच जर्मन लोक आपल्याला खालीं लोटून घेत आहेत नाहीं तर व्हीम्स येथील जगातील अद्वितीय देवालय त्यांचे हातून भस्मसात् झालें नसतें. आणि युद्धाच्या धर्मनीतिविरुद्ध अत्याचार कृत्यांचा डोंगर पसरला नसता.

## संसर्ग

लढाईचा प्रत्यक्ष संसर्ग 'एम्डन' नांवाच्या जर्मन क्रूझरनें बंगालच्या उपसागरापर्यंत आणून सोडला व तेथून तो संसर्ग मद्रासच्या समुद्रांत जाऊन तेथें तर या क्रूझरच्या बॉंब गोळ्यानें बर्मा आईल कंपनीचे मातीचे तेलाचे मोठ मोठे खजिने पेटवून दिले. त्यावेळीं सर्व समुद्रावर रात्रीचे वेळीं दिवसा सारखा उजेड झाला होता ह्मणतात. या छोट्या क्रूझरच्या किरकोळ सरबत्त्या दक्षिण समुद्र किनाऱ्याचे बाजूला आणखी ऐकूं येतील असा अजमास आहे.

# वऱ्हाडवृत्त

**हवामानः**— रात्रीं दव पुष्कळ पडूं लागलें आहे त्यावरून पर्जन्यकाल संपला असें दिसतें. मधून मधून थोडीबहुत खंड वृष्टि झाली आणि ती हस्ताच्या सरीवर ताव करणारी अशी होती. एकंदर पर्जन्य २६ इंचावर झाला आहे. पिकें चांगलीं जोमांत असून आनंदानें खेळत आहेत. सार्वजनिक आरोग्याची विशेष अभिवृद्धि होत आहे.

**लढाऊविमानः**— नागपूर, आकोट, खांडवा, मलकापूर इत्यादि भागाला एक लढाऊ आकाशयान रात्रीं संचरतांना दिसलें अशी मौजेची गप चांगली पिकली आहे. पण तें आकाशयान पहाणाऱ्यापैकीं कोणाचेंही स्वप्न जाग आल्यावर सांगण्यापुरतें फार काळ टिकत नाहीं. लढाईच्या रम्य कथांची ही हौस खरी!

**युद्धफंड** येथील आमचे कांहीं स्नेही मंडळी लढाईच्या फंडाला मदत करण्यासाठीं **तारामंडळ** हें नाटक बसवीत आहेत व त्यांचा तो प्रयोग दिवाळीच्या आंत होईल असा अंदाज आहे. खरी कळकळ ही सर्वच गोष्टींत दिसून येते.

अलिशान नामदार चीफ कमिशनर साहेब हे आजरोजीं दिल्लीला जाऊन उद्यां सिमला येथें व्हाइसराय यांची मुलाखत घेतील व तेथून तारीख २ आक्टोबर रोजीं परतणार आहेत.

स० रा० सय्यद अब्दुल रहिमान एक्स्ट्रॉ अ० कमिशनर यांस भंडाऱ्याहून यवतमाळ येथें बदललें.

अकोल्याहून रजेवर गेलेले अ० कमिशनर रा० रा० सी० इ. ब्राऊन यांस भंडारा येथें नेमण्यांत आलें.

रा. रा. नारायण रामराव गुते यांस रजा संपतांच खामगांव येथें तहशिल्दार नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. मिरझागुलाम नबी बेग तहशीलदार यांस खामगांवहून वणी येथें बदलण्यांत आलें आहे.

क्रिकेटचे सामने— हल्लीं आंग्लोव्हर्नाक्युलर शाळाच्या विद्यार्थ्यांमध्यें क्रिकेटनें मोठी धामधुम उडवून दिली आहे. खेळाचीं मैदानें विद्यार्थ्यांनीं फुलून गेलेलीं असतात. मुर्तिजापूर, आकोट, मलकापूर, इत्यादि ठिकाणाहून विद्यार्थी मुद्दाम आले आहेत. हीं बालसैन्यें खेळतांना लढतात तेव्हां स्वाभाविक शिक्षण त्यास नाना तऱ्हांनीं मिळतें. विजयाची महत्वाकांक्षा बळावते पण विरुद्ध पक्षांशी उदारपणें वागण्यास मनुष्य शिकतो आणि पराभव कसा हांसत खेळत अलंकृत करावा हें सहजीं समजतें. विद्यार्थ्यांच्या आनंदाच्या टाळ्या काळ किती तरी रमणीय करितात!


सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना
ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी.

ठि:--पांजरा पेळवा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर -- मुंबई.

एकच भाव! ! एकच भाव! !

ओटे सुरंग आमचेकडे मिळणारा माल ओटे सुरंग

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुयाच, हिना, पाच, वाळा, जुई, चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २ ३-४-६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळयापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे.

**अष्टगंधी अरगजा,** १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट.

ह्यांशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिल्किक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, घंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील परयावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल.

## सेंटचा राजा

वापरून तर पहा!!

# ओटो दिलचमन
## सुगंधीचा भांडार

( रजिस्टर्ड )

आजपर्यंत बाजारांमध्यें निघालेल्या सर्व **सेंट, अत्तर,** यापेक्षां हे **ओटो दिलचमन** जास्त टिकाऊ मधुर आणि अधिक खुशबोदार आहे अशी आह्मी पुरी खात्री देतों. जर तुह्मी **ओटो दील-चमन** वापरला नसेल तर, एक वेळ वापरून खातरी करून घ्या. व ह्यात स्पीरीट बिलकूल नाहीं, **चमेली** आणि **बटमोगरांच्या** ताज्या फुलांच्या अर्कापासून तयार केलेला आहे. फक्त २, ३ थेंब रूमालावर किंवा वस्त्रावर टाकल्यानें एकदम अनेक सुगंधाचा भांडार प्रस्तूत होऊन तुमच्या आसपासच्या सर्व लोकांच्या मनास आनंद होईल.

किंमत ·॥· ड्रामची टयुब ८ आणे | किंमत -।- औंसाची बाटली २ रुपये.
" १ " " १२ आणे | व्ही. पी. पो. खर्च वेगळा,

**ओटो दीलचमनची सुगंधी कार्डें दर डझनास १२ आणे,**
**सेंटच्या नमुन्यासाठीं दोन आण्याची तिकीटें पाठवा.**

**सेंट, ओटो किंवा सुगंधी कार्डें** खरेदी करतेवेळीं **ओटो दीलचमन** हें नांव बरोबर वाचून पहावें. जर तुमच्या जवळच्या दुकानदाराकडे मिळत नसेल तर, खालील पत्यावर लिहून माल मागवावे.

एकटे एजंटस् **एच्. आर. मोदी आणि कं.**

तारेचा पत्ता "सेकेरीन" मुंबई. नो नं. ३२९
विलायती औषधें व परफ्युमरीचे व्यापारी
प्रिन्सेस स्ट्रीट, मार्किटसमोर मुंबई.


---

एक विवाहेच्छु कृष्णपक्षी ह्मणजे विदुर
[ मिश्रजातीय ]

### एक वर व एक वधू पाहिजे.

माझी मुलगी १०।११ वर्षांची गृहकार्य कुशल, सुस्वरूप, गौरवर्णी, साधारण मराठी वाचणारी लग्नाची आहे. व एक मुलगा २२।२३ वर्षांचा. इंग्रजी साधारण जाणणारा हल्लीं रेल्वेत फोरमनचे काम करितो हा लग्नाचा आहे. लग्नें या वर्षांत व्हावींत. तर वरानें व वधूनें अथवा त्यांच्या पालकांनीं सर्व खुलासेवार पत्रव्यवहार मजकडे करावा विशेष लागणारी माहिती देण्यांत येईल व ईश्वर संकेतानुरूप होईल.

पत्ताः— गोविंद रामचंद्र जोशी स्टेशनमास्तर बंगाल नागपूर रेल्वे रंगाली

नो. नं ४०३

---

## WANTED

For the post of a temporary teacher on Rs. 25. per month to teach the English 1st. standerd in the 'Municipal Middle Anglo - vernacular School Malkapur.

None need apply who has not passed the Matriculatioh Examination with Sanscrit as his second language.

Preference will be given to one who has got some experience of the vork

Applications with copies of testimonials should reach the undersigned on or before the 15 th October 1914

Md. M. A. Khan,
Vice chairman
Municipal committee Malkapur
( Berar )

Malkapur
24 September 1914

No. No. 415

---

### नोटीस

नो० ईश्राम वा॥ आनंदा बेलदार रा० मौजे सोंदी प्र० फतेखेर्डा ता० मेहकर जि० बुलडाणें यासीः—

खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असोन लग्नास २० वर्षें झाली मी वयात येऊन ५४ वर्षें झाली. मी तुमचेपासी नांदण्यास तयार असतां तुह्मी गंधर्वाची बायको करून तिचेसी संसार करीत आहां. मी दोन वेळा आपण होऊन नांदण्यास तुमचे घरीं आलें असतां मजला न नांदविता हकून दिलेत. याजमुळें माझा संसार फुकट चालला आहे. आजवर तुमची वाट पाहिली. तुह्मांस माझी गरज नाहीं करितां या नोटीसीनें कळविण्यात येते कीं ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत तुह्मी येऊन मजला घेऊन जावें मी नांदण्यास व येण्यास तयार आहे वरील मुदतींत तुह्मी न आल्यास. मी तुमचेवर अन्नवस्त्राची फिर्याद करीन अगर हीच नोटीस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमची तकरार चालणार नाहीं करितां अगाऊ नोटीसीनें व कायदेसीर रितीनें तुह्मांस कळविले आहे कळावें ता० १०।९।१४ सही

नि० बाळु मर्द ईश्राम बेलदार
रा० मौजे शेवगामाहागीर
प्र० ता० मेहकर ईची.

नो. नं ४०१

तांबूल नवरत्न } न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरुर नाहीं. किंमत डबीस सहा आणे.

नवरत्न टेबलेट } उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे.

नवरत्न तमाखु } पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा.

मद्रासी नस } अति उत्तम सुवासिक नप. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे

गजकर्णाचें मलम } गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे.

केश काढण्याचें तेल } केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे.

चन्द्रकान्त बाम } मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे.

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट- चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार— आकोला.

नो. नं. १२



Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

FUNDs 4½ CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4,68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,6 42 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| 1898 | 31,36,422 | 1,41,32356 |
| 1903 | 41,07,009 | 2,19,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to continuation of prosperity in the future. "

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important fa tors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL

Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

*M. deSOUZA,*

CHIEF AGENT,

*C. P. Berar & Khandesh,* NAGPUR

N. No. 13



शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

उलटी, झाडा, संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

जव्हेरियनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ४१२


वी. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो. नं०३३७



घड्याळ फुकट मिळेल



( आमके आम और गुठालियोंके दाम )

गजकर्णाचे [ दाद ] रामबाण मलम किं. ४ आणे दराची १२ शीशी ३ तीन रुपयांची वेणारास टाईमपीस घड्याळ फुकट मिळेल. २४ शिशी एकदम वेणारास खिशांतील [ जेब ] घड्याळ फुकट मिळेल. औषध विकून घड्याळ फुकट वापरा.

आमचे कारखान्यांत, सर्व प्रकारचीं पुस्तकें, औषधें, घड्याळा वाचेस, सुगंधी सामान, तेलें, अत्तरें वगैरे योग्य किंमतीनें मिळतात. आमचा मोठा क्याटलाग फुकट मागवा. तसेंच आपण आपल्या व आसपासचे गांवातील लिहीणदार माणसाचीं ५० पन्नास नांवें पूर्ण पत्त्यासह लिहून कळविल्यास मनोरंजक पुस्तक पाठवू.

१ टेबलावर ठेवण्याचें टाईमपीस घड्याळ १॥ रु.

२ रास्कोप सीस्टिम [ खिशांतील घड्याळ २ रु.

पत्ता जयचंद्र कंपनी ( वर्धा सी. पी.)

नो. नं. ३३८



सातारचे प्रसिद्ध कोल्हटकर राजवैद्यकृत

कस्तुरीच्या गोळ्या

यापासून अपस्मार वायू-ज्यास बाचग्रह फीट्स [ हिस्टेरिया ] फेंपरें मिरगी, वतारणें, आंकडी वुरे लागतात तो आजार, लहान मुलें व मोठीं माणसें यांचा नवा जुना आजार खात्रीनें बरा होतो. तसेच बहुतेक सर्व ज्वर अर्धांग वगैरे वायु बरे होतात. १ रुपया पासून वर कितीही किंमतीच्या गोळ्यांच्या बाटल्या माहितीचे कागदासह विकत मिळतात. रोखीनें अगर व्ही. पी. नें मागवा. विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें. याशिवाय बहुत प्रकारच्या मात्रा, गोळ्या, भस्में, आंसवें, वातहारक तेलें विकत मिळतात.

सखाराम अप्पाजी कोल्हटकर वैद्य,

ठाकुरद्वार रोड हरकुवरबाई नवी चाळ, मुंबई नं० २

नो० नं० ३३९


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें